स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

# SYLLABUS

**B. A. FIRST YEAR**

**SEMESTER I & II**

## ECONOMICS

**SEMESTER PATTERN**

**(CHOICE BASED CREDIT SYSTEM)**

**WITH EFFECT FROM: 2019-2020**

Dr. Shivaji Pate, Associate Professor & Head
Dept. of Economics,
Sant Tukaram College of Arts & Science,
Parbhani : 431401

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

Choice Based Credit System (CBCS) Pattern of Economics

Faculty of Humanities

**B. A. FIRST YEAR**

With Effect from: 2019-2020

**SUBJECT: ECONOMICS**

# SEMESTER-I

| Paper No. | Title of the Paper | Continuous Assessment (C.A.) | End of Semester Examination (E.S.E.) |
|---|---|---|---|
| I | Micro Economics(Comp.) | 35 | 40 |
| II | Economy of Maharashtra ( Optional ) OR Statistical Methods ( Optional ) | 35 | 40 |

# SEMESTER-II

| Paper No. | Title of the Paper | Continuous Assessment (C.A.) | End of Semester Examination (E.S.E.) |
|---|---|---|---|
| III | Micro Economics(Comp.) | 35 | 40 |
| IV | Economy of Maharashtra ( Optional ) OR Statistical Methods ( Optional ) | 35 | 40 |

IV

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

**(With Effect from: 2019–2020)**

**B. A. First Year**

**Semester – II**

**ECONOMICS**

**Paper-III**

**Micro Economics (Compulsory)**

| Credits: 03 | Periods: 55 | Marks: 75 |
|---|---|---|

Theory (ESE) 40 Marks + Internal (CA) 35 Marks = 75 Marks

## Course Outline:

The course includes the study of theory of production, theory of cost, and theory of revenue. The course also emphasizes on the study of market structure, such as, perfect competition, monopoly and monopolistic competition. The course also delve the theory of distribution. Rent, Wages, Interest and Profit theories are incorporated in the distribution. This course creates a new approach towards the study of Economics.

## Course Objectives:

i) To study the Concept and theories of Production.
ii) To understand the concepts of Cost and Revenue.
iii) To study the concepts of exchange through market structure.
iv) To analyze the theory of distribution into various factors of production, such as: Land owner, labour, organizer, and Capital owner.

## Course Utility:

i) Student will get the knowledge about Production, Cost and Revenue.
ii) Students will be acquainted with the various markets from the point of view of competition.
iii) This course will be helpful to realize the actual market through competitive point of view.
iv) The acquisition of knowledge about providing share of different factors of production.

COURSE CONTENT: **Periods**

Unit – I **Theory of Production, Cost and Revenue** **15**

A. **Production Function:** Concept of Production Function; the Law of Variable Proportion; Law of Returns to Scale.

B. **Concept of Cost and Cost Curves:** Different concept of Cost-Money, Real and Opportunity Cost; Cost Curves-Short Run and Long Run.

C. **Concept of Revenue and Revenue Curves:** Total, Average and Marginal Revenue, Revenue and Revenue Curves under Perfect Competition and Monopoly.

Unit – II **Market Structure** **20**

A) **Perfect Competition** – Meaning, Characteristics, Price determination, Short-run & Long-run equilibrium of a firm & industry.

B) **Monopoly** – Meaning, Characteristics, Short-run & Long-run equilibrium of a firm.

C) **Monopolistic Competition** – Meaning, Characteristics, Group equilibrium.

Unit – III **Theory of Distribution** **20**

A) **Rent** – Recardian and Modern theories of Rent.

B) **Wage** – Modern Theory of Wage, Wage Differentiation and Collective Bargaining.

C) **Interest** – Loanable funds and Liquidity preference theories of interest.

D) **Profit** – Uncertainty theory of profit; Innovation theory of Profit.

IV.

## Books Recommended:


1. Robbins L.C. (1932) The Nature and Significance of Economic Science, London, Macmillan VIII Ed.
2. Marshall A. (1920) Principles of Economics Book I, London, Macmillan, VIII[ed.]
3. Hicks J.R. (1939) Value and Capital Paper I, Oxford. Clarendon press (2nd Ed. 1946).
4. Samuelson P.A. (1948) Economics, New York: McGraw Hill.
5. Boulding K.E. (1970) Economics as a science, McGraw Hill.
6. Robinson Joan (1969): Economic of Imperfect Competition, Macmillan.
7. Chamberlin E. H. (1933): The Theory of Monopolistic Competition, Cambridge, M. A. Harvard University Press.
8. Knight F.H. (1921) Risk Uncertainty ant Profit, New York, Houghton Mifflin.
9. Jhingan M.L. (1999) Micro Economics Theory, Vrinda Publications Limited.
10. Ahuja H.L. (1978) Principles of Micro Economics, S. Chand Limited.
11. A. Koutsoyiannis, Modern Micro Economics, MacMillan Education Ltd., London, 1979.
12. कृष्णराव पाटील - उच्चस्तर आर्थिक सिध्दांत,मंगेश प्रकाशन,नागपूर १९८८
13. राम देशमुख - सुक्ष्म अर्थशास्त्र, गीताई, विवेक नगर, नांदेड १९९७.
14. श्रीनिवास खांदेवाले - किंमत सिध्दांत, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर १९८९.
15. रायखेलकर/खेडकर - सूक्ष्म अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद १९९७.
16. देशकर/आहेरवाडकर - सूक्ष्म अर्थशास्त्र,पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर १९९०.
17. सोळंके/तवार/कापसे - सूक्ष्म अर्थशास्त्र, कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद १९९३.
18. विकास सुकाळे - सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र, क्रिएटीव्ह पब्लिकेशन्स,नांदेड २०१३.
19. के.एस.बाभुळगांवकर/के.के.कदम - आधुनिक सुक्ष्म अर्थशास्त्र,मिस्बाह प्रकाशन, नांदेड, जुन २०१५.
20. राजश्री जाधव/प्रमोद बेरळीकर - सूक्ष्म अर्थशास्त्र,श्रध्दा पब्लिकेशन,सोलापूर,२०१८

३

# उत्पादन सिद्धांत व खर्च संकल्पना

## Theory of Production and Costs

वस्तूचा उपभोग घेतल्यामुळे मानवाला एक विशिष्ट प्रकारचे समाधान मिळते. यालाच भौतिक समाधान असेही म्हणतात. हे समाधान मिळवण्यासाठी वस्तू व सेवांची निर्मिती होणे आवश्यक असते. या वस्तू व सेवांच्या निर्मितीस उत्पादन असे म्हणतात, असा उत्पादनाचा स्थूलमानाने अर्थ सांगता येतो.

**ॲडम स्मिथ यांच्या मते** "भौतिक वस्तुची निर्मिती म्हणजे उत्पादन होय," स्मिथ यांनी द्रव्य (पैसा) वस्तूंचाच विचार केला आहे. त्यामुळे या व्याख्येत त्रुटी आहे.

**मार्शल :-** यांच्या मते, 'उपयोगितांची निर्मिती अथवा वाढ म्हणजे उत्पादन होय.' मार्शल यांनी आपल्या व्याख्येत मानवाने वस्तूंच्या उपयोगितेत केलेल्या बदलास किंवा वाढीस उत्पादन म्हटले आहे.

वरील व्याख्या आधुनिक अर्थतज्ज्ञांना मान्य नाहीत; कारण केवळ एखादी वस्तु व्यक्तीपर्यंत पोहोचवली तर त्यामध्ये उपयोगिता निर्माण होते. परंतु व्यवहारात त्यामुळे विनिमय मूल्यात वाढ होतेच असे नाही. त्यामुळे उपयोगिता मूल्याबरोबरच **'वस्तूत विनिमयमूल्य निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे उत्पादन होय,'** असे मत प्रा. मेयर्स यांनी प्रतिपादन केले आहे.

### ३.१ उत्पादन फलन (Production function) :

कोणत्याही वस्तूचे उत्पादन करण्यासाठी चार घटक कार्यरत असतात. यालाच उत्पादनाचे घटक असे म्हणतात. भूमी, श्रम, भांडवल व संयोजन या चार घटकांवरच उत्पादन अवलंबून असते. यावरुन उत्पादनफलन म्हणजे एका विशिष्ट प्रमाणातील उत्पादन घटकाचा उत्पादनाच्या प्रमाणाशी असलेला संबंद होय. याचा अर्थ असा की, उत्पादन घटक किती प्रमाणात वापरले तर उत्पादन किती मिळेल हे दाखवणे होय. उत्पादन घटकांत बदल केल्याप्रमाणे उत्पादनात बदल होत असतात. हे बदल उत्पादन फलनावरुन लक्षात येतात.

व्याख्या :

उत्पादन फलाच्या वेगवेगळ्या व्याख्या वेगवेगळ्या अर्थतज्ञांनी केल्या आहेत. त्यापैकी प्रमुख विस्तारीत व्याख्या पुढील प्रमाणे आहेत.

**"एखाद्या विशिष्ट उद्योगसंस्थेचा उत्पादन फलन संबंध म्हणजे एका विशिष्ट वेळी उत्पादन घटकांच्या वेगवेगळ्या संयोगाचे प्रमाण व उत्पादन यांचा संबंध दर्शवणे होय."**

या व्याख्येवरुन असे लक्षात येते की, उत्पादनाच्या मात्रा (प्रमाण) आणि उत्पादन घटकांच्या मात्रा (प्रमाण) यांच्यात फलनात्मक संबंध असतो. हा संबंध समीकरणाच्या सहाय्याने पुढीलप्रमाणे सांगता येतो.

$x = f(a, b, c, d.......)$

येथे $x$ = उत्पादन मात्रा,

$f$ = फलन (उत्पादन मात्रा व उत्पादन घटक या दोन्हीचा संबंध दर्शवणारे अक्षर)

$(a, b, c, d.........)$ = निरनिराळ्या उत्पादन घटकांचे प्रमाण.

वरील समीकरणावरुन उत्पादन फलनाचा अर्थ स्पष्ट होतो. एखाद्या विशिष्ट वस्तुच्या उत्पादनासाठी किती उत्पादन घटक वापरावे लागतील याचे प्रमाण लक्षात येते. थोडक्यात, उत्पादन फलनावरुन आदान (उत्पादन घटक) व प्रदान (उत्पादन) यांच्यातील संबंध लक्षात येते.

**उत्पादन फलनाची वैशिष्ट्ये :**

**१. उत्पादन फल हे उत्पादनाचे प्रमाण व त्यासाठी वापरलेल्या उत्पादन घटकांच्या मात्रा यांचे प्रमाण दर्शवते :** उत्पादन फल हे विशिष्ट उत्पादनासाठी उत्पादन घटकांच्या म्हणजे भूमी, श्रम, भांडवल व संयोजन यांच्या किती मात्रा वापरल्या यांचा संयोग दर्शवते. म्हणजेच उत्पादन फलन हे एका माहितीपत्रकाप्रमाणे असते. की, ज्यामध्ये उत्पादन घटक व त्यापासून मिळणारे उत्पादन यांच्यातील संबंध दर्शविला जातो.

**२. उत्पादन फलन हे तांत्रिक ज्ञानानुसार बदलते :** उत्पादन फलन हे तांत्रिक ज्ञानावर अवलंबून असते. कारण तांत्रिक ज्ञानात होणाऱ्या बदलाप्रमाणे उत्पादन फलात बदल होतो. तांत्रिक ज्ञानातील प्रगतीमुळे उत्पादन प्रक्रियेत प्रगती झाली तर अधिक उत्पादन मिळते. यामुळे उत्पादन फलनात सुधारणा होते.

**३. उत्पादन फलनामध्ये वेळेचा विचार केला जातो :** उत्पादन फलनात वेळेचा विचार करणे आवश्यक आहे. कारण वेळेचा विचार केला नाही तर उत्पादन फलनापासून अर्थबोध होत नाही. उदा. कोणत्या वेळी किती एक्कर जमीनीपासून किती उत्पादन मिळाले. येथे वेळ महत्वाची आहे.

**४. उत्पादन फलनासाठी उत्पादन घटकाची माहिती असावी लागते :** वस्तुच्या

उत्पादनात उत्पादन घटकातील वदलामुळे किंमता बदल होतो. हे स्पष्ट होण्यासाठी उत्पादन घटकांची पुरेपूर माहिती असावी लागते. ही माहिती नसेल तर उत्पादन फलन माहित होणार नाही.

**५. उत्पादन फलन हा अभियांत्रिकीचा विषय आहे :** उत्पादन फलन हा उत्पादन अभियांत्रिकीचा विषय आहे. तरीही उत्पादन फलनाचे अर्थशास्त्रातील महत्त्व लक्षात घेता, त्याचा अभ्यास अर्थशास्त्रातही केला जातो.

अशा प्रकारे उत्पादन फलन ही संकल्पना वरील वैशिष्ट्यावर अवलंबून आहे.

**उत्पादन फलनाची गृहिते :**

उत्पादन फलनाची संकल्पना पुढील प्रमुख दोन ग्रहितावर अवलंबून आहे.

१) उत्पादन फलनासंबंधी स्पष्टीकरण करत असतांना तांत्रिक ज्ञान स्थिर आहे. असे ग्रहीत आहे.

२) उत्पादन संस्था उपलब्ध असलेल्या तांत्रिक ज्ञानापैकी किंवा सामुग्रीपैकी अति कुशल तंत्र वापरते. असे मानले जाते.

## उत्पादन फलाचे प्रकार :

उत्पादन फलाचे प्रमुख दोन प्रकार आहेत. ते पुढील प्रमाणे.

१. स्थिर प्रमाण उत्पादन फल

२. बदलते प्रमाण उत्पादन फल

या दोन्हींचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

**१. स्थिर प्रमाण उत्पादन फल :**


स्थिर प्रमाण फल हे तांत्रिक गुणकावर अवलंबून असते. एखाद्या वस्तूच्या विशिष्ट नगासाठी वेगवेगळ्या उत्पादन घटकांच्या नगांच्या प्रमाणास उत्पादनाचा तांत्रिक गुणक म्हणतात. उदा. क्ष वस्तुचे उत्पादन करावयाचे असेल तर क्ष च्या विशिष्ट नगासाठी अ आणि ब हे दोन उत्पादन घटक अनुक्रमे २ व ३ प्रमाणे लागतात. असे असेल तर क्ष वस्तुचा तांत्रिक गुणक हा २:३ हा आहे. म्हणून

क्ष = २अ + २ब

वरील समीकरणामध्ये क्ष या वस्तुच्या विशिष्ट नगासाठी अ उत्पादन घटकाच्या दोन मात्रा व ब उत्पादन घटकाच्या तीन मात्रा लागत आहेत. यांचे प्रमाण स्थिर ठेवूनच उत्पादन करावे लागते. म्हणून यास स्थिर प्रमाण उत्पादन फल किंवा रेषीय उत्पादन फल असे म्हणतात.

समजा क्ष वस्तुचे १०० नगाचे उत्पादन करावयाचे असेल तर २अ व ३ब असे उत्पादन घटकांचे प्रमाण लागत असेल तर क्ष वस्तुच्या २०० नगासाठी ४अ + ६ब असे

तांत्रिक गुणांक हा बदलणारा असतो तेव्हा त्यास बदलते प्रमाण उत्पादन फल असे म्हणतात. उत्पादन घटकांच्या मात्रेत कसाही बदल करुन उत्पादनाची जेंव्हा विशिष्ट पातळी गाठली जाते. तेंव्हा उत्पादनासाठी वापरलेले घटक आणि त्यापासून मिळणारे उत्पादन या दोन्ही मध्येही बदल होत असतो. त्यामुळे या पद्धतीत उत्पादनाची विशिष्ट पातळी उत्पादन घटकाच्या वेगवेगळ्या गटांच्या मदतीने गाठता येते. उदा. क्ष वस्तुच्या उत्पादनासाठी श्रम आणि भांडवल या दोन घटकांचा उपयोग केला जात असेल तर या दोन्हीही घटकात बदल करुन उत्पादन करता येते. हे पुढील आकृतीत स्पष्ट केले आहे.



आकृती क्र. ३.२

वरील आकृतीमध्ये अक्ष अक्षावर श्रमाचे नग तर अय अक्षावर भांडवलाचे नग दर्शवले आहेत. पप हा श्रमाचा पुरवठा वक्र असून बक हा भांडवलाचा पुरवठावक्र आहे. बदलत्या प्रमाण उत्पादन फलानुसार उत्पादक उत्पादन घटकात कोणत्याही प्रकारे बदल करु शकतो. असे लक्षात घेतले तर पुढील उदाहरणानुसार आकृतीचे स्पष्टकरण करता येईल. उदा. उत्पादकाला क्ष वस्तुच्या १०० नगाचे उत्पादन करावयाचे असेल तर त्यासाठी अप इतके नग श्रमाचे लागतील तर अब इतके नग भांडवलाचे लागतील अशा परिस्थितीत उत्पादन १०० नगापासुन २०० नगापर्यंत वाढवायचे असेल तर तो श्रमाचे अप१ नग घेऊन भांडवलाचे अब पर्यंतच नग घेऊन वरील उत्पादन पातळी गाठू शकतो. तसेच त्याने भांडवल हा घटक अब एवढा स्थिर ठेऊन श्रमाच्या घटकात अप पासून अप१ पर्यंत वाढ केली तर त्यास वरील उत्पादन पातळी गाठता येते हे र आणि स या बिंदूवरुन स्पष्ट होते. तसेच तो या दोन बिंदूपैकी कोणत्याही एका गटाची निवड करुन उत्पादन वाढऊ शकतो.

## ३.२ बदलत्या प्रमाणाचा नियम :

### Law of Variable Proportion :

उत्पादन फलामध्ये उत्पादनाचा एक घटक बदलता ठेवून इतर घटक स्थिर मानले असता निर्माण होणाऱ्या उत्पादन फलनास अल्पकालीन उत्पादन फलन किंवा एक घटक परिवर्तन उत्पादन फलन म्हणतात. उत्पादन घटकांचे दोन भागात वर्गीकरण करतात.

**अ) बदलते घटक :** "ज्या उत्पादन घटकांच्या परिमाणात सहज वाढ अथवा घट करता येते त्यांना बदलते घटक म्हणतात." उदा. इंधन, कच्चा माल, अस्थायी मजूर इ.

**ब) स्थिर घटक :** ज्या घटकांच्या परिमाणात अल्पकाळात वाढ अथवा घट करणे शक्य नसते त्यांना स्थिर घटक म्हणतात. उदा. इमारत, अवजड यंत्रे इ.

या घटकापैकी उत्पादनाचे इतर घटक स्थिर ठेवून केवळ एकाच घटकात बदल केला तर उत्पादनवाढ कोणत्या प्रमाणात होईल याचे स्पष्टीकरण या नियमात केले आहे. हा नियम स्पष्ट करण्यासाठी उत्पादनाचे दोनच घटक आहेत असे गृहीत धरले आहे. या गृहितांच्या आधारावरच नियमाचे स्पष्टीकरण केले आहे.

उत्पादनामध्ये बदलत्या घटकामध्ये अल्पकाळात बदल केला आणि स्थिर घटक कायम ठेवले तर पुढील प्रकारचे तीन उत्पादनफल मिळतात.

१) वाढते उत्पादन फल (वर्धी उत्पत्ती) २) स्थिर उत्पादन फल (स्थिर उत्पत्ती) ३) घटते उत्पादन फल (अऱ्हासी उत्पत्ती).

वरील प्रमाणे उत्पत्ती फलाचे एकूण तीन नियम अंमलात येतात असे परंपरागत अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. परंतु आधुनिक अर्थशास्त्रज्ञ ही गोष्ट मान्य करीत नाहीत त्यांच्यामते उत्पादनविषयक एकच नियम आहे. तो म्हणजे बदलत्या प्रमाणाचा नियम होय. हा नियम सर्वच क्षेत्रात अंमलात येत असला तरी शेती क्षेत्रात अधिक प्रकर्षाने अंमलात येतो.

**बदलत्या प्रमाणाच्या नियमाची व्याख्या :**

'विशिष्ट परिस्थितीत उत्पादन-प्रक्रियेत भाग घेतलेल्या एका घटकाची मात्रा स्थिर ठेवून दुसऱ्या घटकाची राशी सतत वाढवीत गेल्यास सुरुवातीस उत्पादनात होणाऱ्या वाढीचा वेग वाढत जाईल. परंतु एका विशिष्ट मर्यादेनंतर उत्पादनवाढीचा हा वेग कमी कमी होत जाईल," म्हणून या नियमाला घटत्या उत्पादन फलाचा सिद्धांत असे म्हणतात.

**१. स्टिगलर :**

'उत्पादनाच्या कांही साधनांना स्थिर ठेवून एका साधनात समान वाढ केली जात असेल, तर एका मर्यादेनंतर उत्पादनात होणारी वाढ कमी होईल, अर्थात सीमांत उत्पत्ती कमी होईल.'

**२. बेन :**

उत्पादनाच्या तंत्रात कोणताच बदल झाला नसतांना असा एक बिंदू आढळतो की त्या बिंदूनंतर स्थिर घटकाच्या जोडीला असलेल्या बदलत्या घटकांच्या संख्येत वाढ केली तर बदलत्या घटकाच्या प्रत्येक वाढीबरोबर उत्पादन घटत जाते.

**३. मेयर्स :**

जर एक किंवा अनेक उत्पादन घटक स्थिर ठेवून एक किंवा अनेक घटकाच्या प्रमाणात वाढ केली तर नेहमीच एकूण उत्पादन बदलत्या घटकाच्या प्रमाणात बदलणार नाही.

४. प्रा. सॅम्युएलसन :

स्थिर साधनांच्या तुलनेत कांही साधनांच्या संख्येत वाढ केल्याने उत्पादनात वाढ होते. परंतु एका मर्यादेनंतर साधनांच्या समान वाढीतून प्राप्त होणारे अतिरिक्त उत्पादन हळूहळू कमी होत जाते.

वरील सर्व व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की, उत्पादनात जर दोनच घटक असतील तर त्यापैकी एका घटकांच्या राशी स्थिर ठेवून दुसऱ्या घटकाच्या राशीत बदल केला तर बदलता घटक वाढत असतांना त्याचे स्थिर घटकाशी असलेले प्रमाण वाढत जाते. याबरोबरच पुरकात्मीय वस्तूच्या उत्पादनात वाढ होत जाते. परंतु विशिष्ट मर्यादेनंतर ती कमी होत जाते.

वरील सिद्धांत कृषी उत्पादनाच्या बाबतीत विशेष करुन लागू होतो. या सिद्धांताचा प्रत्यय स्कॉटलँड येथील एका शेतकऱ्यास प्रथम आला असे सांगण्यात येते. असे असले तरी आज हा नियम केवळ कृषी व्यवसायापुरता मर्यादित राहिला नाही, तर एका विशिष्ट मर्यादेनंतर उद्योगातही तो अनुभवास येतो. या सिद्धांतास घटत्या उत्पादन फलाचा नियम असेही म्हणतात.

**स्पष्टीकरण :**

प्रा. बेनहॅम यांच्या उदाहरणात आपण थोडासा बदल करुन आपण ते पुढीलप्रमाणे घेऊ शकतो.

समजा, गव्हाच्या उत्पादनासाठी दोनच उत्पादक घटक लागतात, एक श्रमिक आणि दुसरा भूमी यापैकी भूमी हा घटक कायम ठेवून श्रमिकांच्या संख्येत वाढ केली तर गव्हाच्या उत्पादनात पुढीलप्रमाणे बदल होतो.

**तक्ता क्र. ३.१**


| श्रमिकांची संख्या | भूमीची संख्या | श्रम आणि भूमीचे प्रमाण | गव्हाचे एकूण उत्पादन (क्विंटल) | गव्हाचे सरासरी उत्पादन (क्विंटल) | गव्हाचे सीमांत उत्पादन (क्विंटल) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५ | १:५ | ४ | ४ | ४ |
| २ | ५ | २:५ | १० | ५ | ६ |
| ३ | ५ | ३:५ | १८ | ६ | ८ |
| ४ | ५ | ४:५ | २४ | ६ | ६ |
| ५ | ५ | ५:५ | २९ | ५.८ | ५ |
| ६ | ५ | ६:५ | ३१ | ५.१ | २ |
| ७ | ५ | ७:५ | ३१ | ४.४ | ० |
| ८ | ५ | ८:५ | २८ | ३.५ | -३ |
| ९ | ५ | ९:५ | २४ | २.६६ | -४ |

वरील तक्त्यात गव्हाच्या उत्पादनासाठी भूमीचे आकारमान कायम ठेवून श्रमांच्या संख्येत वाढ केली, तर काय परिणाम होतो ते दाखविले आहे.

**अ) एकूण उत्पादन :** भूमीचे आकारमान स्थिर ठेवून श्रमसंख्या वाढवली, तर एकूण उत्पादन ७ व्या श्रमीकांवर कमी होत गेले आहे.

**ब) सरासरी उत्पादन :** सरासरी उत्पादन हे ४ श्रमिकांनंतर कमी झाले आहे, तर सीमांत उत्पादन तिसऱ्या श्रमिकानंतर घटत गेले व शेवटी शून्य होऊन आठव्यां श्रमिकानंतर ऋण झाले आहे. अशा प्रकारे उत्पादनाच्या एका घटकात बदल केला, तर उत्पादन परिमाण विशिष्ट मर्यादेपर्यंत वाढेल व त्यानंतर हे कमी होत जाते.

**क) सिमांत उत्पादन :** वरील उदाहरणात सिमांत उत्पादन श्रम भांडवलाच्या आठव्या मात्रेनंतर ऋण होत आहे. कारण व्यवसायामध्ये श्रमभांडवलाच्या मात्रेमध्ये वाढ करण्यावर काही मर्यादा ात. त्यामुळे सिमांत उत्पादन वाढण्याऐवजी ते ऋण होते.




आकृती क्र.३.४

वरील आकृतीत उत्पादन घटकांचे प्रमाण 'अक्ष' अक्षावर तर उत्पादन 'अय' अक्षावर दाखवले आहे. सुरुवातीस श्रमिकांची संख्या म१ पर्यंत वाढत असतांना सीमांत उत्पादन सरासरी व एकूण उत्पादनही वाढते. परंतु म१ नंतर सीमांत उत्पादन घटते, म२ श्रमिकांची संख्या झाली असताना सरासरी व एकूण उत्पादन वाढते म्हणून म२ पर्यंत उत्पादनाची पहिली अवस्था मानली जाते. ही अवस्था त या बिंदूने दर्शवली आहे. पुढे श्रमिकांची संख्या म३ झाली असताना गव्हाचे एकूण उत्पादन सर्वाधिक असते म२ ते म३ पर्यंत दुसरी अवस्था असते. या दुसऱ्या अवस्थेत सीमांत उत्पादन व सरासरी उत्पादन दोन्ही घटू लागते व म३ च्या नंतर तिसऱ्या अवस्थेत सीमांत उत्पादन शून्य होते, तर एकूण उत्पादन व सरासरी उत्पादन घटू लागते.

१. पहिली अवस्था :

पहिल्या अवस्थेमध्ये श्रमाच्या वाढीबरोबर एकूण उत्पादन वाढत जाते, एकूण उत्पादन वाढीबरोबर सरासरी उत्पादन व सिमांत उत्पादन हे वाढत असते. परंतु सिमांत उत्पादन हे 'प' बिंदूनंतर कमी होत जाते.

२. दुसरी अवस्था :

दुसऱ्या अवस्थेचा शेवट 'म३' या बिंदूमध्ये होतो. या अवस्थेमध्ये एकूण उत्पादन घटत्या दराने वाढते. सिमांत उत्पादन आणि सरासरी उत्पादन हे घटत जाते. दुसऱ्या अवस्थेच्या शेवटी बदलत्या घटकाचे सिमांत उत्पादन हे शुन्य असते. एकूण उत्पादन हे महत्त्तम बिंदूपर्यंत वाढते. म्हणून या अवस्थेला घटत्या उत्पादनाची अवस्था असे म्हणतात.

३. तिसरी अवस्था :

तिसऱ्या अवस्थेत एकूण उत्पादनात घट होते. त्यामुळे एकूण उत्पादन वक्र हा खाली येणारा असतो. तसेच या अवस्थेत सिमांत उत्पादन वक्र हा ऋण होतो. अशा प्रकारे उत्पादनाच्या तीन अवस्था स्पष्ट करता येतात.

गृहिते :

बदलत्या प्रमाणाचा नियम हा पुढील गृहित परिस्थितीवर अवलंबून असतो.

**१) उत्पादन तंत्रात कोणताच बदल होत नाही :** या नियमात उत्पादन तंत्रात कोणताच बदल होत नाही असे गृहीत मानण्यात आले आहे. जर उत्पादन तंत्रात बदल झाला तर एकूण उत्पादन, सरासरी व सीमांत उत्पादन यामध्ये बदल होईल.

**२) एक किंवा अनेक घटक स्थिर ठेवले जातात :** या नियमात एक किंवा अनेक घटक स्थिर ठेवले जातात. सर्वच घटक स्थिर ठेवल्यास किंवा सर्वच घटक बदलते ठेवल्यास या सिद्धांताचा अनुभव येणार नाही.

**३) सर्व बदलते घटक एकजिनसी असतात :** बदलते घटक एकजिनसी, एकसारखेच असतात असे या नियमात गृहीत मानण्यात आले आहे. श्रम हा बदलता घटक घेतल्यास सर्व श्रमिक सारखेच असतात म्हणजेच त्यांची कार्यक्षमता, उत्पादन क्षमता सारखीच असते.

**४) अल्पकाळ :** या नियमात केवळ अल्पकाळाचे गृहीत मानून स्पष्टीकरणदिले आहे. अल्पकाळात उत्पादन घटकात फारसा बदल करता येत नाही. दीर्घकाळात सर्वच घटकांच्या प्रमाणात बदल करता येतो.

**५) उत्पादनाचे मापन करता येते :** या नियमात उत्पादनाचे मापन भौतिक एककामध्ये करता येते असे मानण्यात आले आहे जसे १ क्विंटल, टन इत्यादी.

६) **पूर्णस्पर्धा :** पूर्ण स्पर्धेच्या गृहितावर हा नियम आधारित आहे. म्हणूनच उत्पादन घटक एकजिनसी असतात. अल्पकाळाची परिस्थिती गृहीत मानली आहे.

७) **उत्पादन घटक पूर्णपणे विभाजनयोग्य असतात :** उत्पादनाचे स्थिर घटक व बदलते घटक हे विभाजनयोग्य असतात म्हणजे त्याचे विभाजन करता येते असे या नियमात गृहीत मांडले आहे.

टिका :

१. **नविन जमीनीस लागू पडत नाही :** हा विषय नविन जमीनीस लागू पडत नाही कारण नवीन जमीनीची उत्पादन क्षमता अधिक असते म्हणून उत्पादन वाढत जाते.

२. **अधिक भांडवलाने टाळता येतो :** भूमीमध्ये अधिक भांडवलाचा वापर केला तर नियम टाळता येतो.

३. **उत्पादन तंत्रात सुधारणा :** उत्पादन तंत्रात सुधारणा केल्यास वाढते फळ मिळते. अशा प्रकारे टीका केल्या.

**बदलत्या उत्पादन पलाचे महत्त्व :**

घटत्या उत्पादन फलावर काही आक्षेप घेण्यात आले असले, तरी त्यामुळे या सिद्धांताचे अर्थशास्त्रीय महत्व कमी होत नाही. या सिद्धांताचे महत्व पुढील बाबींच्या संदर्भात सांगता येईल.

१) **सर्वसामान्य नियम :** घटत्या उत्पादन फलाचा नियम आधुनिक काळात सर्वमान्य झाला आहे. हा नियम शेतीप्रमाणेच उद्योगातही प्रत्ययास येतो, म्हणून हा नियम सर्वमान्य झाला आहे.

२) **उत्पादनतंत्रात सुधारणा करण्यास चालना :** घटत्या उत्पादन फलाच्या सिद्धांतामुळे उत्पादनतंत्रात सुधारणा करण्यास चालना मिळाली आहे. घटते उत्पादनफल टाळण्यासाठी उत्पादनतंत्रात सुधारणा करुन उत्पादनवाढीचे प्रयत्न होतात.

३) **इतर सिद्धांताचा आधार :** अर्थशास्त्रात 'माल्थसचा लोकसंख्या सिद्धांत' व रिकार्डोचा खंड सिद्धांत याच तत्त्वावर आधारलेला आहे.

४) **सीमांत उत्पादकतेचा आधार :** सीमांत उत्पादकता सिद्धांत या नियमावर आधारित आहे.

अशा प्रकारे आपणास या सिद्धांताचे महत्व सांगता येते. उत्पादनामध्ये एका घटकात बदल करुन इतर घटक स्थिर ठेवले तर घटत्या उत्पादन फलाचा अनुभव येतो. म्हणून बदलत्या प्रमाणाच्या नियमास घटत्या उत्पादन फलाचा नियम असेही संबोधतात.

**३.३ परिमाण प्रत्यय नियम Law of Returns of Scale :**

अल्पकाळामध्ये स्थिर घटकात बदल करता येत नाही. केवळ बदलते घटकच

बदलले जातात. या घटनेचा परिणाम उत्पादन फलावर काय होतो? हे आपण बदलत्या प्रमाणाच्या नियमामध्ये अभ्यासले आहे. दीर्घ काळामध्ये उत्पादनाचे सर्वच घटक बदलले जाऊ शकतात. स्थिर म्हणून मानले जाणारे जमीन, यंत्र, इमारत हे सर्वच घटक अवश्यकतेप्रमाणे दीर्घकाळात बदलता येतात. दीर्घ काळामध्ये उत्पादनाच्या सर्वच घटकात बदल केला असता. उत्पादनावर काय परिणाम होतो? किंवा कोणता उत्पादन संबंध मिळतो याचे विश्लेषण परिमाण प्रत्यय नियमामध्ये केले जाते. परिमाण प्रत्यय नियमाचे विवेचन पुढील प्रमाणे आहे.

**परिणाम प्रत्यय नियम :**

**'दीर्घकाळात उत्पादनाचे सर्वच घटक बदलता येत असताना जो उत्पादन फलन संबंध मिळतो त्यास परिमाण प्रत्यय असे म्हणतात.'**

उत्पादनाच्या सर्व घटकांत बदल करणे हे केवळ दीर्घकाळातच शक्य होते. म्हणून त्यास दीर्घकालीन उत्पादन पलन असेही म्हणतात. परिमाणप्रत्यय नियम हा उत्पादनाच्या सर्व घटकांत त्याचे आपापसातील प्रमाण कायम ठेवून केलेल्या वाढीमुळे उत्पादन मात्रेत होणाऱ्या वाढीचे स्पष्टीकरण देतो.

**'उत्पादनाच्या सर्व घटकात त्यांचे आपापसातील प्रमाण कायम ठेवून वाढ केली तर प्रथम सीमांत उत्पादन वाढत जाते. नंतर ते स्थिर राहते व त्यानंतर ते घटत जाते.'**

या परिमाणप्रत्यय नियमाचे स्पष्टीकरण पुढील तक्त्याच्या आधारे करता येईल.

**तक्ता क्र. ३.२**

| भूमीची मात्रा (एकर) | श्रमिकांची मात्रा (संख्या) | एकूण उत्पादन (क्विंटल) | सीमांत उत्पादन (क्विंटल) |
|---|---|---|---|
| १ | ३ | ६ | ६ वृद्धी |
| २ | ६ | १३ | ७ परिमाण |
| ३ | ९ | २१ | ८ प्रत्यय |
| ४ | १२ | ३० | ९ स्थिर परि. |
| ५ | १५ | ३९ | ९ प्रत्यय |
| ६ | १८ | ४७ | ८ ऱ्हासमास |
| ७ | २१ | ५३ | ६ परि.प्रत्यय |


परिमाण प्रत्यय नियमांचे स्पष्टीकरण करण्यासाठी वरील तक्त्यात भूमी व श्रम हे दोनच उत्पादनाचे घटक मानले आहेत. भूमी आणि श्रम यांचे आपापसातील प्रमाण १:३ आहे. एक एकर जमीन असतांना तीन श्रमिक वापरले, तर एकूण उत्पादन सहा क्विंटल मिळते. याप्रमाणे उत्पादनाच्या घटकांत वाढ केली तर भूमीच्या तिसऱ्या घटकांपर्यंत

सीमांत उत्पादन वाढते. यालाच वृद्धी परिमाण प्रत्यय नियम म्हणतात.

भूमीच्या चौथ्या मात्रेपासून १:३ या प्रमाणात भूमी व श्रमिकांच्या संख्येत वाढ केली तर सीमांत उत्पादन पाचव्या मात्रेपर्यंत स्थिर होते. त्यात वाढ होत नाही. या स्थितीस स्थिर परिमाण प्रत्यय नियम म्हणतात.

भूमीच्या सहाव्या मात्रेपासून १:३ या प्रमाणातच स्त्री व श्रमीकामध्ये बदल केला तर सीमांत उत्पादन घटत जाते. यालाच ऱ्हासमान परिमाण प्रत्यय नियम म्हणतात.

परिमाण प्रत्यय नियमाचे स्पष्टीकरण बाजुच्या आकृतीच्या सहाय्याने करता येईल.




आ.क्र. ३.५

वरील आकृतीत 'अक्ष' अक्षावर श्रम व भांडवलाची मात्रा घेतली आहे, तर 'अय' अक्षावर सीमांत उत्पादन घेतले आहे. भूमी व श्रम या उत्पादन घटकांचे आपापसातील प्रमाण १:३ हे कायम ठेवून जर घटकांत वाढ केली तर उत्पादनात 'ब' पर्यंत वाढ होते. याच प्रमाणात उत्पादन घटकांचे प्रमाण 'प' पर्यंत वाढवले तर सीमांत उत्पादन स्थिर राहते प२ नंतर घटत जाते.

**निष्कर्ष :**

उत्पादन घटकांचे आपापसातील प्रमाण कायम ठेवून त्यामध्ये वाढ केली तर एकूण उत्पादन वाढत जाते, परंतु सीमांत उत्पादन काही काळ वाढते, त्यानंतर ते स्थिर राहते व शेवटी ते घटत जाते. हे सर्व वरील आकृतीत दाखवले आहेत, हे तिन नियम वेगळेही दाखवता येतात.

यावरुन परिमाण प्रत्यय नियमांचे तीन भाग पडतात.

अ) वृद्धी परिमाण प्रत्यय नियम. (घटत्या खर्चाचा नियम)

ब) स्थिरपरिमाण प्रत्यय नियम. (स्थिर खर्चाचा नियम)

क) ऱ्हासमान परिणाम प्रत्यय नियम. (वाढत्या खर्चाचा नियम)

अशा प्रकारे परिणाम प्रत्यय नियमावरुन वरील तीन नियम तयार होतात.

७. दळणवळणाच्या सोयीत वाढ झाल्यामुळे मिळणारे फायदे :

उत्पादन संस्थेचा व्याप वाढला किंवा एकाच ठिकाणी उद्योगाचे केंद्रीकरण झाले असता स्थानिक संस्था किंवा सरकारतर्फे दळणवळणाच्या साधनात वाढ केली जाते. दळणवळणाची साधने वाढल्यामुळे उत्पादन संस्थेला कच्चा माल वेळेवर उपलब्ध होऊ लागतो. त्याचप्रमाणे पक्का माल सहजतेने विक्रीस पाठवता येऊ शकतो. त्यामुळे उत्पादन संस्थेस उत्पादन क्रियेत सुलभता निर्माण होते आणि उत्पादनात वाढ होते.

**८. प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेचे फायदे :**

उत्पादन संस्थांचा व्याप वाढत असतांना संस्थांना लागणाऱ्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था संस्थेच्या परिसरात वाढू लागतात. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा पुरवठा मुबलक प्रमाणात झाल्याने उत्पादनाचा वेग जास्त प्रमाणात वाढू लागतो.

अशा प्रकारे उत्पादनात उत्पादन पेढीचा आकार वाढत असतांना अंतर्गत व बाह्य बचती निर्माण होत असतात.

## ३.५ खर्च संकल्पना (Concept of Cost) :

प्रत्येक उत्पादक हा नफा मिळवण्यासाठी वस्तुच्या उत्पादनाकडे विशेष लक्ष देत असतो. किंबहुना नफा मिळवणे हेच उत्पादकाचे मुख्य लक्ष असते. प्रत्येक उत्पादक आपल्या व्यवसायात उत्पादन किती होईल हे पाहण्यापेक्षा उत्पादनापासून नफा किती मिळेल याकडे अधिक लक्ष देत असतो. उत्पादन प्रक्रियेमध्ये नफा हा उत्पादन खर्चावर अवलंबून असतो. उत्पादन खर्चामध्ये वारंवार वाढ होत असेल तर त्याचा प्रतिकूल परिणाम नफ्यावर होत असतो. तसेच उत्पादन खर्च हा वस्तुची किंमत ठरविण्याच्या दृष्टीकोणातूनही महत्वाचा असतो.

**उत्पादन खर्च :**

वस्तुच्या उत्पादनासाठी वेगवेगळ्या घटकांची आवश्यकता असते. या सर्व घटकांना भूमी, श्रम, भांडवल व संयोजन या चार भागात विभागले जाते. म्हणजेच उत्पादक वस्तुचे उत्पादन करत असतांना वरील उत्पादन घटकांच्या सहकार्याने तो वस्तुमध्ये उपयोगीता निर्माण करत असतो किंवा वस्तुतील उपयोगीतेमध्ये वाढ करत असतो. उत्पादन प्रक्रियेमध्ये उत्पादक उत्पादन घटकांचा वापर करतो तसेच कच्चा माल, वीज, पाणी, वाहतूक अशा वेगवेगळ्या घटकांची मदत घेतो. या सर्व घटकांना त्यांच्या वापराबद्दल मोबदला द्यावा लागतो. वरील सर्व घटकांना दिलेल्या मोबदल्यांची बेरीज केली तर त्यास उत्पादन खर्च असे म्हणतात. वस्तुचा उत्पादन खर्च हा वस्तुच्या उत्पादन वाढीबरोबर सतत होत असतो. एकूणच **वस्तु उत्पादन खर्च म्हणजे उत्पादनासाठी करावा लागणारा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खर्च होय.**

## उत्पादन खर्चाचे वर्गीकरण (Classification of Costs) :

अर्थशास्त्रज्ञांनी उत्पादन खर्चाच्यातीन संकल्पना मांडल्या आहेत.

अ) वैयकल्पीक खर्च

ब) वास्तव उत्पादन खर्च

क) पैशातील उत्पादन खर्च.

## अ. वैयकल्पीक खर्च (संधी खर्च) (Opportunity Cost) :

वस्तु उत्पादनाची साधने ही पर्यायी उपयोगाची असतात. म्हणजे एखाद्या साधनाचे वेगवेगळे उपयोग असतात. पण ते एका वेळी एकाच कार्यासाठी वापरता येते. उदा. विशिष्ट जमिनीवर एका हंगामामध्ये एकच पिक घेता येते. एकाच वेळी ज्वारी आणि गहू या दोन्हींची पेरणी करता येत नसते. यालाच वैकल्पीक उपयोग असे म्हणतात. म्हणजेच एखादे उत्पादनाचे साधन एकाच कार्यासाठी वापरले तर त्यास दुसऱ्या कार्याचा त्याग करावा लागतो. यामुळे जे नुकसान होते ते नुकसान त्या विशिष्ट उपयोगाचा वैकल्पीक खर्च असते.

**वैयकल्पीक खर्चाचा अर्थ :**

एखाद्या उत्पादनाचा घटक विशिष्ट वस्तुच्या उत्पादनासाठी उपयोगात आणला तर त्या घटकाच्या इतर वैकल्पिक उपयोगाचा त्याग करावा लागतो. हा त्याग म्हणजेच वैकल्पिक खर्च होय. किंवा 'एखादा उत्पादन घटक विशिष्ट उद्योगात किंवा व्यवसायात टिकून राहावा म्हणून त्यावर जो खर्च करावा लागतो. त्यास वैकल्पीक खर्च असे म्हणतात.' असे विवेचन सौ. जॉन रॉबिन्सन यांनी केले आहे.

उदा. दोन एकर शेत जमीनीवर ज्वारीचे उत्पन्न घेतले तर त्यापासून मिळणारे उत्पन्न रुपये २००० आहे. आणि जर त्याच जमीनीपासून गव्हाचे उत्पादन घेतले तर त्यापासून २५०० रुपयाचे उत्पन्न मिळते. या उदाहरणात ज्वारीचे उत्पादन घेऊन गव्हाच्या उत्पादनाचा त्याग केला तर ५०० रुपये नुकसान होते. आणि ज्वारीच्या उत्पादनाचा त्याग करुन गव्हाचे उत्पादन घेतले तर ५०० रुपये अधिक मिळतात. म्हणून येथे ज्वारीच्या उत्पादनाचा वैकल्पीक खर्च हा २५०० रुपये आहे. असे म्हणता येईल. वैयकल्पीक व्यय हा आर्थिकदृष्ट्या अधिक महत्वाचा असतो. कारण हा व्यय उत्पादक घटकाचा योग्य वापर कसा करता येईल. याची कल्पना उत्पादकास देत असतो. वैकल्पिक व्ययालाच संधी खर्च, विस्थापीत खर्च किंवा बदली खर्च असे म्हणतात.

**वैकल्पिक खर्चाचे महत्व :**

वैकल्पिक खर्चाचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येते.

१) आर्थिकदृष्ट्या विचार केल्यास हा खर्च जास्त महत्त्वाचा आहे. कारण हा खर्च उत्पादन घटकांचा योग्य वापर कसा करता येईल याची कल्पना उत्पादकास देत असतो.

२) उत्पादन घटकांचा मोबदला ठरविताना वैकल्पिक खर्चाचा उपयोग होतो.

३) अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा खर्च महत्त्वाचा आहे. कारण अर्थव्यवस्थेत उपलब्ध उत्पादन घटकापासून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करावयाचे असेल तर सर्व घटक योग्य प्रमाणात उपयोगात आणले पाहिजेत. म्हणजेच ज्या उपयोगात उत्पादन घटक वापरले असतील त्या उपयोगात त्यांना त्या वैकल्पिक खर्चाएवढे उत्पन्न मिळाले पाहिजे.

४) उपभोग, आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादी क्षेत्रात वैकल्पिक खर्चाची कल्पना महत्त्वपूर्ण आहे.

**मर्यादा :**

वैकल्पिक खर्चाच्या पुढील मर्यादा आहेत.

**१. केवळ एकाच कार्यासाठी वापरले जाणारे उत्पादन घटक :**

उत्पादन घटक केवळ एकाच कामासाठी वापरले जात असतील तर अशा घटकांना वैकल्पिक खर्चाची संकल्पना लागू पडत नाही. कारण अशा घटकांना पर्याय उपलब्ध नसतो. त्यांचा वैकल्पिक खर्च शून्य असतो.

**२. पूर्ण स्पर्धेचे गृहित :**

वैकल्पिक खर्चाच्या कल्पनेत, उत्पादन घटकांच्या बाजारपेठेत पूर्ण स्पर्धेची स्थिती गृहित मानली आहे. प्रत्यक्षात पूर्ण स्पर्धेची परिस्थिती नसते. परिणामी पूर्ण स्पर्धेचे गृहित प्रत्यक्षात नसल्याने वैकल्पिक खर्च मोजण्यात अडचणी निर्माण होतात.

**३. उत्पादन घटकास विशिष्ट उद्योगाबद्दल वाटणारे आकर्षण :**

जर उत्पादन घटकांना एखाद्या विशिष्ट उद्योगाबाबत आकर्षण असेल तर दुसऱ्या उद्योगात जाण्यास ते मुळीच तयार होणार नाहीत. तेव्हा अशा परिस्थितीत उत्पादन घटकांचा वैकल्पिक खर्च मोजणे शक्य नसते.

**४. उत्पादन घटकांची गतीक्षमता :**

उत्पादन घटक जर एका उद्योगातून दुसऱ्या उद्योगात जाऊ शकत असतील तरच वैकल्पिक खर्च मोजता येईल. परंतु उत्पादन घटक गतीशील नसतील तर अशावेळी त्यांच्याशी संबंधित वैकल्पिक खर्चाची कल्पना महत्वाची राहणार नाही.

**५. दीर्घ काळात उपयुक्त नाही :**

रॉबिन्स यांच्या मते वैकल्पिक खर्चाची कल्पना दीर्घ काळात सिद्ध होऊ शकत नाही.

अशा प्रकारे वैकल्पिक खर्चावर वेगवेगळ्या मर्यादा आहेत. असे असले तरीही या

मर्यादेमुळे वैकल्पिक खर्चाचे उत्पादन प्रक्रियेतील महत्त्व कमी होत नाही.

ब) वास्तव उत्पादन खर्च (Real cost of production) :

वास्तव उत्पादन खर्च हाही उत्पादनामध्ये महत्वाचा घटक आहे. **वास्तव उत्पादन खर्च म्हणजे उत्पादक घटनांनी उत्पादन प्रक्रियेत केलेले कार्य किंवा त्यांनी केलेल्या त्यागांची बेरीज होय.** उदा. वस्तुचे उत्पादन करत असतांना एखाद्या कामगाराला जो त्रास किंवा कष्ट सहन करावे लागते. तसेच एखाद्या भांडवलदारास व्यवसायामध्ये भांडवल गुंतवूण त्यापासून मिळणाऱ्या मोबदल्याची वाट पहावी लागते. अशा प्रकारचा जो त्रास व्यवसायात असतो. त्यास वास्तव उत्पादन खर्च असे म्हणतात. वास्तव उत्पादन खर्चाची संकल्पना डॉ. मार्शल यांनी पुढील प्रमाणे स्पष्ट केली आहे. **'एखाद्या वस्तुच्या उत्पादन प्रक्रियेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गुंतलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या श्रमिकांना जे कष्ट करावे लागतात ते कष्ट आणि त्याचबरोबर उत्पादनासाठी आवश्यक असणारे भांडवल बचतीच्या मार्गाने उपलब्ध करुन देण्यासाठी केलेल्या उपभोगाचा त्याग हे सर्व प्रयत्न व त्याग म्हणजेच त्या वस्तुचा वास्तव उत्पादन खर्च होय.**

वरील व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की, वस्तु उत्पादन प्रक्रियेमध्ये जे शारीरिक आणि मानसिक कष्ट होतात. त्यालाच वास्तव उत्पादन खर्च असे म्हणतात. उत्पादन प्रक्रीयेमध्ये वास्तव उत्पादन खर्च हा महत्वाचा मानला जातो.

वास्तव उत्पादन खर्चावरील टिका :

**१) हा खर्च मोजता येत नाही :** वास्तव उत्पादन खर्च श्रमिकांनी केलेला त्याग उत्पादन घटकांनी घेतलेला त्रास यावर अवलंबून असतो. या त्रासाची आणि त्यागाची मोजदात करता येत नाही. म्हणून वास्तव उत्पादन खर्च हे मोजता येत नाही.

**२) त्यागाप्रमाणे मोबदला मिळत नाही :** वास्तव उत्पादन खर्च संकल्पनेप्रमाणे त्यागानुसार मोबदला मिळावा लागतो. म्हणजे अधिक त्याग असेल तर अधिक मोबदला, कमी त्याग असेल तर कमी मोबदला परंतु प्रत्यक्ष व्यवहारात प्रत्येक घटकाला त्यागानुसार मोबदला मिळत नाही.

**३) श्रमाची तुलना करता येत नाही :** वास्तव उत्पादन खर्च संकल्पनेमध्ये उच्च दर्जाचे श्रम, कमी दर्जाचे श्रम अशी तुलना केली जाते. परंतु प्रत्यक्षामध्ये अशी तुलना करता येत नसल्याने श्रमिकांच्या त्रासाचे मोजमाप करता येत नाही.

अशा प्रकारे वास्तव उत्पादन खर्च मोजण्यात अडचणी निर्माण होतात.

क. पैशातील उत्पादन खर्च (मौद्रिक खर्च) (Money cost of Production) :

कोणत्याही वस्तुचे उत्पादन करण्यासाठी उत्पादन घटकांची जमवाजमव करुन उत्पादन प्रक्रिया घडवून आणावी लागते. म्हणजेच उत्पादन प्रक्रियेमध्ये उत्पादन घटक

वापरावे लागतात. या उत्पादन घटकाला मोबदला द्यावा लागतो. या सर्व मोबदल्यांच्या बेरजेस पैशातील उत्पादन खर्च असे म्हणतात. आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन घटकाचे सर्व मोबदले पैशाच्या स्वरुपात दिले जातात. म्हणून उत्पादन खर्चाचे मोजमापही पैशाच्या सहाय्यानेच केले जाते. उदा. कच्चा मालावरील खर्च, यंत्र इतर साधने, घसारा, इंधनखर्च, सरकारचे कर इत्यादींचा समावेश पैशातील उत्पादन खर्चामध्ये होतो.

डॉ. मार्शल यांच्या मते, **एखाद्या उद्योग संस्थेला एखाद्या वस्तुचे उत्पादन करण्यासाठी पैशाच्या स्वरुपात जो खर्च येतो, तोच पैशातील उत्पादन खर्च किंवा मौद्रिक उत्पादन असतो.** उदा. कामगार, व्यवस्थापक इत्यादींचे पगार, कच्चा माल, इंधन इत्यादी खरेदीवरील खर्च, विमा, वाहतूक, जाहिरात इत्यादीवरील खर्चाचा समावेश पैशातील उत्पादन खर्चात होतो. पैशातील उत्पादन खर्चालाच मुद्रेतील उत्पादन खर्च असेही म्हणतात.

## ३.६ खर्च व उत्पन्न वक्र आणि त्यांच्यातील परस्पर संबंध :

## Cost and Revenue Curves and their inter-relationship :

### अल्पकाळ व दीर्घकाळ (Short Term and Long Run) :

उत्पादन खर्चाचा अभ्यास करत असतांना काळाचाही विचार करणे अवश्य आहे. काळाचे दोन भागात वर्गीकरण केले जाते.

### १. अल्पकाळ :

अल्पकालखंड म्हणजे असा कालखंड की, ज्या कालखंडामध्ये उत्पादनाच्या स्थिर घटकात कोणताही बदल करता येत नाही. केवळ बदलत्या घटकामध्ये बदल करता येतो असा कालखंड होय. म्हणजेच अल्पकालखंडात वस्तुचे उत्पादन वाढवण्यासाठी यंत्र, इमारत इत्यादी स्थिर घटकात बदल करता येत नाही. केवळ बदलत्या घटकामध्ये म्हणजे कामगार, कच्चा माल इत्यादी मध्येच बदल करता येतो. या कालखंडात वस्तुची मागणी वाढली तरी एका मर्यादेपर्यंतच पुरवठा वाढविता येतो. त्यापेक्षा अधिक पुरवठ्यात वाढ करता येत नाही.

### २. दीर्घकाळ :

दीर्घकालखंड म्हणजे असा कालखंड की, या कालखंडात उद्योगसंस्थेला सर्वच उत्पादन घटकात बदल करुन उत्पादनात वाढ करणे शक्य असते. म्हणजेच दीर्घ कालखंडात उत्पादनाच्या स्थीर घटकात व बदलत्या घटकात दोन्ही मध्येही बदल करणे शक्य असते. यामुळे दीर्घ काळात सर्वच घटक हे बदलणारे असतात. परिणामी मागणी प्रमाणे पुरवठ्यात बदल करता येणे शक्य असते.

अशा प्रकारे उत्पादन प्रक्रियेमध्ये कालखंडाचे दोन भागात वर्गीकरण केले आहे. अल्प कालखंडामध्ये उत्पादनाचे कांही घटक स्थिर मानले तर बदलत्या घटकात

बदल केला तर वस्तु उत्पादन वाढविता येते. उत्पादनात होणाऱ्या बदलानुसार अल्पकाळात खर्च कसा बदलत जातो. हे आपणास अल्पकाळातील वेगवेगळ्या खर्च वक्राच्या स्पष्टीकरणावरुन लक्षात येते. तसेच अल्पकाळात स्थिर घटक व बदलते घटक यांचा विचार करुन यासंबंधी कांही काल्पनिक संख्या घेतल्या तर या संख्येवरुन आपणास उत्पादनातील एकूण खर्च सरासरी खर्च व सिमांत खर्च इत्यादी वक्रांचे स्पष्टीकरण होते. हे स्पष्टीकरण पुढील तक्त्यात दर्शवले आहे.

तक्ता क्र. ३.३


| उत्पादनाचे नग | एकूण स्थिर खर्च TFC | एकूण बदलता खर्च TVC | एकूण उत्पादन खर्च TC | सरासरी स्थिर खर्च AFC | सरासरी बदलता खर्च AVC | सरासरी उत्पादन खर्च AC | सिमांत उत्पादन खर्च MC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | (2+3) | (2÷1) | (3÷1) | (5+6) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | १०.०० | २.०० | १२.०० | १०.०० | २.०० | १२.०० | — |
| २ | १०.०० | ३.८० | १३.८० | ५.०० | १.९० | ६.९० | १.८० |
| ३. | १०.०० | ५.३० | १५.३० | ३.३० | १.८० | ५.१० | १.५० |
| ४ | १०.०० | ६.४० | १६.४० | २.५० | १.६० | ४.१० | १.१० |
| ५ | १०.०० | ७.५० | १७.५० | २.०० | १.५० | ३.५० | १.१० |
| ६ | १०.०० | ९.६० | १९.६० | १.६० | १.६० | ३.२० | २.१० |
| ७ | १०.०० | १२.८० | २२.८० | १.४० | १.८० | ३.२० | ३.२० |
| ८ | १०.०० | १७.२० | २७.२० | १.२० | २.१० | ३.४० | ४.४० |
| ९ | १०.०० | २३.३० | ३३.३० | १.१० | २.६० | ३.७० | ६.१० |
| १० | १०.०० | ३०.०० | ४०.०० | १.०० | ३.०० | ४.०० | ६.७० |

वरील तक्त्यामध्ये अल्पकाळातील वेगवेगळ्या उत्पादन खर्चाची विभागणी दर्शवली आहे. हे सर्व खर्च पुढील प्रमाणे वेगवेगळे असून त्यांचे वक्र हे विश्लेषणानंतर दिलेले आहेत.

**एकूण स्थिर खर्च Total Fixed Cost (TFC) :**

उत्पादनामध्ये वाढ किंवा घट झाली असती जो खर्च बदलत नाही किंवा स्थिर असतो. त्यास स्थिर खर्च असे म्हणतात. उत्पादन संस्थेची इमारत यंत्र सामुग्री इत्यादीवर दिला जाणारा खर्च हा स्थिर खर्च असतो. तसेच उत्पादन संस्थेचे उत्पन्न शुन्य असेल तरीही स्थिर खर्च करावाच लागतो. यावरुन उत्पादन व स्थिर खर्च यांच्यात परस्पर

संबंध नसतो असे स्पष्ट होते. डॉ. मार्शल यांनी स्थिर खर्चाला पूरक खर्च असेही म्हटले आहे. स्थिर खर्चामध्ये वैकल्पिक खर्च आणि सामान्य नफा यांचा समावेश असतो. हा खर्च वरील तक्त्यात दुसऱ्या कॉलममध्ये दर्शवला आहे.




आ.क्र. ३.६


वरील आकृती अय अक्षावर स्थिर आहे तर अक्ष अक्षावर उत्पादन दर्शवते आहे. उत्पादनाच्या वेगळ्या पातळीला $क_{१}ड_{१}$ हे बिंदू र्च दर्शवतात. ते जोडले तर $बब_{१}$ हा एकूण स्थिर खर्च वक्र येईल. उत्पादनात झालेल्या बदलाचा परिणाम स्थिर खर्चावर होत नाही म्हणून स्थिर खर्च हा अक्ष अक्षास समांतर असतो.

**सरासरी स्थिर खर्च : Average Fixed Cost (AFC) :**

उत्पादनामध्ये बदल झाला तर स्थिर खर्चात बदल होत नाही. हे आपण वरील मुद्यामध्ये पाहिले आहे. असे असतांना उत्पादनात जशी वाढ होत जाते. त्याप्रमाणात सरासरी स्थिर खर्च कमी किंवा अधिक होत असतो. कारण पूर्वीच्याच स्थिर खर्चामध्ये कमी किंवा अधिक उत्पादन होऊ शकते. उदा. दहा वस्तुचा उत्पादन खर्च शंभर रुपये आहे असे गृहीत धरुन उत्पादनात वाढ केली आणि हे उत्पादन २० नगाचे झाले तर सरासरी स्थिर खर्च रुपये ५० येईल. या उदाहरणामध्ये वस्तुचे उत्पादन करण्यासाठी उत्पादकाला इमारत किंवा यंत्रसामुग्री या स्थिर खर्चामध्ये बदल करावा लागत नाही. म्हणून उत्पादन वाढले तरी स्थिर खर्च विशिष्ट परिमाणापर्यंत हा कायम असतो. हा खर्च पुढील सुत्राने काढतात.

$$\text{सरासरी स्थिर खर्च} = \frac{\text{एकूण खर्च}}{\text{एकूण उत्पादन}}$$

वरील सुत्राप्रमाणे जर सरासरी स्थिर खर्च काढला तर त्यापासून मिळणारा वक्र पुढील प्रमाणे येईल.





आ.क्र.३.७

वरील आकृतीमध्ये अय अक्षावर सरासरी स्थिर खर्च अक्ष अक्षावर उत्पादन दर्शवले आहे. सख हा सरासरी स्थिर खर्च आहे. तो उत्पादनाचा वेगवेगळ्या पातळीला कमी कमी होतो म्हणून सरासरी स्थिर खर्चाचा (वक्र) आकार डावीकडून उजवीकडून वरुन खाली येणारा असतो. म्हणजेच हा ऋण आकाराचा असतो.

**एकूण बदलता खर्च Total Variable Cost (TVC) :**

एकूण बदलता हा उत्पादनातील एक महत्वाचा खर्च आहे. बदलत्या उत्पादन खर्चाला प्रधान खर्च किंवा प्रत्यक्ष खर्च असेही म्हणतात. एकूण बदलता खर्च हा उत्पादनात होणाऱ्या बदलानुसार बदलत असतो. म्हणून या खर्चाला बदलता खर्च असे म्हणतात. बेनहॅम यांच्या मते, **'उत्पादनाच्या आकारानुसार जे खर्च बदलतात त्यांना बदलते खर्च म्हणतात.'**

उत्पादनात वाढ झाली तर बदलत्या खर्चात वाढ होते आणि उत्पादनात घट झाली तर बदलता खर्च कमी होतो, कारण उत्पादनातील बदलानुसार कच्चा माल, इंधन इत्यादीमध्ये बदल करावा लागतो. म्हणूनच बदलता खर्च हा उत्पादनाप्रमाणे बदलत असतो.




आ.क्र.३.८

अक अक्षावर 'रब' खर्च दर्शवला आहे. 'अय' अक्षावर उत्पादन दर्शवले आहे. 'यबख' उत्पादन वाढीबरोबर वाढत जातो तो 'बख' ने दर्शवला आहे. एकूण बदलता

खर्च वक्र धन आकाराचा असतो. वरील तक्त्यात कॉलम नं. ३ मध्ये दर्शवला आहे.


**सरासरी बदलता खर्च Average Variable Cost (AVC) :**

जो खर्च एकूण बदलत्या खर्चाला एकूण उत्पादित नगसंख्येने भाग दिल्यास मिळतो. त्यास सरासरी बदलता खर्च म्हणतात.

सुत्र -

$$\text{सरासरी बदलाता खर्च} = \frac{\text{एकूण बदलता खर्च}}{\text{एकूण नग}}$$

उत्पादनामध्ये सरासरी बदलता खर्च हा महत्वाचा असतो कारण सरासरी बदलता खर्च उत्पादनाच्या वेगवेगळ्या पातळीला वेगवेगळा असतो. तसेच उत्पादनात ज्या प्रमाणात वाढ होत जाईल. तसतसा हा खर्च विशिष्ट मर्यादेपर्यंत कमी होतो. व त्यानंतर तो वाढत जातो. उत्पादन जर शुन्य असेल तर सरासरी बदलता खर्चही शुन्य असतो. हे पुढील आकृतीत दाखवले आहे.





आ.क्र.३.९

वरील आकृतीत 'अक्ष' अक्षावर 'सबख' तर 'अक्ष' अक्षावर उत्पादन दर्शवले आहे. 'सख' हा सरासरी बदलता आहे. हा खर्च उत्पादन वाढीबरोबर 'ब' पर्यंत कमी होत असेल तर पुन्हा उत्पादन वाढीबरोबर 'ख' बिंदूपर्यंत वाढत जातो. सामान्यतः सरासरी बदलत्या खर्चवक्राचा आकार हा इंग्रजीत पसरट 'यु' आकाराचा असतो. किंवा बशीसारखा असतो.

**दीर्घकालीन सरासरी खर्च :**

दीर्घकालीन सरासरी खर्च हा उत्पादनामध्ये उत्पादकाच्या दृष्टीने अधिक महत्वाचा असतो. कारण दीर्घकालीन सरासरी खर्चामुळे उत्पादकाला उत्पादनाचे निर्णय घेण्यासंबंधी मार्गदर्शन मिळते. दीर्घकालीन एकूण खर्चाला उत्पादित नगसंख्येने भागले असते. दीर्घकालीन सरासरी खर्च येतो. दीर्घकाळ हा अनेक अल्पकाळांचा समुह असतो असे मानले जाते.

यावरुन दीर्घकाळ म्हणजे अनेक अल्पकाळाची बेरीज असेही म्हंटले जाते. दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र हा अनेक अल्पकालीन सरासरी खर्च वक्र मिळून तयार झालेला असतो. अल्पकाळात स्थिर घटकात बदल करता येत नाही. परंतु दीर्घकाळामध्ये उत्पादन वाढीबरोबर स्थिर घटकातही बदल करता येतो. दीर्घकाळात स्थिर घटकांचा संपूर्ण वापर होईल असे निश्चित नसते. दीर्घकाळात उत्पादनाचे प्रमाण कमी असेल तर कांही यंत्रे त्यांच्या कार्यक्षमतेपेक्षा कमी प्रमाणात वापरली जातात. आणि दीर्घकाळात मर्यादेपेक्षा उत्पादन वाढले तर या स्थितीत या यंत्राच्या कार्यक्षमतेचा अतिरिक्त वापरही केला जातो. दीर्घकालीन सरासरी खर्चवक्र हा निरनिराळ्या अल्पकालीन सरासरी खर्च वक्राला संवेष्टन करुन घेणारा एक वक्र असतो. म्हणून या वक्राला संवेदनवक्र (EnvelopeCurve) असेही म्हणतात. दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र हा 'U' या आकाराचा असतो. हा आकार अल्पकालीन सरासरी वक्रापेक्षा अधिक पसरट (Flate) असतो. ते पुढील आकृतीत दाखवले आहे.





आ.क्र.३.१०

**दीर्घकालीन सिमांत खर्च :**

अल्पकाळाच्या दृष्टीने विचार केला तर अल्पकाळामध्ये एकूण खर्चात कांहीच बदल होत नसतो. तर फक्त बदलत्या खर्चामध्येच बदल होत असतो. त्यामुळे अल्पकाळात एकूण बदलत्या खर्चात वस्तुचा एक नग अधिक उत्पादन केल्यामुळे जी भर पडते त्यास सिमांत उत्पादन खर्च असे संबोधले जाते. अशा प्रकारेही सिमांत उत्पादन खर्चाची वेगळी व्याख्या केली जाते.

एकूण उत्पादन खर्चात वस्तूचा १ नग अधिक उत्पादन केल्यास जी भर पडते. त्यास सिमांत उत्पादन खर्च असे म्हणतात. दीर्घकालीन सिमांत उत्पादन खर्चवक्र हा दीर्घकालीन सरासरी खर्चवक्राप्रमाणेच 'यु' आकाराचा असतो. तसेच दीर्घकालीन सिमांत खर्च वक्र हा अल्पकालीन सरासरी खर्च वक्राप्रमाणेही असतो. कारण दीर्घकाळात सर्व उत्पादन घटक हे बदलता येतात. म्हणून दीर्घकाळामध्ये उत्पादन खर्चात वेगाने वाढ होत

नाही. म्हणून या खर्चाच्या वक्राचा आकार हा पसरट बशीप्रमाणे असतो. तो पुढील आकृतीत दाखवला आहे.




आ.क्र.३.११

वरील आकृतीमध्ये दीसीख हा दीर्घकालीन सिमांत खर्चवक्र असून तो 'यु' आकाराचा परंतु पसरट असतो. कारण हा खर्च एका विशिष्ट मर्यादिपर्यंत घटत जातो. नंतर तो स्थिर राहतो. परंतु पुढे 'प' बिंदूपासून वाढत जातो.

**दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र U आकार असण्याची कारणे :**

दीर्घकालीन सरासरी खर्चवक्र हा अल्पकालीन सरासरी खर्च वक्राप्रमाणेच 'U' आकाराचा असतो. केवळ हा 'U' आकार पसरट असतो. हा आकार प्राप्त होण्याची कारणे अल्पकालीन सरासरी व्ययवक्र 'U' आकार देणाऱ्या कारणापेक्षा भिन्न आहेत. या दीर्घकालीन खर्चवक्राच्या 'U' आकाराची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**१. परिमाण प्रत्यय नियम :**

दीर्घकालीन सरासरी खर्च वक्राचा आकार इंग्रजी U या अक्षराप्रमाणे असण्याचे कारण म्हणजे उत्पादन प्रमाण फलाच्या सिद्धांताचा अनुभव होय. या सिद्धांतानुसार सुरुवातीस वाढत्या, स्थिर आणि नंतर घटत्या उत्पादन फलाचा अनुभव येतो. वाढत्या उत्पादनाचा म्हणजे घटत्या खर्चाचा स्थिर उत्पादनाचा म्हणजेच स्थिर खर्चाचा व घटत्या उत्पादनाचा म्हणजे वाढत्या खर्चाचा सिद्धांत लागू होतो. अशा प्रकारे सुरुवातीस उत्पादन खर्चात घट झाल्यामुळे, नंतर खर्चात वाढ झाल्यामुळे दीर्घकालीन सरासरी खर्चवक्र U आकाराचा असतो.

**२. उत्पादन घटकांची अविभाज्यता :**

उत्पादन घटक अविभाज्य असल्यामुळे सुरुवातीस या घटकांचा पूर्ण उपयोग होत नाही. त्यामुळे सुरुवातीस उत्पादन खर्च जास्त असतो. परंतु उत्पादन जसे वाढू लागते तसे या घटकांचा जादा उपयोग होऊ लागतो. जादा उपयोगामुळे उत्पादन घटकावर ताण पडतो. त्यामुळे ते चांगल्या प्रकारे कार्य करु शकत नाहीत. त्यामुळे विशिष्ट मर्यादेनंतर

उत्पादन वाढविण्यास उत्पादन खर्च वाढतो. सुरुवातीला खर्चात घट आणि नंतर वाढ झाल्यामुळे सरासरी खच्रवक्राला U हा आकार प्राप्त होतो.

३. प्रो. चेंबरलीन यांची कारणमिमांसा :

चेंबरलीन यांच्या मते उत्पादन खर्चवक्रास U आकार प्राप्त होण्याचे कारण म्हणजे व्यवस्थापन पद्धती होय. उत्पादन कमी असतांना व्यवस्थापन पद्धतीवर येणारा खर्च जास्त असतो. परंतु उत्पादन वाढीबरोबर व्यवस्थापनावर होणारा खर्च कमी होत जातो. कारण: आधुनिक पद्धतीचे व्यवस्थापन तंत्र, श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचा वापर केला जातो. या सर्वामुळे उत्पादन वाढीचा वेग वाढतो. संस्थेला विविध प्रकारच्या बचती किंवा लाभ मिळू लागतात. परिणामी सुरुवातीस उत्पादन वाढत असतांना दीर्घकालीन सरासरी खर्च कमी होऊ लागतो.

श्रमविभागणी जसजशी वाढत जाते तसे निरनिराळ्या श्रमिकांच्या कार्यावर लक्ष ठेवणे व्यवस्थापकास कठीण जाते. विविध विभागाशी असलेले सुसूत्रीकरण कमी होऊ लागते. या सर्वांचा परिणाम म्हणजे कामाचा वेग कमी होतो. त्यामुळे संस्थेला अबचती प्राप्त होऊ लागतात. त्याचा परिणाम म्हणून दीर्घकालीन सरासरी खर्च वाढत जातो.

४. संयोजकाचा मर्गादित पुरवठा :

उत्पादनात संयोजक असा एक घटक आहे की, जो उत्पादन क्रियेचे नियंत्रण करतो. उत्पादनाची जबाबदारी स्वीकारणारा घटक आहे. उत्पादनवाढीसाठी निर्णय घेत असतो. उत्पादनात वाढ होत असतांना या घटकाच्या पुरवठ्यात वाढ करता येत नाही. उत्पादन वाढीत संयोजक हा स्थिर घटक असतो. तर श्रम, भांडवल आणि भूमी हे बदलते घटक असतात. त्यामुळे दीर्घकाळात संयोजकाच्या मर्यादित पुरवठ्यामुळे उत्पादनाचे विश्लेषण हे बदलत्या प्रमाणाच्या सिद्धांताचे एक रुप मानले आहे. या सिद्धांतामुळे सुरुवातीस दीर्घकालीन सरासरी खर्चात घट आणि त्यानंतर होणाऱ्या वाढीचा परिणाम दीर्घकालीन सरासरी खर्च वक्रास U आकार प्राप्त होतो.

५. सर्वच खर्च बदलणारे :

दीर्घकाळात सर्वच खर्च बदलणारे असतात. संयंत्राचा उत्पादनानुसार उपयोग करता येतो. अस्तित्वात असलेल्या उत्पादक घटकांचा कार्यक्षम उपयोग दीर्घकाळात होत असल्याने सरासरी स्थिर खर्च आणि सरासरी खर्च अल्पकाळापेक्षा दीर्घकाळात कमी असतो.

**उत्पन्न वक्र (Revenue Curves) :**

उत्पादकाचा प्रमुख हेतु नफा मिळवणे हा असतो. म्हणून विक्रीतून मिळणारे उत्पन्न किंवा महसूल हा उत्पादकाच्या दृष्टीकोणातून महत्वाचा असतो. प्रत्येक उत्पादक

कमीत कमी खर्च करुन जास्तीत जास्त उत्पन्न कसे मिळेल याचा प्रयत्न करत असतो. उत्पादकाचा उत्पादन खर्च हा त्याच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतो. परंतु उत्पादकास मिळणारे उत्पन्न हे वस्तुच्या किंमतीवर अवलंबून असते. उत्पादक हा बाजारपेठेतील वस्तुच्या किंमती गृहीत धरुनच वस्तुचे उत्पादन करत असतो. या उत्पादनाची विक्री करुन उत्पादकास उत्पन्न मिळत असते.

उत्पन्न :

वस्तूच्या वेगवेगळ्या किंमती असतांना वेगवेगळ्या वस्तुंच्या नगांची विक्री करुन उत्पादन संस्थेला जे उत्पन्न मिळते त्यालाच उत्पन्न (Revenue) असे म्हणतात. उत्पादन वक्रापासून एखाद्या उत्पादकास वेगवेगळे जे उत्पन्न मिळते त्याचे स्पष्टीकरण केले जाते. निरनिराळे उत्पन्न वक्र हे उत्पादीत वस्तुसाठी असलेल्या मागणी वक्रावर अवलंबून असतात. मागणी ज्या प्रमाणे असेल त्यावरुन उत्पन्न वक्राचे स्वरुप ठरत असते.

**उत्पन्न वक्राचे प्रकार व उत्पन्न वक्र :**

उत्पन्न वक्राचा अभ्यास करत असतांना एकुण उत्पन्न, सरासरी उत्पन्न आणि सिमांत उत्पन्न या तिन भागात अभ्यास केला जातो.

एकुण उत्पन्न :

∴ असलेल्या किंमतीस वस्तुच्या विकलेल्या नगसंख्यांनी गुणीले असता एकूण उत्पन्न मिळते.

सुत्राने -

एकूण उत्पन्न = किंमत × वस्तुंची संख्या

अशा प्रकारे या सुत्राने एकूण उत्पन्न काढले जाते.

सरासरी उत्पन्न :

एकूण उत्पन्नास विकलेल्या नगसंख्येने भागले असता सरासरी उत्पन्न मिळते. सरासरी उत्पन्न पुढील सुत्राने दर्शवले जाते.

सरासरी उत्पन्न = एकूण उत्पन्न ÷ वस्तूंची नगसंख्या

सिमांत उत्पन्न :

वस्तूच्या एकूण उत्पन्नात वस्तुचा एक नग जास्त विकल्यामुळे जी भर पडते त्यास सिमांत उत्पन्न असे म्हणतात. समजा, दहा वस्तू विकल्या असतील तर त्यापासून १००० रुपये उत्पन्न मिळते. आणि ११ वस्तु विकल्या तर ११०० रु. मिळत असतील तर येथे १०० रुपये हे सिमांत उत्पन्न आहे.

वरील तिनही प्रकारचे उत्पन्न उद्योग संस्थेच्या दृष्टीकोणातून अतिशय महत्वाचे असतात. म्हणून त्यांचे सविस्तर विवेचन, आकृती व परस्पर संबंध पुढील प्रमाणे आहे.

**अ. सरासरी उत्पन्न व सिमांत उत्पन्न यांचा पूर्ण स्पर्धेतील अभ्यास.**

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेत वस्तूची किंमत वस्तूच्या मागणी पुरवठ्यावरुन ठरत असते. उत्पादक हा केवळ किंमत घेणारा (स्वीकारणारा) असतो. तो किंमत कमी किंवा अधिक करु शकत नाही. अशा बाजारपेठेत वस्तूचे अनेक नग विकले असतांना मिळणारे एकूण उत्पन्न (प्राप्ती), सरासरी उत्पन्न (प्राप्ती) व सीमांत उत्पन्न (प्राप्ती) बदलत असते. या स्थितीत स्पर्धायुक्त बाजारपेठेत उत्पन्नवक्र (प्राप्ती वक्र) कसे तयार होतात ते पुढील तक्त्यावरुन स्पष्ट करता येईल.

**पूर्ण स्पर्धा बाजारपेठतील उत्पन्न :**

**तक्ता क्र. ३.४**

| किंमत (रु.) | विकलेले नग | एकूण उत्पन्न | सरासरी उत्पन्न | सीमांत उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १० | १ | १० | १० | – |
| १० | २ | २० | १० | १० |
| १० | ३ | ३० | १० | १० |
| १० | ४ | ४० | १० | १० |
| १० | ५ | ५० | १० | १० |
| १० | ६ | ६० | १० | १० |
| १० | ७ | ७० | १० | १० |


वरील तक्त्यामध्ये एका पेढीचा एकूण उत्पन्न, सरासरी उत्पन्न व सीमांत उत्पन्न स्पष्ट केले आहे. या तीनही उत्पन्नाचे अर्थ व वक्र यांचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

**१. एकूण उत्पन्न (एकूण प्राप्ती) :**

ग्राहकाने सर्वच वस्तु खरेदी केल्यानंतर उत्पादकास किंवा विक्रेत्यास दिलेली एकूण किंमत म्हणजे विक्रेत्याचे एकूण उत्पन्न होय. या उत्पन्नामध्ये तीन प्रकारचा विचार केला जातो. ग्राहकाने दिलेली किंमत हे एकूण उत्पन्न दर्शवत असते. म्हणूनच वस्तुचे सर्व नग विकुन मिळालेल्या उत्पन्नाला एकूण उत्पन्न असे म्हणतात.

सुत्राने - एकूण उत्पन्न = वस्तुची किंमत × वस्तुची नगसंख्या

एकूण उत्पन्न हे वस्तुची नगसंख्या ज्या प्रमाणात वाढत जाईल त्या प्रमाणात वाढत जाते. वस्तुची नगसंख्या कमी झाली तर एकूण उत्पन्न हे कमी होते. हे पुढील वक्राने दर्शवले आहे.




आ.क्र.३.१२

वरील आकृती अक्ष अक्षावर विक्री नग व अय अक्षावर एकूण उत्पन्न दर्शवले आहे. उत्पन्न वाढीबरोबर सुरुवातीस एकूण उत्पन्न वाढत जाते. विशिष्ट मर्यादेनंतर हे कमी होते. म्हणजे उत्पादन वक्र विशिष्ट मर्यादेनंतर ऋण आकाराचा होतो याला घंटेचा आकार येतो.

## २. सरासरी उत्पन्न (सरासरी प्राप्ती) Avarage Revenue :


सरासरी उत्पन्न म्हणजे वस्तुची किंमत होय. किंवा वस्तुचे नग विकून जे उत्पन्न मिळते. त्या एकूण उत्पन्नास विकलेल्या नगसंख्येने भाग दिला तर सरासरी उत्पन्न मिळते. वस्तुच्या किंमतीला ही सरासरी उत्पन्न असे म्हणतात. प्रत्येक नगाची किंमत ही एक प्रकारे सरासरी उत्पन्नच दर्शवते. प्रत्येक नगास द्यावी लागणारी किंमत म्हणजेच सरासरी उत्पन्न होय.

सुत्राने -

$$\text{सरासरी उत्पन्न} = \frac{\text{एकूण उत्पन्न}}{\text{वस्तुंची नगसंख्या}}$$

सरासरी उत्पन्न हीच वस्तुची किंमत असल्यामुळे सरासरी उत्पन्न मागणी नियमानुसार बदलत असते. वस्तुचा मागणीवक्र हाच सरासरी मागणीचा वक्र असतो. वस्तुची मागणी ही मागणी नियमानुसार बदलत असते. म्हणजे वस्तुची किंमत वाढली तर मागणी कमी होते. आणि वस्तुची किंमत कमी झाली तर मागणी वाढते. या नियमानुसार विक्री परिमाणात जसी वाढ होईल. त्या प्रमाणात सरासरी उत्पन्नामध्ये घट होते. सरासरी उत्पन्न हे उत्पादकास वस्तुची किती किंमत वेगवेगळ्या परिमाणास आकारता येईल. याची कल्पना देत असते. हे वरील तक्त्यात चौथ्या रकाण्यात दर्शवले आहे. पूर्ण स्पर्धेमध्ये सरासरी खर्चात बदल होत नाही. म्हणून हा वक्र अक्ष अक्षास समांतर असतो. तो पुढील आकृतीत दर्शवला आहे.

USE With Care




आ.क्र.३.१३


Sant Tukaram College Library Parbhani

## सिमांत उत्पन्न (सीमांत प्राप्ती) (Marginal Revenue) :

सिमांत उत्पन्न म्हणजे वस्तुच्या विक्रीसंख्येत एका नगाने वाढ केली असता एकूण उत्पन्नात होणारी वाढ होय. **वस्तुच्या एकूण प्राप्तीमध्ये एक नग जास्त विकल्यामुळे जो बदल होईल. तो बदल म्हणजे सिमांत उत्पन्न होय.**

$$\text{सुत्राने - सिमांत प्राप्ती} = \frac{\text{वस्तुच्या एकूण प्राप्तीत होणारा}}{\text{वस्तुच्या विक्री परिमाणात होणारा बदल}}$$

पूर्ण स्पर्धेमध्ये सरासरी उत्पन्न व सिमांत उत्पन्न हे एकच असतात. हे वरील तक्त्यामध्ये दर्शवले आहेत. प्रत्येक वस्तु विकल्यामुळे एकूण उत्पन्नात पडणारी भर ही किंमत सारखी असल्यामुळे सारखीच असते. त्यामुळे सरासरी उत्पन्न आणि सिमांत उत्पन्न सारखेच येते. सिमांत उत्पन्न वक्र पुढील आकृतीत दर्शवला आहे.




आ.क्र.३.१४

वरील आकृतीमध्ये सिमांत उत्पन्नवक्र दर्शवला असून तो अक्ष या आडव्या अक्षास समांतर आहे.

### ब. अपूर्ण स्पर्धेतील उत्पन्न :


अपूर्ण स्पर्धा म्हणजेच मक्तेदारी किंवा मक्तेदारीयुक्त स्पर्धेत उद्योग संस्थेचा मागणी

वक्र हा संपूर्ण लवचिक नसतो. तसेच अपूर्ण स्पर्धेत विक्रेत्याचे वस्तूच्या किंमतीवर नियंत्रण असल्यामुळे तो किंमत कमी किंवा अधिक करुन नफा मिळवू शकतो. यामुळे सरासरी उत्पन्न व सिमांत उत्पन्न हे दोन्हीही वेगवेगळे असते. ते पुढील उदाहरणात दर्शवले आहे.

**तक्ता क्र. ३.५**

| वस्तूच्या प्रत्येक नगाची किंमत | विक्री केलेल्या नगांची संख्या | समस्त उत्पन्न रुपये | सरासरी उत्पन्न रुपये | सिमांत उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|
| १० | १ | १० | १० | १० |
| ९ | २ | १८ | ९ | ८ |
| ८ | ३ | २४ | ८ | ६ |
| ७ | ४ | २८ | ७ | ४ |
| ६ | ५ | ३० | ६ | २ |
| ५ | ६ | ३० | ५ | ० |
| ४ | ७ | २८ | ४ | -२ |

वरील उदाहरणामध्ये अपूर्ण स्पर्धेत वस्तुची किंमत कमी केली असता वस्तूचे जास्त नग विकणे शक्य होते. हे दर्शवले आहे. परंतु असे केले असता सिमांत व सरासरी उत्पन्न दोन्हीही घटत जातात कारण वस्तुचे अधिक नग विकण्यासाठी वस्तुची किंमत १० रुपयापासून ४ रुपये पर्यंत कमी केली जाते. परंतु ही किंमत केवळ सिमांत नगाचीच नसून सर्वच नगाची असते. म्हणून वस्तुचा एक नग अधिक विकल्यामुळे सिमांत उत्पादन आणि सरासरी उत्पादन दोन्हीही घटत जाते. हे पुढील आकृतीत दर्शवले आहे.




आ.क्र.३.१५

वरील आकृतीत अक्ष अक्षावर वस्तुची संख्या, अय अक्षावर किंमत दर्शवली आहे. सरासरी उत्पन्न आणि सिमांत उत्पन्न या दोन्ही मध्येही घट होत असल्यामुळे हे वक्र अधोगामी म्हणजे खाली येणारे असतात. त्यावेळी सिमांत उत्पन्न वक्र हा सुद्धा अधोगामी

असतो परंतु सिमांत उत्पन्न वक्र हा सरासरी उत्पन्न वक्रापेक्षा दुप्पट वेगाने कमी होत जातो. म्हणून सिमांत उत्पन्न वक्र हा सरासरी उत्पन्न वक्राच्या डाव्या बाजूला तुटक रेषेने दर्शवलेला आहे.

अशा प्रकारे पूर्ण स्पर्धा बाजारपेठेमध्ये आणि अपूर्ण स्पर्धा बाजारपेठेमध्ये सरासरी उत्पन्न व सिमांत उत्पन्न यांच्यातील संबंध स्पष्ट करता येतो.

❖ ❖ ❖

४

# बाजारपेठेची रचना

## Markets Structure

व्यवहारामध्ये आपण बाजारपेठ म्हणजे विशिष्ठ ठिकाण किंवा विशिष्ट वस्तुंची खरेदी-विक्री करण्याची जागा असा अर्थ घेतो. परंतु अर्थशास्त्रामध्ये बाजारपेठेचा अर्थ यापेक्षा वेगळा आहे. अर्थशास्त्राच्या दृष्टीने बाजारपेठ हे असे क्षेत्र असते की, जेथे ग्राहक व विक्रेते यांचा वेगवेगळ्या मार्गाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जवळचा संबंध येऊन याचा परिणाम वस्तुच्या किंमतीवर होत असतो. म्हणजेच बाजारपेठेचा अर्थ केवळ वस्तुच्या विशिष्ट ठिकाणाशी संबंधीत नसून ग्राहक आणि विक्रेत्यांच्या संबंधाशी आहे. असे स्पष्ट होते. **प्रो. कुर्नो** या फ्रेंच अर्थतज्ञांची बाजारपेठेची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. **'बाजारपेठ म्हणजे विशिष्ठ ठिकाण किंवा जागा नसून असा भूप्रदेश आहे की, ज्या भूप्रदेशात ग्राहक व विक्रेते यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध येऊन एकाच वस्तुची किंमत सहज सारखीच होण्याची प्रवृत्ती असते.'**

अशा प्रकारे बाजारपेठेमध्ये एकसारख्या वस्तुंची किंमत विशिष्ट काळात सारखी होण्याची प्रवृत्ती असते.

**बाजारपेठेची वैशिष्ट्ये Classification of Markets :**

१. बाजारपेठ हा एक विशाल भूप्रदेश आहे.

२. बाजारपेठेमध्ये खरेदी-विक्रीसाठी वस्तु असावी लागते. वस्तुची मागणी करणारे ग्राहक आणि विकणारे विक्रेते उपलब्ध असावे लागतात.

३. ग्राहक व विक्रेत्यांचा परस्परांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध यावा लागतो.

४. बाजारपेठेमध्ये एक सारख्या वस्तुची किंमत कांही वेळातच समान होण्याची प्रवृत्ती असते.

वरील वैशिष्ठ्यावरुन बाजारपेठेचा अर्थ स्पष्ट होतो.

बाजारपेठेचे वर्गीकरण :

बाजारपेठेचे वर्गीकरण वेगवेगळ्या घटकानुसार केले जाते. हे वर्गीकरण बाजारपेठेतील वस्तुनुसार, विस्तारानुसार, व्यवहाराच्या पूर्णतेनुसार, ग्राहक आणि विक्रेत्यामधील स्पर्धेनुसार इ. नुसार करण्यात येते. या वर्गीकरणापैकी बाजारपेठेचे स्पर्धेनुसार वर्गीकरण पुढील प्रमाणे केले जाते.

## ४.१ बाजारपेठेची स्पर्धेनुसार वर्गीकरण :

बाजारपेठेचे स्पर्धेनुसार वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते.

१. पूर्ण स्पर्धा.

२. मक्तेदारी.

३. द्विमक्तेदारी

४. अल्पविक्रेताधिकार

५. द्विपक्षीय मक्तेदारी.

६. मक्तेदारीयुक्त स्पर्धा किंवा अपूर्ण स्पर्धा

वरील सर्व प्रकाराचे विष्लेषण पुढील प्रमाणे थोडक्यात करता येते.

## १. पूर्ण स्पर्धा Perfect Competition :

पूर्ण स्पर्धा हा बाजारपेठेचा काल्पनिक प्रकार असून त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येतो. 'जेंव्हा एकूण बाजारपेठेचा विचार करतांना ग्राहक आणि विक्रेता इतका लहान असतो की, तो स्वतःजवळील वस्तूची खरेदी किंवा विक्री कमी किंवा जास्त करुन बाजारपेठेतील वस्तूच्या किंमतीवर परिणाम घडवून आणू शकत नाही. अशा स्पर्धेस पूर्ण स्पर्धा असलेली बाजारपेठ म्हणतात.'

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेत ग्राहक आणि विक्रेते असंख्य असल्यामुळे त्यांच्या खरेदी किंवा विक्रीचा वस्तूंच्या किंमतीवर परिणाम घडवून येत नाही.

बाजारपेठेत पूर्ण स्पर्धा अस्तित्वात असण्यासाठी पुढील वैशिष्टये असणे आवश्यक आहे.

१. असंख्य ग्राहक व विक्रेते असतात.

२. पूर्णस्पर्धेत सर्व वस्तु एकजिनसी असतात (एकसारख्या).

३. पूर्ण स्पर्धेत ग्राहक आणि विक्रेत्यास प्रवेश निर्गमनाचे स्वातंत्र्य असते.

४. पूर्ण स्पर्धा बाजारपेठेचे ग्राहक आणि विक्रेत्यास संपूर्ण ज्ञान असते.

५. पूर्ण स्पर्धेत उत्पादनाचे घटक गतीशील असतात.

६. पूर्ण स्पर्धेत वाहतूक खर्चाचा अभाव असतो.

७. पूर्ण स्पर्धेत ग्राहक विक्रेत्याचे किंमतीवर नियंत्रण नसते.

६. मक्तेदारीयुक्त किंवा अपूर्ण स्पर्धा :

**Monopolistic Competition or Imperfect Competition :**

जेंव्हा बाजारपेठेत विशिष्ठ वस्तुचा एखादा मक्तेदार असेल तरीही त्यास बाजारपेठेत स्पर्धेला तोंड द्यावे लागत असेल तर त्यास मक्तेदारी युक्त स्पर्धा असे म्हणतात. मक्तेदारी स्पर्धेमध्ये उत्पादन संस्थांचा संख्या जास्त असते. या सर्व संस्था एकाच प्रकारच्या वस्तु परंतु गुणात्मक दृष्ट्या वेगवेगळ्या वस्तुचे उत्पादन करतात. प्रत्येक संस्थेचे स्वतःच्या उत्पादनावर नियंत्रण असते. आणि प्रत्येक संस्थामध्ये आपआपसात स्पर्धा असते.

वैशिष्टये :

१. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत अनेक ग्राहक व विक्रेते असतात.

२. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तुभेद केला जातो. प्रत्येक वस्तु रंग, रुप, आकार, चव इत्यादीबाबत भिन्न असतात.

३. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत नवीन विक्रेत्यास सहज प्रवेश मिळत नाही.

४. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तुच्या विक्रीसाठी जाहिरातीची आवश्यकता असते.

५. मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये वेगवेगळ्या विक्रेत्यामध्ये स्पर्धा असते.

६. मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये उत्पादन एकाच वस्तुचे परंतु गुणात्मक भिन्न दर्जाच्या वस्तुचे उत्पादन करतात.

अशा प्रकारे वरील वैशिष्टयेमध्ये असलेल्या स्पर्धेस मक्तेदारीयुक्त स्पर्धा असे म्हणतात. सांबण, टुथपेस्ट किंवा दैनंदिन जीवनात ज्या वस्तुंचा आपण करतो त्या वस्तुंच्या उत्पादनाबाबत मक्तेदारीयुक्त स्पर्धा आढळून येते.

अशा प्रकारे स्पर्धेनुसार बाजारपेठेचे वेगवेगळे प्रकार आहेत. या सर्व प्रकारापैकी पूर्ण स्पर्धा, मक्तेदारी व मक्तेदारीयुक्त स्पर्धा इत्यादीमध्ये किंमतीनिश्चिती पुढील प्रमाणे दिली आहे.

**६.२ पूर्ण स्पर्धा Perfect Competition :**

स्पर्धेनुसार बाजारपेठेच्या प्रकारापैकी पूर्ण स्पर्धा हा महत्वाचा प्रकार आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मुक्त आर्थिक व्यवहाराचा पुरस्कार करण्यात आल्यामुळे, अशी अर्थव्यवस्था सुरळीत चालण्याकरिता पूर्ण स्पर्धा अस्तित्वात असावी अशी अपेक्षा असते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहार खाजगी व्यक्तीच्या अधिपत्याखाली असल्यामुळे हे व्यवहार अधिक कार्यक्षम चालवण्यासाठी पूर्ण स्पर्धेची आवश्यकता असते.

पूर्ण स्पर्धेचा अर्थ :

'जेव्हा एकूण बाजारपेठेचा विचार करतांना ग्राहक आणि विक्रेता इतका लहान

असतो की, तो स्वतःच्या वस्तूची खरेदी किंवा विक्री कमी किंवा जास्त करुन बाजारपेठेतील वस्तूच्या किंमतीवर परिणाम घडवून आणू शकत नाही. अशा स्पर्धा असलेली बाजारपेठ म्हणतात.'

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेत ग्राहक आणि विक्रेते असंख्य असल्यामुळे त्यांच्या खरेदी विक्रीच्या वस्तूंच्या किंमतीवर परिणाम घडवून येत नाही.

**पूर्ण स्पर्धेची वैशिष्ट्ये (अटी) :**

बाजारपेठेत पूर्ण स्पर्धा अस्तित्वात असण्यासाठी पुढील वैशिष्ट्ये असणे आवश्यक आहे.

**१. असंख्य ग्राहक व विक्रेते :**

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेत ग्राहक व विक्रेत्यांची संख्या असंख्य असते. त्यामुळे एखाद्या ग्राहकाने अधिक वस्तू खरेदी केल्यास किंवा विक्रेत्याने आपली विक्री कमी केली तरी वस्तुच्या किंमतीवर परिमाण घडून येत नाही. ज्याप्रमाणे सागरात पाण्याचे काही थेंब वाढले किंवा काही पाण्याचे थेंब कमी केले तर सागराच्या पातळीत कांहीच फरक पडत नाही. त्याचप्रमाणे येथे ग्राहक व विक्रेते वस्तूच्या किंमतीवर परिणाम घडवून आणू शकत नाहीत.

**२. एकजिनसी वस्तू :**

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेतील वस्तूच्या नगांचा आकार, रंग, उपयोगिता, चव, वास इत्यादीबाबतीत एकजिनसी (सारख्या) असतात. पूर्ण स्पर्धेमध्ये वस्तूभेद नसतो. प्रत्येक नग सारखे असतात.

**३. प्रवेश निर्गमनाचे स्वातंत्र्य :**

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेत ग्राहक व विक्रेत्यास प्रवेश निर्गमनाचे स्वातंत्र्य असते. एखाद्या ग्राहकाच्या बाजारपेठेतील प्रवेशावर किंवा त्यांच्या खरेदीवर कोणतेही बंधन नसते, तसेच विक्रेत्याच्या किंवा उत्पादकाच्या प्रवेशावर वा निर्गमनावर बंधन नसते. कोणत्याही विक्रेत्यास बाजारपेठेत मुक्त प्रवेश असतो. उदा. विक्रेत्यास नवीन व्यवसाय करता येतो किंवा बंद करता येतो.

**४. बाजारपेठेचे संपूर्ण ज्ञान :**

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेत ग्राहक व विक्रेत्यास बाजारपेठेचे संपूर्ण ज्ञान असते. म्हणजे ग्राहकांना विक्रेते कोणत्या दराने वस्तू विकत आहेत आणि विक्रेत्यास ग्राहक कोणत्या दराने वस्तू घेण्याकरिता तयार आहेत याचे संपूर्ण ज्ञान असले पाहिजे.

एखाद्या वस्तूची खरेदी किंमत माहीत नसेल तर विक्रेत्यांची खरेदीदाराकडून फसवणूक होऊ शकते. म्हणजे म्हणूनच ग्राहक व विक्रेत्यांना पूर्ण स्पर्धेत बाजारपेठेविषयी

संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे.

५. उत्पादन घटकांची गतीशिलता :

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेत उत्पादनाचे घटक (भूमी, श्रम, भांडवल व संयोजन) हे गतिशील असणे आवश्यक आहे. कारण ते गतिशील असतील तर संपूर्ण बाजारात किंमत समान राहील. उदा. जर एखाद्या श्रमिकास एखाद्या उद्योगात वेतन कमी मिळत असेल तर तो श्रमिक ज्या ठिकाणी त्याला वेतन अधिक मिळते तेथे जाण्यास तयार असतो. हीच स्थिती भांडवल व संघटकांच्या बाबतीत असते.

६. वाहतूक खर्चाचा अभाव :

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेंत वाहतूकखर्च येत नाही असेही गृहीत धरले आहे, कारण वाहतूकखर्च हा कमी-अधिक येत असल्यामुळे तो किंमतीत समाविष्ट होत असल्यामुळे, तो जर गृहीत धरला तर वस्तूची किंमत समान राहणार नाही, म्हणून वाहतूकखर्चाचा अभाव ही अट गृहीत धरली आहे.

७. किंमतीवर नियंत्रण नसते :

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेत असंख्य ग्राहक व विक्रेते असल्यामुळे एखादा विक्रेता किंवा एखादा ग्राहक किंमत कमी किंवा अधिक करु शकत नाही. कारण बाजारपेठेतील एकूण वस्तुचा विचार करता एखाद्या विक्रेत्याजवळील वस्तुचा पुरवठा अतिशय अल्प असतो. त्यामुळे तो वस्तुच्या किंमतीवर परिणाम घडवून आणू शकत नाही.

८. विक्रेत्यामध्ये संगनमत नसते :

पूर्ण स्पर्धा असलेल्या बाजारपेठेत विशिष्ट वस्तूच्या विक्रेत्यामध्ये कोणत्याही प्रकारचे संगनमत नसते. म्हणजे बाजारपेठेमध्ये विक्रेत्यांची संख्या एवढी मोठी असते त्यामुळे हे एकत्र येणे अशक्य असते. परिणामी विक्रेत्यामध्ये संगनमत होऊ शकत नाही.

वरील प्रकारची वैशिष्ट्ये ज्या बाजारपेठेत आढळून येतात. त्या बाजारास पूर्ण स्पर्धा असलेली बाजारपेठ असे म्हणतात. वरील अटी जर स्पर्धेत नसतील तर ती पूर्ण स्पर्धा होऊ शकणार नाही. वास्तविक पाहता वरील सर्व अटी कोठेही दिसून येत नाहीत. म्हणून पूर्ण स्पर्धा हा बाजारपेठेचा काल्पनिक प्रकार आहे.

## पूर्ण स्पर्धेत उद्योग व उद्योग संस्थांचे अल्पकालीन संतुलन :

## Equilibrium of firm and Industry in Short period :

पूर्ण स्पर्धेमध्ये वस्तुची किंमत ही काळाप्रमाणे बदलत असते. पूर्ण स्पर्धेतील अतीअल्पकाळात नाशवंत वस्तुची किंमत निश्चिती, टिकाऊ वस्तुची किंमत निश्चिती,

दीर्घकाळात किंमत निश्चिती याचा अभ्यास इ. १२ वी मध्ये केलेला आहे. येथे पूर्ण स्पर्धेमध्ये उद्योग संस्था आणि उद्योगांचे अल्पकाळात कसे संतुलन होते याचा अभ्यास करावयाचा आहे. या संतुलनात उद्योग संस्था आणि उद्योग यांच्यात फरक केला आहे.

**उद्योग :**

उद्योग म्हणजे विशिष्ट वस्तुचे उत्पादन करणाऱ्या वेगवेगळ्या उद्योग संस्था मिळून तयार झालेला समुह होय.

उदा. देशामध्ये साखर उत्पादन करणाऱ्या अनेक उद्योगसंस्था आहेत. किंवा अनेक कारखाने आहेत. अशा सर्व उद्योग संस्थांचा मिळून देशाचा साखर उद्योग तयार होतो.

**उद्योग संस्था :**

उद्योग संस्था म्हणजे अशी एक कंपनी की जी विशिष्ट नावाने अनेक उत्पादनाचा व्यवसाय करते. उदा. टाटा ही उद्योगसंस्था वेगवेगळ्या उत्पादनांचा व्यवसाय करते. म्हणून टाटा ही एक उद्योग संस्था आहे.

**संतुलन :**

एखाद्या उत्पादन संस्थेच्या उत्पादनाच्या किंमतीचा अभ्यास करणे म्हणजे संतुलन होय.

अशा प्रकारे उद्योग, उद्योगसंस्था आणि संतुलन यांचे अर्थ पाहिल्यानंतर उद्योग व उद्योग संस्थेचे संतुलन कसे होते किंवा त्याची प्रक्रिया काय आहे. याचा अभ्यास पुढील प्रमाणे करता येईल.


**उद्योग व उद्योगसंस्थेचे अल्पकाळातील संतुलन :**

पूर्ण स्पर्धेमध्ये उद्योग आणि उद्योग संस्थांच्या संतुलनाचा अभ्यास वेगवेगळ्या पद्धतीने केला जातो. कारण पूर्ण स्पर्धेत एखाद्या वस्तुचे उत्पादन करणाऱ्या उद्योग संस्थांची संख्या जास्त असते. ज्या ठिकाणी उद्योग संस्था व उद्योग असा भेद केला जातो त्या ठिकाणी उद्योग संस्थांच्या संतुलनासाठी कांही अटी पूर्ण होणे आवश्यक असते. प्रा. मार्शल व इतर कांही तज्ञांनी उद्योग संस्थांच्या संतुलनासाठी पुढील महत्वाच्या अटी सांगितल्या आहेत.

१. सीमांत खर्च हा सीमांत प्राप्तीच्या बरोबर असावा. (सि.ख. = सि.प्रा.).

२. सर्व संस्था (उद्योग) संतुलनात येण्यासाठी सरासरी खर्च हा सरासरी प्राप्तीच्या बरोबर असावा. (स.ख.= स.प्रा.)

३. सिमांत खर्चाचा वक्र हा सिमांत प्राप्तीच्या वक्रास खालच्या बाजूने किंवा डाव्या बाजूने छेदून गेला पाहिजे.




आ.क्र. ४.१

वरील आकृतीमध्ये सिमांत खर्चवक्र हा सिमांत प्राप्तीच्या वक्रास डाव्या बाजूला छेदला आहे. म्हणून येथे सिमांत प्राप्ती = सिमांत खर्च अशी अट पूर्ण होते.

पूर्ण स्पर्धेमध्ये उद्योग संस्थेचे संतुलन हे आपोआप होत नाही. कारण पूर्ण स्पर्धेमध्ये उद्योगसंस्था वस्तुचे मूल्य निश्चित करु शकत नाहीत. तर एका विशिष्ट वेळी बाजारपेठेतील एकूण मागणी व एकूण पुरवठा यावरुन ठरत असते. कारण पूर्णस्पर्धेमध्ये वस्तुची किंमत अगोदर ठरवली जाते. व बाजारपेठेत ठरलेली किंमतच उद्योग संस्थांना प्रमाण माणून आपले उत्पादन करावे लागते. बाजारात ठरलेल्या किंमतीलाच उत्पादन विकावे लागत असल्यामुळे उद्योग संस्थांचे सरासरी उत्पन्न आणि सिमांत उत्पन्न हे सारखेच असतात. पूर्ण स्पर्धेमध्ये उद्योग संस्था व उद्योगाचे संतुलन कोणत्या प्रकारे होते ते पाहण्यासाठी अल्पकाळ व दीर्घकाळ असे दोन भाग केले जातात. अल्पकाळ म्हणजे असा काळ की, ज्या काळात उद्योग संस्थेला आपल्या स्थिर घटकात बदल करता येत नाही. त्यामुळे उद्योग संस्थेला आपल्या उत्पादनात जो कांही बदल करावयाचा असेल तो बदलत्या घटकात बदल करुनच करावा लागतो. अल्पकाळात उद्योग संस्थेचे संतुलन पहात असतांना पुढील गृहीत परिस्थिती लक्षात घ्यावी लागते.

१. सर्व उत्पादन संस्थांचा उत्पादन खर्च सारखाच आहे. सर्व उद्योग संस्थांचा अभ्यास करण्यासाठी कोणतीही एक उद्योग संस्था उदाहरणासाठी घेतली जाते.


२. समतोल बिंदुत सिमांत खर्चवक्र वर चढत जाणारा असला पाहिजे.

३. उत्पादन घटकांच्या बाजारात पूर्ण स्पर्धा आहेत.

४. उत्पादन घटकांच्या किंमती स्थिर असाव्या.


५. सर्व उत्पादक व उत्पादन घटकांच्या नगांची कार्यक्षमता सारखीच आहे.

वरील गृहीत परिस्थिती लक्षात घेऊन अल्पकाळात उद्योग संस्थांचे व उद्योगाचे संतुलन कसे होते. हे पहावे लागेल. ते पुढील आकृतीत दर्शवले आहेत.





आ.क्र.४.२

वरील आकृतीमध्ये अक्ष भुजावर उत्पादनाचे प्रमाण तर अय भुजावर किंमत दर्शवली आहे. सि.ख. आणि स.ख. हे अनुक्रमे सिमांत खर्च व सरासरी खर्चवक्र आहेत. तर स.उ. आणि सि.उ. हे अनुक्रमे सरासरी उत्पन्न व सिमांत उत्पन्न वक्र आहेत. पूर्णस्पर्धेत वस्तुची किंमत ही अक ठरलेली असल्यामुळे ती स्थिर असते. स.ख. व सि.ख. हे अनुक्रमे सिमांत खर्च व सरासरी खर्चवक्र असून ते इंग्रजी मुळाक्षर U आकाराचे असतात. वरील आकृतीमध्ये स या बिंदूत उद्योग संस्थेच्या संतुलनाच्या दोन्ही अटी पूर्ण होत असल्यामुळे म्हणजे सि.ख. = सि.प्रा. व सिमांत खर्चाचा वक्र सिमांत प्राप्तीच्या वक्रास खालील बाजूस छेदून गेला आहे. त्यामुळे स हा संतुलनाचा बिंदू आहे. या बिंदूपासून क्षितीजास लंब टाकल्यास तो म बिंदूस छेदतो. यावरुन अम इतके उत्पादन निश्चित होते व वस्तुची किंमत मस किंवा अक इतकी निश्चित होते. ती संस्था आकारात असलेली किंमत किती फायदा मिळवून देईल. हे पाहण्यासाठी मस हा लंब सरासरी खर्चाच्या वक्रास कोणत्या ठिकाणी छेदतो हे पाहणे आवश्यक आहे.




आ.क्र.४.३




आ.क्र.४.४

वरील आकृती ४.३ मध्ये सरासरी खर्च मस इतका आहे. जो त्या वस्तुच्या किंमतीच्या मस या किंमतीपेक्षा सर ने कमी आहे. म्हणजे प्रत्येक नगावर सर इतका अतिरिक्त लाभ होतो. ही संस्था अम इतके उत्पादन करत असल्यामुळे एकूण लाभ अम

४ सर इतका असेल. अशा प्रकारे अल्पकाळात उद्योग संस्थांचे संतुलन होत असून त्यांना अतिरिक्त नफा मिळतो हे सिद्ध होते. आकृती क्र. ४.४ मध्ये दर्शवलेली उद्योग संस्था पहिल्यासारखी कार्यक्षम नाही. त्यामुळे त्याच किंमतीला सरासरी उत्पादन = सिमांत उत्पादन. ही रेषा स.ख. वक्राच्या किमान बिंदूशी (स) स्पर्श करत असल्यामुळे येथे अतिरिक्त नफा मिळत नाही.

**अल्पकाळात उद्योगाचे संतुलन :**

डॉ. मार्शल यांच्या मते अल्पकाळात पूर्ण स्पर्धेत उद्योगाचे संतुलन होण्यासाठी त्या उद्योगातील सर्व संस्थांचे सिमांत पद्धतीनुसार संतुलन होणे आवश्यक आहे. अर ही सर्व संस्था आकारात असलेली किंमत त्यांच्या अल्पकालीन सरासरी खर्च भरुन काढणारी असते.

**उद्योगांच्या संतुलनाच्या मुख्य अटी :**

अल्पकाळात उद्योगांचे संतुलन होण्यासाठी पुढील अटी पूर्ण होणे आवश्यक आहे.

१. सर्व संस्थांचे सिमांत प्राप्ती व सिमांत प्राप्ती खर्चवक्र समान व्हावे लागते. म्हणजे सी.प्रा. = सी. ख.

२. प्रत्येक संस्थेचा सिमांत खर्चवक्र सिमांत प्राप्तीवक्रांना खालच्या बाजूने छेदून गेला पाहिजे.

३. सर्व संस्थेचा सरासरी प्राप्ती आणि सरासरी खर्च समान असावा म्हणजे संस्थेला मिळणारी सरासरी प्राप्ती ही त्या संस्थेतील वस्तुच्या सरासरी उत्पादन खर्चाइतकी असते. म्हणजे उद्योगाला अशा प्रकारची किंमत आकारता येते की, त्यामुळे प्रत्येक संस्थेचा खर्च भरून येतो. म्हणजे प्रत्येक संस्थेला केवळ सर्व साधारण नफा मिळत असेल तरच उद्योग संतुलनात आहे असे म्हणता येईल. हे वरील आकृती क्र. ४.३, ४.४ आणि ४.५ मध्ये दर्शवले आहे.

वरील आकृत्यामध्ये अल्पकाळात उद्योगांचे संतुलन दर्शवले आहे. आकृती क्र. ४.३, ४.४ आणि ४.५ या तीनही आकृत्यामध्ये दाखविल्याप्रमाणे कांही संस्थांना अतिरिक्त तोटा होत असेल तर कांही संस्थांना सर्वसाधारण नफा व कांही संस्थांना अतिरिक्त नफा होतो असे अनुक्रमे आकृती क्र. ४.३, ४.४ आणि ४.५ या आकृतीत दर्शवले आहे. अशा स्थितीत पूर्ण उद्योग संतुलनात आहे असे म्हणता येत नाही. म्हणूनच मार्शल यांच्या मते पूर्णस्पर्धेत दीर्घकाळ उद्योगाचे संतुलन होत नाही. असे असले तरी त्यांच्या मते पूर्ण स्पर्धेत जेंव्हा वरील प्रकारे कार्यरत असलेल्या संस्थांनी केलेले एकूण उत्पादन व पुरवठा बाजारातील त्या वस्तुंच्या मागणीबरोबर असेल तर अशा वेळी उद्योगाचे तात्पुरते संतुलन झाले असे म्हणावे. परंतु अशी परिस्थिती पूर्ण स्पर्धेत क्वचित

प्रमाणात निर्माण होते. त्यामुळे पूर्ण स्पर्धेत उद्योगांचे संतुलन हे तात्पुरते संतुलन असते असे मानले जाते. असे संतुलन केंव्हा निर्माण होते हे निश्चितपणे सांगता येत नाही.

## पूर्ण स्पर्धेत उद्योग व उद्योग संस्थांचे दीर्घकालीन संतुलन :

## Long run equilibrium of firmand industry :


पूर्ण स्पर्धेमध्ये उद्योग व उद्योगांचे दीर्घकालीन संतुलन कसे होते हे कालखंडावर अवलंबून आहे. यापूर्वी आपण अल्पकाळाचा अर्थ पाहिलेला आहे. येथे दीर्घकाळ म्हणजे ज्या कालखंडात उद्योग किंवा उद्योग संस्थांच्या सर्वच खर्च किंवा घटक हे बदलते असतात. त्यास दीर्घकालखंड म्हणतात. हा कालखंड साधारणतः पंचेवीस वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक गृहित धरला जातो. दीर्घकालखंडात उद्योग संस्थेला उत्पादन वाढविण्यासाठी उत्पादन घटकात पाहिजे तसा बदल करता येतो. म्हणजेच मागणीप्रमाणे पुरवठ्यात वाढ किंवा घट करता येते. दीर्घकाळात उद्योग संस्थेला आपल्या उद्योग संस्थेचा विस्तार करणे, उद्योग संस्थेत नवीन यंत्रसामुग्री बसवणे इ. गोष्टी करता येतात. त्याचबरोबर दीर्घकाळात अनेक नविन उद्योग संस्था स्थापन होऊ शकतात. या सर्वांमुळे दीर्घकाळात वस्तुचा आवश्यकतेनुसार पुरवठा करता येतो.

दीर्घ काळात ज्याप्रमाणे उत्पादनात वाढ घडऊन आणता येते त्याचप्रमाणे जर उत्पादन अधिक झाले किंवा एखाद्या उद्योगात आवश्यकतेपेक्षा उत्पादन संस्थांची संख्या अधिक झाली तर ही संख्या किंवा उत्पादन वाढ कमी करता येते. अशा वेळी या उद्योगातून कांही उत्पादन संस्था बाहेर पडतात. परिणामी वस्तुचे उत्पादन कमी होऊन ते मागणी बरोबर राहते. अशा प्रकारे मार्शल यांच्या मते दीर्घकाळात पूर्ण स्पर्धेत उद्योग संस्थांचा प्रवेश व बाहेर जाणे यावर बंधन नसते. म्हणूनच मागणी प्रमाणे उत्पादन ठेवता येते. पूर्ण स्पर्धेत दीर्घकाळात वस्तुची किंमत संतुलीत होण्यासाठी पुढील अटी पूर्ण होणे आवश्यक आहे.

१. त्या उद्योगातील सर्व संस्था संतुलनाच्या सिमांत पद्धतीनुसार संतुलीत असून सर्व संस्थांचे सिमांत खर्च व सिमांत उत्पन्न सारखे असते.

२. प्रत्येक संस्थेला केवळ सर्वसाधारण नफा मिळतो. म्हणजे प्रत्येक संस्थेचा सरासरी खर्च व सरासरी उत्पन्न (प्राप्ती) बरोबर असते. तसेच विश्लेषणाच्या सोयीसाठी कार्यरत असलेल्या सर्व संस्थांची सरासरी (प्राप्ती) किंवा सरासरी खर्च समान आहेत असे गृहीत धरले जाते.

वरील गृहीतावरुन पूर्ण स्पर्धेत दीर्घकाळात उद्योग व उद्योग संस्थांचे संतुलन कसे होते. हे पुढील आकृतीत स्पष्ट केले आहेत.




आ.क्र.४.५

वरील आकृतीमध्ये अक्ष भुजावर उत्पादन च अय भुजावर किंमत दर्शवली आहे. दीर्घकाळात पूर्ण स्पर्धेत वस्तुच्या मागणी पुरवठ्यातून संतुलीत किंमत ठरत असते. वरील आकृतीमध्ये दि.सी.ख. व दि.सी.ख. (LAC) हे अनुक्रमे पसरट आकाराचे दीर्घकालीन सिमांत व सरासरी खर्चाचे वक्र आहेत. अशा परिस्थितीत उद्योग संस्थेचे संतुलन 'स' या बिंदूमध्ये होऊन अम इतके उत्पादनाचे प्रमाण निश्चित होते. सर्व संस्थांचे खर्च समान आहेत. असे गृहीत मानल्यामुळे पूर्ण स्पर्धेत सर्वच उद्योग संस्थांचे 'स' या बिंदूत संतुलन होते. कारण संस्थेच्या संतुलनाच्या दोन्हीही अटी त्याठिकाणी पूर्ण होतात.

वरील आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे केवळ 'स' बिंदूमध्ये वैयक्तीक उद्योग संस्थेचे संतुलन होते असे नसून संपूर्ण उद्योगांचेच संतुलन होते. कारण 'स' बिंदूत उद्योगाच्या संतुलनाची तिसरी अट पूर्ण होते. हीं अट म्हणजे **सरासरी प्राप्ती = सरासरी खर्च.** ही अट पूर्ण होत असल्यामुळे वस्तुची अप ही किंमत सर्व संस्थांचा दीर्घकालीन सरासरी खर्च भरुन काढणारी असते. संतुलनाच्या या अवस्थेत प्रत्येक उद्योग संस्थेला मिळणारी किंमत जेमतेम त्या वस्तुच्या दीर्घकालीन सरासरी खर्चाबरोबर असल्यामुळे सर्वच संस्थांना केवळ सर्वसाधारण नफा मिळतो. त्यामुळे पूर्णस्पर्धेमध्ये मुक्त प्रवेश असला तरी कोणत्याही उद्योग संस्था उद्योगात प्रवेश करणार नाहीत किंवा कार्यरत असलेल्या उद्योग संस्था उद्योगामधून बाहेर जाणार नाहीत. म्हणून दीर्घकाळात उद्योग संस्थेत एवढ्याच प्रमाणात संस्था कार्यरत असतात. आणि तेवढ्याच प्रमाणात उत्पादन करतात की, जेवढी त्यांची मागणी असते. या पद्धतीने होणाऱ्या संतुलनात पूर्ण स्पर्धेतील उद्योग व उद्योग संस्थेचे दीर्घकालीन संतुलन असे म्हंटले जाते. अशा बाजारपेठेतील संतूलनावरुन कांही निष्कर्ष काढता येतील.

१. दीर्घकाळात पूर्णस्पर्धेत सर्वच उद्योग संस्था किंवा संपूर्ण उद्योग हा संतुलनाच्या अवस्थत असतो.

२. आकारली जात असलेली वस्तुची किंमत केवळ त्या वस्तुच्या सरासरी

Use With Care

खर्चाबरोबरच असते असे नसून ती किंमत संबंधीत वस्तुच्या दीर्घकालीन, सिमांत प्राप्ती व सरासरी प्राप्ती बरोबर असते. म्हणून पूर्ण स्पर्धेत दीर्घकाळात वस्तुची **किंमत = सरासरी प्राप्ती = सिमांत प्राप्ती = सरासरी खर्च = सिमांत खर्च** अशी असते.

३. संतुलनाच्या वरील किंमतीवरुन असे स्पष्ट होते की, दीर्घकाळात प्रत्येक संस्था करत असलेले उत्पादन हे पर्याप्त आकारमानाचे असते. कारण प्रत्येक संस्था व संपूर्ण उद्योग करत असलेले उत्पादन दीर्घकालीन सरासरी खर्चाच्या बरोबर असते. आकृतीमध्ये 'स' बिंदू हा हे संतुलन दर्शवतो. जो सरासरी खर्चाच्या वक्राचा किमान बिंदू आहे. त्यामुळे अशा निष्कर्षास येता येते की, दीर्घकाळात प्रत्येक उद्योग हा पर्याप्त आकारमानावर कार्यरत असतो.

४. दीर्घकाळात पूर्णस्पर्धेत सर्वच संस्था पर्याप्त आकारमानात कार्य करत असल्यामुळे सर्व उत्पादन घटकांचा पूर्ण उपयोग करुन घेतला जातो. यामुळे कोणताही घटक निकामी राहत नाही. म्हणजे पूर्ण स्पर्धेत दीर्घकाळात उत्पादन घटकांच्या स्वरुपात राष्ट्रीय संपत्ती वाया जात नाही. व आकारात असलेली किंमत कमीत कमी असल्यामुळे सर्व ग्राहकांचा फायदा होतो.

अशा प्रकारे पूर्णस्पर्धेत दीर्घकाळात उद्योग व उद्योग संस्थांचे संतुलन घडून येते.

## ४.३ मक्तेदारी (एकाधिकार बाजारपेठ) :


### Monopoly :

मक्तेदारी हा बाजाराचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे. मक्तेदारीला इंग्रजीमध्ये Monopoly असे म्हणतात. Mono म्हणजे एक आणि poly म्हणजे विक्रेता. म्हणून 'मक्तेदारी म्हणजे एक विक्रेता असलेली बाजारपेठ होय.'

ज्यावेळी बाजारात एखाद्या वस्तुचा एकच विक्रेता (उत्पादक) असतो अशा वेळी मक्तेदारी निर्माण होते. विक्रेता एकच असल्यास वस्तूच्या पुरवठ्यावर त्याचे नियंत्रण असते. असंख्य ग्राहक असल्यामुळे मक्तेदाराला उत्पादन विषयक किंवा किंमतीविषयक धोरणात बदल करुन जास्तीत जास्त नफा मिळवता येतो.

अर्थ : मक्तेदारीच्या व्याख्या वेगवेगळ्या तज्ज्ञांनी वेगवेगळ्या केल्या आहेत. त्यापैकी प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**प्रा. लर्नर, 'ज्या विक्रेत्याच्या वस्तूस अधोगामी मागणीवक्र असतो, त्या विक्रेत्यास मक्तेदारी असे म्हणतात.'** लर्नर यांनी या व्याख्येत एक विक्रेता या तत्त्वावर भर दिला असून अलवचिक मागणीवक्र या तत्त्वावर भर दिला आहे. तो पुढीलप्रमाणे असतो.




आ.क्र.४.६

वरील आकृतीमध्ये विक्रेत्याच्या वस्तूस मागणी वक्र अधोगामी आहे किंवा डावीकडून उजवीकडे वरुन खाली येणारा आहे हे दर्शवले आहे.

**प्रा. चेंबरलीन, 'पुरवठ्यावर उद्योगसंस्थेचे नियंत्रण म्हणजे मक्तेदारी.'** चेंबरलीन यांनी आपल्या व्याख्येत पुरवठ्यावर उत्पादकाचा किती ताबा आहे, त्यावरुन मक्तेदाराची व्याख्या केली आहे.

वरील दोन्ही व्याख्यांवरुन मक्तेदारीची साधारण व्याख्या पुढीलप्रमाणे देता येईल. **'मक्तेदारीत एक विक्रेता असून त्याचे वस्तूच्या पुरवठ्यावर नियंत्रण असते व त्याच्या वस्तूस जवळचे पर्याय नसतात.'**

थोडक्यात, मक्तेदारीत एकच विक्रेता असतो. तसेच त्याचे वस्तूच्या पुरवठ्यावर नियंत्रण असून वस्तूस जवळचा पर्याय नसतो. यामुळे विक्रेता किंमतीवर परिणाम करु शकतो. मक्तेदारी कायद्यामुळे, नैसर्गिक कारणामुळे निर्माण होऊ शकते.

**मक्तेदारीचे वैशिष्टचे :** I.M.P

पूर्ण स्पर्धेच्या विरुद्ध मक्तेदारीचे वैशिष्टचे आहे. आपण पूर्ण स्पर्धेस अंधार मानले तर मक्तेदारीस प्रकाश मानावे लागेल. थोडक्यात, दोन्ही स्पर्धा परस्पर विरोधी आहेत. मक्तेदारीची वैशिष्टचे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. एक विक्रेता असतो :**

मक्तेदारीमध्ये एक विक्रेता किंवा एकच उत्पादक असतो. एक विक्रेता म्हणजे एखाद्या वस्तुचा एकटा उत्पादक किंवा जास्त उत्पादक असले तरी ते आपआपसात संगनमत करुन वस्तुच्या उत्पादन व विक्रीबाबत एक विचाराने निर्णय घेत असतात आणि त्या निर्णयाची अंमलबजावणी करत असतात. त्यामुळे त्यांना वेगवेगळे उत्पादक संबोधन्या ऐवजी एक विक्रेता असे संबोधले जाते. मक्तेदारी मध्ये एकच विक्रेता असल्यामुळे पूर्ण स्पर्धेचा अभाव असतो. ग्राहक असंख्य असतात त्यामुळे ग्राहकात स्पर्धा असते. यामुळे मक्तेदारी बाजारपेठेत उद्योग व उद्योग संस्था यांच्यातील फरक स्पष्ट होतो. त्यामुळे उद्योग व उद्योग संस्था अशा वेगवेगळ्या संतुलनाची गरज नसते.

याशिवाय एकच उत्पादक असल्यामुळे मक्तेदारीत तोच किंमतकर्ता असतो. अल्प व दीर्घकाळात त्यास अतिरिक्त नफा मिळण्याची शक्यता असते. म्हणून अशा बाजारपेठेत अल्पकालीन व दीर्घकालीन संतुलनाचा विचार करण्याची आवश्यकता नसते.

मक्तेदारीमध्ये एकच उत्पादक असल्यामुळे तो किंमती कमी अधिक करु शकतो. म्हणून वस्तुचा सिमांत प्राप्ती वक्र पूर्ण स्पर्धे सारखे क्षितीजाला समांतर नसतात. तर ते सिमांत प्राप्ती वक्र वरुन खाली येणाऱ्या आकाराचे असतात व तो सरासरी प्राप्तीच्या खालच्या बाजूस असतो.

**२. मुक्त प्रवेश नसतो :**

पूर्ण स्पर्धेमध्ये विक्रेत्यांना ज्या प्रमाणे बाजारपेठेत मुक्त प्रवेश असतो त्याप्रमाणे मक्तेदारीत हा मुक्त प्रवेश असत नाही. मक्तेदारीत वेगवेगळ्या कारणाने वेगवेगळी मक्तेदारी निर्माण होते. या संबंधी असे म्हंटले जाते की, मक्तेदाराचे यश हे नवीन संस्थांना उद्योगात प्रवेश न करु देण्यात असते. त्यामुळे मक्तेदारीत स्पर्धेचा पूर्णपणे अभाव असतो. परिणामतः मक्तेदार दीर्घकाळापर्यंत अतिरिक्त नफा मिळवू शकतो किंवा मूल्यभेद करु शकतो. मूल्यभेद म्हणजे एकाच प्रकारच्या वस्तुची वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळी किंमत आकारने होय.

**३. दीर्घ काळात अतिरिक्त नफा मिळवणे शक्य असते :**

मक्तेदार हा एकटाच असल्यामुळे बाजारातील वस्तुची मागणी लक्षात घेऊन वस्तुचे उत्पादन व विक्री मक्तेदाराकडून केली जाते. मक्तेदार अशा प्रकारची किंमत आकारतो की, ज्यामुळे त्यास अल्प व दीर्घकाळात अतिरिक्त लाभ होतो.

**४. वस्तुस जवळचा पर्याय नसतो :**

मक्तेदार ज्या वस्तुची विक्री किंवा उत्पादन करतो त्या वस्तुला बाजारपेठेत जवळचा पर्याय असत नाही. त्यामुळे मक्तेदार उत्पादन करीत असलेल्या वस्तुवर तिची किंमत कांही असली तरी ग्राहक आपले उत्पन्न त्या वस्तुच्या खरेदीसाठी निश्चितपणे खर्च करत असतो.

**५. सिमांत खर्च वक्र अधोगामी असू शकतो :**

मक्तेदारीमध्ये संतुलनाकरीता सिमांत खर्चवक्र नेहमीच उर्ध्वगामी असला पाहिजे असे नाही. मक्तेदारीत सिमांत खर्चवक्र संतुलनाच्या वेळी अधोगामी किंवा अक्ष या भुजास समांतर असू शकतो.

**६. जाहिरात नसते :**

मक्तेदारीत बाजारपेठेत उत्पादकाच्या वस्तूस जवळचा पर्याय नसतो. त्यामुळे त्याला वस्तुची जाहिरात करण्याची गरज नसते. म्हणजेच मक्तेदारास विक्री खर्च करावा

लागत नाही. म्हणून मक्तेदाराच्या नफ्यात वाढ होते.

७. मूल्यभेद करता येतो :

मक्तेदारीत मक्तेदार मूल्यभेद करुन जास्तीत जास्त नफा मिळवू शकतो. म्हणजे मक्तेदार हा ग्राहक पाहून किंमत आकारु शकतो. वेगवेगळ्या ग्राहकांना किती किंमत आकारावी हे मक्तेदाराच्या इच्छेवर अवलंबून असते. बाजारपेठेमध्ये कांही ग्राहक सामान्य असतात तर कांही ग्राहक श्रीमंत असतात. अशा स्थिती वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळी किंमत मक्तेदार आकारु शकतो. व अतिरिक्त नफा मिळवू शकतो.

८. असंख्य ग्राहक :

मक्तेदारीमध्ये ग्राहकांची संख्या मोठी असते. त्यामुळे ग्रहकांचे बाजारपेठेवर नियंत्रण नसते. उलट विक्रेत्याचे बाजारपेठेवर नियंत्रण असल्यामुळे विक्रेता हा किंमत कर्ता असतो. मक्तेदारीत मक्तेदार ज्या किंमतीला वस्तुचा पुरवठा करेल तिच किंमत ग्राहकाला स्विकारावी लागते. म्हणून मक्तेदारीत ग्राहक हा गुलाम असतो. असे म्हंटले जाते.

अशा प्रकारे मक्तेदारीची काही प्रमुख वैशिष्टचे आहेत.

मक्तेदारीमध्ये उद्योग संस्थेचे संतुलन कसे होते हे पाहण्यापूर्वी पुढील संकल्पनांचा अर्थ लक्षात घेणे आवश्यक आहे.

**१. एकूण प्राप्ती (उत्पन्न)** : 'वस्तूची विशिष्ट नगसंख्या विकून विक्रेत्याला मिळणारे एकूण उत्पन्न म्हणजे एकूण प्राप्ती होय.'

सुत्राने :

एकूण प्राप्ती = वस्तूची किंमत × मागणी नग संख्या

**२. सरासरी प्राप्ती (उत्पन्न) :** एकूण प्राप्तीला विकलेल्या नगसंख्येने भागले असता, सरासरी प्राप्ती येते. थोडक्यात सरासरी प्राप्ती म्हणजे वस्तूच्या प्रत्येक नगाच्या विक्रीपासून मिळणारे उत्पन्न होय.

$$\text{सरासरी प्राप्ती} = \frac{\text{एकूण प्राप्ती}}{\text{विकलेली नगसंख्या}}$$

**३. सीमांत प्राप्ती (उत्पन्न)** : 'वस्तूचा एक जास्ती नग विकल्यामुळे एकूण प्राप्तीत होणारी वाढ म्हणजे सीमांत प्राप्ती होय.'

**४. एकूण खर्च :** 'सर्व वस्तूचे विशिष्ट परिमाण निर्माण करण्यासाठी उत्पादकास जो खर्च येतो त्यास एकूण खर्च म्हणतात.'

**५. सरासरी खर्च :** 'एकूण खर्चाला उत्पादन नगसंख्येला भागले असता सरासरी खर्च मिळतो.

$$\text{सरासरी खर्च} = \frac{\text{एकूण खर्च}}{\text{नगसंख्या}}$$

**६. सीमांत खर्च :** 'एकूण उत्पादनात एक नग वाढ करण्यासाठी एकूण उत्पादन खर्चात होणाऱ्या वाढीस सीमांत खर्च म्हणतात.'

**मक्तेदारीत मूल्यनिश्चिती (एकाधिकार) Price determination under Monopoly :**

मक्तेदारीत मूल्य आणि उत्पादन निश्चितीचा विचार करतांना दीर्घकाळाचाच प्रामुख्याने विचार केला जातो.

मक्तेदारीत मक्तेदाराचा हेतू हा जास्तीत जास्त नफा मिळवणे हा असतो. हा हेतू साध्य करण्यासाठी मक्तेदार दोन प्रकारचे मार्ग स्वीकारु शकतो.

अ) वस्तूची किंमत कमी ठेवून जास्त विक्री करणे.

ब) वस्तूची किंमत जास्त ठेवून कमी नग विकणे.

या दोन्हीपैकी कोणताही मार्ग स्वीकारला तरी मक्तेदारास नफा मिळवण्याचे उद्दिष्ट साध्य करता येते.

मक्तेदारीत, मक्तेदारास वस्तूची किंमत कितीही आकारता येते, कारण त्याच्या वस्तूस जवळचा पर्याय नसतो. तसेच त्याचे पुरवठ्यावर नियंत्रण असते, अशा स्थितीत मक्तेदारास अधिक नफा मिळवण्यासाठी त्याच्या वस्तूचा सिमांत उत्पादन खर्च (सी.ख.) आणि सीमांत उत्पन्न (सी.उ.) हे दोन्ही समान झाले पाहिजेत. या वेळी मक्तेदारास अधिक नफा मिळतो. या किंमतीलाच मक्तेदारांतील किंमत म्हणतात.

**कोष्टकाद्वारे स्पष्टीकरण :**

मक्तेदारीत किंमत कशी निश्चित होते ते पुढील प्रमाणे लक्षात येईल.

**तक्ता ४.१**


| उत्पादन नग | सरासरी उत्पादन | एकूण उत्पादन | सीमांत उत्पादन | सरासरी खर्च | एकूण खर्च | सीमांत खर्च | नफा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६ | १६ | १६ | १२.७५ | १२.७५ | १२.७५ | ३.२५ |
| २ | १५ | ३० | १४ | १२.५० | २५.०० | १२.२५ | ५.०० |
| ३ | १४ | ४२ | १२ | १२.३३ | ३७.०० | १२.०० | ५.०० |
| ४ | १३ | ५२ | १० | १२.०० | ४८.०० | ११.०० | ४.०० |
| ५ | १२ | ६० | ०८ | ११.४० | ५७.०० | ९.०० | ३.०० |

वरील तक्त्यात सीमांत उत्पादन (प्राप्ती) आणि सीमांत खर्च (१२ रु.) जेव्हा समान होतात तेंव्हा ५ रु. हा सर्वाधिक नफा मिळतो. यावेळी उत्पादक ३ नगांचे

उत्पादन करील व त्याची किंमत १४ रु. ठेवेल. मक्तेदारीत उद्योगसंस्थेचे संतुलन अशाच ठिकाणी होते, की ज्या ठिकाणी सीमांत उत्पादन व सीमांतखर्च बरोबर होतो.

**आकृतीने स्पष्टीकरण :**

मक्तेदारीत उत्पादन खर्च वक्र नेहमी 'U' या इंग्रजी अक्षरासारखे असतात. परंतु उत्पन्न वक्र मात्र डावीकडून उजवीकडे अधोगामी असतात. अशा स्थितीत मक्तेदारीत उद्योग संस्थेचे संतुलन सी. उ = सी. ख. हे समान कसे होते ते पुढील आकृतीत दाखविले आहे.




आ.क्र.४.७

वरील आकृतीत स.उ. आणि सी.उ. हे अधोगामी असल्यामुळे पूर्ण स्पर्धा नाही हे उघड आहे. सी. उ. वक्र सी. ख. वक्राला 'स' बिंदू छेदतो, त्यामुळे सी.**उ.= सी. खर्च** ही संतुलनाची अट पूर्ण होत असल्यामुळे मक्तेदारीत उद्योग संस्थेचे संतुलन होते. हे संतुलन होण्याकरिता 'अब' उत्पादन असणे आवश्यक आहे. मक्तेदार किंमत अशा प्रकारे ठेवील की, त्यास जास्तीत जास्त नफा प्राप्त होईल. हा नफा त्यास स.उ. व स.ख. ह्यातील अंतराने मिळेल. 'स' हा संतुलन बिंदू असल्यामुळे ह्या बिंदूच्या संदर्भात स.उ. व स. खर्च यामधील अंतर 'मप' ने दर्शविले जाते. म्हणजेच किंमत 'स' येथे न ठेवता तो 'म' च्या संदर्भात 'अर' अशी ठेवेल, कारण 'अर' किंमत ठेवल्यास त्या स.उ. व स.ख. मधील जास्तीत जास्त फरक मिळाल्यामुळे 'रमपन' इतका नफा प्राप्त होईल. हा नफा अतिरिक्त आहे. अशा प्रकारे 'अब' उत्पादन करुन मक्तेदार संतुलीत तर होतोच, परंतु 'अर' किंमत ठेवल्याने त्यास 'रमपम' इतका अतिरिक्त नफाही प्राप्त होतो. अशा प्रकारे मक्तेदारीत संतुलन, मूल्य-निश्चीती आणि उत्पादन-निश्चीती हे तिन्ही एकाच वेळी कसे होतात हे वरील आकृतीवरुन लक्षात येते.

**मक्तेदारीत मूल्यभेद भेदाभेद करणारी मक्तेदारी :**

**Price discrimination under monopoly :**

मुल्यभेद म्हणजे एक विशिष्ट वस्तू वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळ्या किंमतीला

आकारणे होय. मक्तेदार मक्तेदारीमध्ये एकाच प्रकारची वस्तु वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळ्या किंमतीला आकारुन अतीरिक्त नफा मिळवू शकतो. श्रीमती जोन रॉबिन्सन यांच्या मते, **'एकाच नियंत्रणाखाली निर्माण झालेली एक वस्तु निरनिराळ्या ग्राहकांना वेगवेगळ्या किंमतीला विकणे म्हणजे मूल्यभेद होय.'** मूल्यभेद प्रक्रियेत एकाच प्रकारची वस्तू वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळ्या किंमतीला विकली जाते. उदा. बाजारपेठेमध्ये विशिष्ठ प्रकारचे अंबे असतील तर 'अ' व्यक्तीला २० रु. किलोप्रमाणे विकणे तर 'ब' व्यक्तीला ३० रु. किलोने विकणे होय. अशी प्रक्रिया म्हणजे मूल्यभेद होय.

**मूल्यभेदाचे प्रकार :**

मूल्यभेदाचे प्रमुख चार प्रकार आहेत ते पुढील प्रमाणे.

**१. व्यक्तीनुसार मूल्यभेद (Personal Price Decrimination) :**

जेव्हा वेगवेगळ्या लोकांची किंवा ग्राहकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन एकच वस्तु वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळ्या किंमतीनुसार विकणे म्हणजे व्यक्तीनुसार मुल्यभेद होय. व्यक्तीनुसार मुल्यभेदामध्ये ग्राहकांची वस्तु खरेदी करण्याची कुवत लक्षात घेऊन किंमत आकारली जाते. ज्यांची क्रयशक्तीची इच्छा अधिक असते त्यांना अधिक किंमतीने वस्तु विकता येतात.

**२. स्थानानुसार मूल्यभेद (Geographical Price Descrimination) :**

जेंव्हा मक्तेदार एकाच प्रकारच्या वस्तूला वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी किंमत आकारतो त्यास स्थानानुसार मूल्यभेद असे म्हणतात. उदा. आंबे लातूरमध्यें २० रु. किलो विकणे आणि नांदेड मध्ये ३० रु. किलो विकणे.

**३. वस्तुच्या उपयोगानुसार मूल्यभेद :**

जेंव्हा वस्तुची किंमत आकारतांना मक्तेदार निरनिराळ्या उपयोगासाठी निरनिराळी किंमत आकारतो तेंव्हा त्यास उपयोगानुसार किंवा व्यवसायानुसार मूल्यभेद म्हणतात. उदा. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे ग्राहकांना आणि व्यवसायिकांना वेगवेगळ्या दराने त्यांच्या उपयोगानुसार विजेचे दर आकारते. हा दर घरगुती वापरासाठी वेगळा व व्यवसायासाठी वेगळा असतो.

**४. सेवेच्या वेळेनुसार मूल्यभेद :**

मक्तेदार देत असलेल्या सेवेच्या वेळेनुसार जंव्हा किंमत आकारतो तेंव्हा त्यास सेवेच्या वेळेनुसार मूल्यभेद असे म्हणतात.

अशा प्रकारे मूल्यभेदाचे वेगवेगळे प्रकार आहेत.

**मूल्यभेदाच्या श्रेणी Degrees of Price Discrimination :**

प्रो. पिगु यांनी Economics of welfare या पुस्तकात मूल्यभेदाच्या पुढील तीन

सुविधांची आवश्यकता आहे ते अधिक दर देऊन त्या सेवेचा लाभ घेऊ शकतात. यामुळे वाहतुक संस्थेला अधिक उत्पन्न मिळते व या उत्पन्नाच्या सहाय्याने ते प्रगती करु शकतात.

३. सामाजिक कल्याणात वाढ :

सार्वजनिक व्यवसायात तयार होणाऱ्या वस्तु गरीबांना कमी किंमतीत आणि श्रीमंतांना अधिक किंमतीस विकल्या तर सामाजिक समता निर्माण होण्यास मदत होते. श्रीमंताकडून जो अधिक पैसा येईल तो सामाजिक हितावर खर्च केल्यास सामाजिक कल्याणात वाढ होत असते.

४. रोजगारात वाढ :

देशामध्ये मोठ्या प्रमाणात बेकारी असेल तर ही बेकारी कमी करण्यासाठी स्वदेशातील वस्तु अधिक दराने विकल्या आणि परदेशातून येणाऱ्या वस्तुवर निर्बंध घातले तर यामुळे रोजगार व्राढीसाठी मदत होते. तसेच देशीय उत्पादनांचा विकास होतो.

**५. वेतन दरामुळे निर्माण होणारी विषमंता कमी होते :**

जर वेतनदरात तफावत असेल तर त्यामुळे समाजात विषमता निर्माण होत असते. अशा वेळी मूल्यभेदाद्वारे जास्त वेतन असणाऱ्यांना जास्त दराने वस्तु विकल्या आणि कमी वेतन असणाऱ्यांना कमी दराने वस्तु विकल्या तर समता निर्माण होण्यास मदत होते.

अशा प्रकारे वरील मुद्याच्या आधारे मूल्यभेदाची उपयुक्तता स्पष्ट करता येते.

## ४.४ मक्तेदारीयुक्त किंवा अपूर्ण स्पर्धा :

### Monopolostic Competition or Imperfect Competition :

इ.स. १९२७ पूर्वी मूल्यनिश्चितीमध्ये बहुतेक शुद्ध स्पर्धा व एकाधिकारी बाजारपेठेमध्येच मूल्यनिश्चिती कशी होते याचा अभ्यास केला जात असे. परंतु या अभ्यासामुळे अनेकांचे समाधान होत नव्हते. कारण शुद्ध स्पर्धा आणि एकाधिकारी स्पर्धेतील विवेचन हे वास्तवतेच्या दृष्टीने अयोग्य होते. अशा स्थितीत सर्वप्रथम प्रो. श्राफा यांनी Economica या मासिकात १९२६ मध्ये कांही विचार मांडले. त्यानंतर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी मूल्यनिश्चितीसंबंधी वेगवेगळे सिद्धांत मांडण्याचे प्रयत्न केले. या संबंधात **प्रो. एडवर्ड चेंबरलीन** यांनी १९२७ मध्ये एकाधिकार व स्पर्धा यांचे निश्चित बाजारपेठेत वस्तुचे मूल्य निश्चितीवर प्रकाश टाकणारा आपला प्रबंध हार्वर्ड (अमेरिका) विद्यापीठात सादर केला आणि प्रचलित संशोधन कार्य चालूच ठेवले. याच स्थितीत **श्राफा** यांच्या विचाराने प्रभावित होऊन अनेक तज्ञ मूल्यनिश्चितीबाबत इंग्लंडच्या केंब्रीज

विद्यापीठात प्रयत्न करु लागले. अशा प्रकारे इंग्लडच्या केंब्रीज विद्यापीठातीलच **श्रीमती जॉन रॉबिन्सन** यांही मूल्यनिश्चितीचे संशोधन करत होत्या. १९३३ मध्ये चेंबरलीन यांनी The Theory of monopolostic competition हे पुस्तक तर श्रीमती रॉबिन्सन यांनी १९३३ Economics of Imperfect competition हे पुस्तक प्रकाशित केले. या ग्रंथाच्या प्रसिद्धीमुळे बाजारपेठेचा मूल्यनिश्चितीच्या दृष्टीकोणातून एकाधिकार व शुद्ध स्पर्धा यांचे मिश्रण असणारा एकाधिकारयुक्त स्पर्धा किंवा अपूर्ण स्पर्धा असा हा तिसरा प्रकार मानला जावू लागला.

वास्तविक पाहता **प्रो. चेंबरलीन** आणि श्रीमती **रॉबिनसन** या दोन्हीच्या सिद्धांतामध्ये तात्विक दृष्टया कांही साम्य तर कांही भेदही आहेत. दोघांनीही वस्तुच्या मूल्यनिश्चितीमध्ये शुद्ध एकाधिकार व पूर्ण स्पर्धा यांचे मिश्रण असणाऱ्या बाजारपेठेचे स्पष्टीकरण केलेले आहे. तर दोघांच्या विवेचनात फरक असा आहे की, **प्रो. चेंबरलीन** यांच्या संशोधनाचा विषय हा किंमतीचा नवीन सिद्धांत मांडणे हा होता तर **श्रीमती रॉबिन्सन** यांच्या संशोधनाचा उद्देश अर्थशास्त्रज्ञांना उपयुक्त अशी सैद्धांतिक उपकरणे उपलब्ध करुन देणे हा होता. अशा प्रकारे **प्रो. चेंबरलीन** आणि **श्रीमती जॉन रॉबिन्सन** या दोन्हीच्या विचारांच्या मिश्रणातून प्रत्यक्षात उतरलेली बाजारपेठ म्हणजे मक्तेदारी युक्त स्पर्धा आहे असे म्हणता येईल. मक्तेदारी युक्त स्पर्धा किंवा अपूर्ण स्पर्धा म्हणजे ज्या अवस्थेत पूर्ण स्पर्धाही नसते आणि मक्तेदारीचीही अवस्था नसते. अशा प्रकारची बाजारपेठ होय. श्रीमती जॉन रॉबिन्सन यांनी या बाजारपेठेला अपूर्ण स्पर्धा असे म्हटले आहे तर **प्रो. चेंबरलीन** यांनी या बाजारपेठेस मक्तेदारी युक्त स्पर्धा असे म्हंटले आहे.

**मक्तेदारीयुक्त स्पर्धेच्या व्याख्या :**

मक्तेदारयुक्त स्पर्धेच्या कांही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. 'मक्तेदारी स्पर्धा ही अशी स्पर्धा आहे की, जेथे असंख्य विक्रेते भिन्न प्रकारच्या वस्तुंच्या नगांची विक्री करतात. वस्तु वरकरणीसारखी दिसून एकमेकांचे जवळचे पर्याय असतात.'

२. 'मक्तेदारी युक्त स्पर्धा म्हणजे ज्या बाजारात अगदी जवळचा पर्याय असलेल्या परंतु पूर्ण पर्याय नसलेल्या असंख्य विक्रेत्यामध्ये स्पर्धा असते.'

३. प्रो. चेंबरलीनच्या मते 'मक्तेदारयुक्त स्पर्धा म्हणजे अशी बाजारपेठे जेथे असंख्य विक्रेते भिन्न प्रकारच्या नगांच्या वस्तुची विक्री करतात जे एकमेकांना जवळचे पर्याय असतात अशी बाजारपेठ होय.'

वरील सर्व व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की, मक्तेदारीयुक्त स्पर्धा म्हणजे अशी बाजारपेठ की जेथे उत्पादक विशिष्ट गरज भागवणाऱ्या वेगवेगळ्या वस्तु निर्माण करत

असले तरी विक्री करण्यात स्पर्धा करत असतात. प्रत्येक विक्रेते विकत असलेल्या वस्तुस जवळचा पर्याय उपलब्ध असतो.

**मक्तेदारीयुक्त स्पर्धेची वैशिष्ट्ये :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील आहे.

**१. अनेक उत्पादक व अनेक उपभोक्ते :**

प्रो. चेंबरलीन व श्रीमती जॉन रॉबिन्सन यांच्या मते मक्तेदरीयुक्त स्पर्धेत प्रत्येक वस्तुचे असंख्य उत्पादक असतात. परंतु या ठिकाणी असंख्य या शब्दाचा अर्थ पूर्ण स्पर्धेप्रमाणे असंख्य असा घेतला जात नाही. असंख्य म्हणजे जास्त परंतु यास मर्यादा आहेत. प्रत्येक वस्तुच्या उत्पादकाचे व विक्रेत्यांचे प्रमाण किती असेल हे वस्तुच्या मागणीचे प्रमाण तिचा टिकाऊपणा किंवा नाशवंतपणा किंवा त्या वस्तुला असलेली मागणीची लवचिकता इत्यादीवर अवलंबून असते. या प्रत्येक व विक्रेत्यामध्ये तो स्वतःपुरता मक्तेदार असून वस्तुची विक्रीं करण्यात स्पर्धा चाललेली असते.

यावरुन मक्तेदारीयुक्त स्पर्धेत असंख्य उपभोक्ते म्हणजे अमर्यादीत उपभोक्ते नव्हेत तर प्रत्येक वस्तुच्या ग्राहक वर्गाचे प्रमाण ही विशिष्ट किंवा ठराविकच असते. असे स्पष्ट होते. ग्राहकामध्ये वस्तु खरेदी करण्यात स्पर्धा चाललेली असते. अशा प्रकारे मक्तेदारीयुक्त स्पर्धेत अनेक उत्पादक किंवा विक्रेते आणि अनेक उपभोक्ते असतात. हे उपभोक्ते किंवा विक्रेते किंमतीविषयी स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतात. ग्राहकही स्वतःला परवडले तर वस्तुची खरेदी करतात.

**२. मुक्त प्रवेश व निर्गमन :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे एक महत्वाचे लक्षण म्हणजे विक्रेत्यांना किंवा उत्पादन संस्थांना उद्योगात प्रवेश करण्याचे किंवा उद्योगातून बाहेर पडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. उत्पादन संस्थांचा आकार लहान असल्याने आणि जवळचे पर्याय असलेल्या वस्तू उत्पादित करण्याची त्यांची क्षमता असल्यामुळे दीर्घकाळात नवीन उत्पादन संस्था उद्योगात प्रवेश करु शकतात आणि उद्योगातून बाहेर पडू शकतात. वस्तु भेदामुळे नवीन संस्थांना उद्योगात प्रवेश करण्याची संधी मिळते.

**३. वस्तुभेद :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे हे एक प्रमुख वैशिष्ट्ये आहे. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत उत्पादन संस्थांनी उत्पादित केलेल्या वस्तू एकजिनसी जरी नसल्या तरी त्या एक सारख्या असतात. त्यांच्यामध्ये अल्पसा फरक असून त्या एकमेकांना जवळच्या पर्यायी असतात परंतु त्या पूर्ण पर्यायी नसतात. त्यामुळेच आपली वस्तू इतरांच्या वस्तूपेक्षा निराळी आहे हे दाखवून प्रत्येक विक्रेता, उत्पादन संस्था, वस्तुची विक्री वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो. आपली वस्तू

इतर वस्तूपेक्षा वेगळी आहे हे दाखविण्याचा प्रयत्न पुढीलप्रकारे केला जातो.

अ. वास्तविक मूल्यभेद :

वास्तविक मूल्यभेद हा त्यावेळेस होतो जेंव्हा वस्तूच्या उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या कच्चा मालाचे प्रमाण कमी अधिक करुन किंवा त्याचा दर्जा बदलून, उत्पादनाचे तंत्र बदलून उत्पादनाचे वजन बदलून आकाराने बदल करुन किंवा चवीमध्ये बदल करुन वस्तुभेद केला जातो. म्हणून अशा वस्तुभेदास वास्तविक वस्तुभेद असे म्हणतात.

ब. काल्पनिक वस्तूभेद :

मक्तेदारीयुक्त स्पर्धेत मक्तेदार हा वास्तविक वस्तुभेदापेक्षा काल्पनिक वस्तुभेद निर्माण करण्यावर अधिक भर देत असतो. या प्रकारात वस्तुचे गुणधर्म कायम ठेवून केवळ व्यापारी चिन्ह, नाव किंवा इतर विक्रीच्या युक्त्या प्रयुक्त्या इत्यादीमध्ये बदल करुन काल्पनिक वस्तुभेद केला जातो. वस्तूच्या विक्रीचे विशिष्ट मोक्याच्या ठिकाणी स्टॉल लावले जातात. या स्टॉलद्वारे आपली वस्तु प्रतिस्पर्ध्यापेक्षा कशी श्रेष्ठ आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे ग्राहक वेगवेगळ्या वस्तूमध्ये तुलना करतात. आणि त्यानुसार वस्तुची मागणी करतात. काल्पनिक वस्तुभेदाद्वारे उपभोक्त्यांच्या मनात एखाद्या वस्तुबद्दल आकर्षण निर्माण केले जाते व ग्राहकाच्या इच्छेचे मागणीत रुपांतर करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

४. जाहिरात :

मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तुभेद असल्याने आपल्या वस्तूची अधिक विक्री करावयाची असल्याने प्रत्येक उत्पादक व विक्रेत्याला आपल्या वस्तुची प्रचंड प्रमाणात जाहिरात करावी लागते. जाहिराती या दोन प्रकारच्या केल्या जातात.

अ. सूचनात्मक जाहिरात :

सूचनात्मक जाहिरात ही प्रामुख्याने आपल्या वस्तुची ओळख देण्याच्या उद्देशाने केले जाते. किंवा एखाद्या उत्पादकाने संपूर्णतः नवीन वस्तू बाजारपेठेत विक्रीसाठी आणली असेल तर तो वस्तूची सूचनात्मक जाहिरात करुन वस्तु विक्री करण्याचा प्रयत्न करतो. अशा जाहिरातींना सूचनात्मक जाहिराती असे म्हणतात.

ब. स्पर्धात्मक जाहिरात :

मक्तेदारीयुक्त स्पर्धेत सूचनात्मक जाहिरातीपेक्षा स्पर्धात्मक जाहिरात ही महत्वाची मानली जाते. या जाहिरातीचा उद्देश आपली वस्तू प्रतिस्पर्ध्यापेक्षा कशी सरस हे ग्राहकांना सांगण्याचा असतो. बाजारपेठेतील अनेक वस्तुपैकी आपली वस्तु ग्राहकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न स्पर्धात्मक जाहिरातीतून केला जातो. त्यामुळे प्रत्येक उत्पादक व विक्रेता स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अशा प्रकारची स्पर्धात्मक जाहिरात करत असतो.

म्हणून स्पर्धात्मक जाहिरात ही मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील उत्पादक व विक्रेत्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न असतो. उदा. भारतीय बाजारपेठेत टुथपेस्टची जाहिरात.

५. विक्री खर्च :

वस्तूची विक्री वाढवण्यासाठी जो खर्च केला जातो त्यालाच विक्री खर्च म्हणतात. वस्तूची विक्री वाढविण्यासाठी वस्तूची जाहिरात, ही वर्तमानपत्रे, मासिके, रेडिओ, टेलिव्हिजन इत्यादीद्वारे केली जाते. म्हणूनच जाहिरात खर्च म्हणजेच विक्री खर्च असे समजले जाते. पूर्ण स्पर्धेत वस्तू एकजिनसी असल्याने वस्तूची जाहिरात करण्याची गरज नसते, परंतु मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तूची जाहिरात करावीच लागते. विक्री खर्चात विक्रेत्यांना द्याव्या लागणाऱ्या कमिशन, घरपोच सेवा, बक्षीस, जाहिरात, निःशुल्क दुरुस्ती इत्यादी खर्चाचा विक्री खर्चात समावेश होतो. आपली वस्तू इतर वस्तूपेक्षा श्रेष्ठ आहे हे दाखविण्यासाठी विक्री खर्च आवश्यक असतो.

**६. समूहाची कल्पना :**

प्रा. चेंबरलीन यांनी उद्योग या शब्दाच्या ऐवजी समूहगट हा शब्द वापरला आहे. एकसारख्या वस्तूंचे उत्पादन करण्याचा उद्योगसंस्थांच्या समूहासाठी मार्शल यांनी **उद्योग** हा शब्द वापरला आहे परंतु मक्तेदारीयुक्त स्पर्धेत प्रत्येक उत्पादन संस्थांनी उत्पादित केलेल्या वस्तू या वेगवेगळया प्रकारच्या असतात. परिणामी त्यांच्या किंमतीदेखील भिन्न असतात. तेव्हा अशा प्रकारचे उत्पादन करणाऱ्या उत्पादन संस्थांच्या समूहासाठी समूह किंवा गट हा शब्द चेंबरलीन यांनी उपयोगात आणलेला आहे.

वर नमूद केलेल्या सर्व वैशिष्ट्यावरून हे स्पष्ट होते की, एकाच प्रकारच्या वस्तूचे उत्पादन करणारे उत्पादक जास्त असूनही त्यांच्यात स्पर्धा असते परंतु पूर्ण स्पर्धा नसते. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत प्रत्येकाच्या वस्तू ठरलेल्या असतात. असे असले तरी येथे पूर्ण मक्तेदारी आणि पूर्ण स्पर्धा यांचे योग्य असे मिश्रण म्हणजे मक्तेदारीयुक्त स्पर्धा होय.

**मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील वैयक्तीक व समूह संतुलन :**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये सर्वसाधारणपणे उद्योग व उद्योगसंस्था असा फरक हा केवळ तात्विकदृष्ट्या असतो. कारण ज्यावेळी एकाच प्रकारच्या वस्तुचे उत्पादन करणाऱ्या अनेक उत्पादन संस्थांचा मिळून उद्योग तयार होतो. अशा उद्योगातील वेगवेगळ्या उत्पादन संस्था ही परस्परांना स्पर्धक असतात. त्यावेळी उद्योग आणि उद्योग संस्था असा भेद करता येणे शक्य नसते. कारण मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तुभेद असतो. म्हणजे प्रत्येक उद्योगसंस्था आणि उत्पादन संस्था भिन्न किंवा वेगळया प्रकारच्या वस्तुचे उत्पादन करत असते. म्हणूनच मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वैयक्तीक संतुलन आणि समुह संतुलन असे अनुभवास येते. बाजारपेठेमध्ये विशिष्ट प्रकारच्या उद्योगाऐवजी उद्योगांचा समुह आढळतो.

वरील आकृतीमध्ये मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील उद्योग संस्थेचे दीर्घकालीन संतुलन दर्शवले आहे. या आकृतीत 'स' हा संतुलनबिंदू असून 'अब' इतके उत्पादन आहे. 'अर' ही संतुलीत किंमत आहे. त्यामुळे सीमांत उत्पन्न व सीमांत खर्च यांच्या सहाय्याने स हा संतुलन बिंदू तयार होतो.

## समुह संतुलन Group Equilibrium :

पूर्ण स्पर्धेत वस्तु एकजिन्सी असल्यामुळे वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या संस्था अनेक असतात. परंतु मक्तेदारी युक्त स्पर्धेत **एकाच प्रकारच्या एकसारख्या दिसणाऱ्या वस्तुमध्ये वेगवेगळ्या प्रकारे फरक करुन उत्पादन करणाऱ्या उत्पादन संस्था अनेक असतात. अशा संस्थाच्या समुदायास समुह किंवा गट असे म्हणतात.** मक्तेदारीयुक्त स्पर्धेत अनेक संस्था परस्परांना पर्यायी असणाऱ्या वस्तुचे उत्पादन करतात. या सर्व संस्था परस्परांना स्पर्धक असतात. प्रत्येकांचे प्राप्ती आणि खर्चवक्र वेगवेगळे असतात. अशा स्थितीत समुह संतुलन कसे होते. याचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

## समुह संतुलनाची ग्रहीते :

मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील समुह संतुलनाची आकृती पाहण्यापूर्वी पुढील ग्रहीत परिस्थिती पाहणे आवश्यक आहे.

१. उत्पादन संस्थांची संख्या अधिक असते.

२. उत्पादन संस्था जवळचा पर्याय असणाऱ्या वस्तुचे उत्पादन करतात.


३. प्रत्येक उत्पादन संस्थेचे स्वतंत्र किंमत धोरण असते.

४. एका उद्योग संस्थेच्या किंमत धोरणाचा समुहावर होणारा परिणाम कमी असतो.

५. समुहातील सर्व उत्पादन संस्थांचे प्राप्तीवक्र आणि खर्चवक्र सारखेच असतात.

६. सर्व समुहाचे संतुलन त्यावेळेसच होते जेव्हा दीर्घकाळात दीर्घकालीन सिमांत खर्च व दीर्घकालीन सिमांत प्राप्ती आणि दीर्घकालीन सीमांत खर्चाचा वक्र सीमांत प्राप्तीच्या वक्रास डाव्या बाजूने छेदेल. या दोन अटी पूर्ण झाल्या तरच समुह संतुलन होते.

अशा प्रकारे वरील ग्रहीत परिस्थितीवर समुह संतुलन अवलंबून आहे. ते पुढील आकृतीत दर्शवले आहे.




आ.क्र.४.१३

USE With Care

आकृतीत दर्शविल्याप्रमाणे मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील सामूहिक संतुलनाची अवस्था दर्शविता येऊ शकते. दी.सी.ख. आणि दी.स.ख. हे अनुक्रमे दीर्घकालीन सीमांत खर्च व दीर्घकालीन सरासरी खर्चाचे वक्र आहेत. त्याचप्रमाणे दी.स.उ. आणि दी.सी.उ. हे अनुक्रमे दीर्घकालीन सरासरी उत्पन्न व दीर्घकालीन सीमांत उत्पन्नाचे वक्र आहेत. **सरासरी उत्पन्न = सरासरी खर्च** या अवस्थेत सर्व उद्योग संस्थांना साधारण नफा मिळतो. साधारण नफा असतांना समूहातील उद्योग संस्थांच्या संख्येत बदल होणार नाही. परंतु जर सरासरी उत्पन्न हे सरासरी खर्चापेक्षा जास्त झाले तर अतिरिक्त नफ्याची प्राप्ती होईल व समूहातील उद्योग संस्थांची संख्या वाढेल. याउलट सरासरी उत्पन्नापेक्षा सरासरी खर्च जास्त झाला तर समूहातील संख्येत घट होईल. कारण या अवस्थेत उद्योग संस्थेला तोटा सहन करावा लागतो. अशाप्रकारे साधारण नफा ज्यावेळी असतो, त्याचवेळी समूहाचे संतुलन मक्तेदारीयुक्त स्पर्धेत होऊ शकते.

**४.५ मक्तेदारीयुक्त स्पर्धेत विक्री खर्च Selling Cost in monopolistic competition**

मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये एकाच प्रकारच्या, एक सारख्या परंतु सुक्ष्म फरक असणाऱ्या वेगवेगळ्या वस्तुचे उत्पादन वेगवेगळे उद्योग करत असतात. त्यांच्यात आपआपसात स्पर्धा असते. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व वस्तुच्या विक्रीत वाढ व्हावी म्हणून वस्तुची किंमत कमी करणे किंवा वस्तुच्या दर्जामध्ये वाढ करणे इ. मार्गांचा अवलंब केला जातो. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रत्येक संस्था विक्रीखर्च हा वस्तुची विक्री वाढविण्यासाठी करत असते.

**विक्री खर्चाचा अर्थ :**

विक्रीखर्च म्हणजे असा खर्च की, जो खर्च वस्तुची विक्री वाढविण्यासाठी केला जातो. **प्रो. चेंबरलीनच्या मते, 'विक्रीखर्च म्हणजे असा खर्च जे वस्तुचे मागणीवक्राचे स्थितीत किंवा आकारात बदल करण्यासाठी केले जातात.'**

वरील व्याख्येवरुन प्रो. चेंबरलीन यांनी विक्री खर्चामध्ये वस्तुला विक्री अधिक करुन देण्यासाठी केलेल्या खर्चाचा समावेश केला आहे. यात जाहिरातीचा खर्च किंवा इतर एजंटचे कमीशन, प्रदर्शनाचा खर्च, नमुने वाढविण्याचा खर्च इत्यादींचा समावेश होतो. हा सर्व खर्च केवळ वस्तुच्याबाबत ग्राहकामध्ये आकर्षण निर्माण करणे आणि वस्तुची विक्री वाढवणे यासाठी केला जातो. आधुनिक काळात वस्तुच्या वेगवेगळ्या प्रकारे म्हणजे सुचनात्मक आणि प्रवचक जाहिराती करुन हा खर्च दिला जातो.

**विक्री खर्च व उत्पादन खर्च यातील फरक :**

विक्री खर्च आणि उत्पादन खर्च यात फरक आहे.

१. वस्तूचे उत्पादन करण्यासाठी येणाऱ्या खर्चास उत्पादन खर्च असे म्हणतात तर

# घटकांच्या किंमती

## Factor Pricing

वस्तुच्या किंमत-निश्चितीबरोबरच उत्पादन घटकांच्या किंमतीचा विचार अर्थशास्त्रात महत्वाचा मानला जातो. या उत्पादन घटकाच्या किंमत-निश्चितीच्या तत्त्वास वितरण असे म्हणतात. एखाद्या वस्तूचे उत्पादन करण्यासाठी भूमी, श्रम, भांडवल व संयोजन असे चार उत्पादन घटक आवश्यक असतात. या चार उत्पादन घटकांनी उत्पादनक्रियेत भाग घेतल्यामुळे त्यांना त्यांचा मोबदला द्यावा लागतो. हा मोबदला घटक-मालकांना मिळतो. या मोबदला ठरवण्याच्या क्रियेलाच वितरण किंवा घटकमूल्य-निश्चीती किंवा वाटणी म्हणतात.

थोडक्यात, **'वितरण म्हणजे एकूण उत्पन्नाचे वाटप उत्पादन घटकांमध्ये त्यांच्या कार्यानुसार करणे होय.'**

उत्पन्नाचे वाटप म्हणजेच वितरण दोन प्रकारे केले जाते.

अ) वैयक्तिक वितरण

ब) कार्यानुसार वितरण.

वरील दोन्ही संकल्पनांचा अर्थ पुढीलप्रमाणे :

### अ) वैयक्तिक वितरण Personal Distribution :

यालाच व्यक्तिनुसार वाटप असे म्हणतात. यामध्ये राष्ट्रातील निरनिराळ्या व्यक्तीच्या वाट्यास किती उत्पन्न आले? हे पाहिले जाते. उदा. शेतकरी शेती व मजुरी ही दोन्ही कार्य करत असेल तर दोन्हीपासुन मिळणारे उत्पन्न लक्षात घेतले जाते.

### ब) कार्यानुसार वितरण Functional Distribution :

जर उत्पन्नाचे वाटप प्रत्येक उत्पादन घटकाने उत्पादनक्रियेत किती भाग घेतला? यावरुन होत असेल तर त्यास कार्यानुसार वितरण म्हणतात.

कार्यानुसार वितरणामध्ये भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजन या उत्पादन घटकांचा मोबदला कसा ठरतो? याचा विचार होतो.

यावरुन मनुष्य ज्या नैसर्गिक शक्तीचा व साधनांचा वापर करु शकतो ह्या सर्वांचा भूमीमध्ये समावेश होतो. उदा. सूर्यप्रकाश, वारा, पाऊस, खनिजद्रव्ये इत्यादी.

भूमीची वैशिष्ट्ये :

१. भूमी निसर्ग निर्मित आहे.

२. भूमीला पुरवठा मूल्य नसते.

३. भूमी अविनाशी आहे.

४. भूमी स्थलांतर करता येत नाही.

५. भूमीत गुणभिन्नता आहे.

६. भूमीचा पुरवठा अलवचिक आहे.

अर्थशास्त्रात भूमीच्या वापराबद्दल जो भूमीस किंवा तिच्या मालकास मोबदला मिळतो त्यास खंड म्हणतात.

**व्याख्या :** निसर्गवादी शास्त्रज्ञांच्या मते, **'निसर्गाच्या उदारतेमुळे शेती उत्पादनात जे अधिक्य निर्माण होते त्यास खंड असे म्हणतात.'** वरील व्याख्येवरुन खंडाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

खंडाची वैशिष्ट्ये :

**१) भूमीचा मोबदला :** खंड हा भूमीच्या वापराबद्दल भूमी मालकाला दिला जाणारा मोबदला होय.

**२) खंड हा उत्पन्नाचा एक भाग :** खंड हा जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचाच एक भाग किंवा हिस्सा असतो.

**३) उपजत व अविनाशी गुणांचा मोबदला :** जमिनीत उपजत व अविनाशी गुण असतात आणि त्या गुणांचा वापर केल्याबद्दल खंड दिला जातो.

## अ) रिकार्डोचा खंड सिद्धांत Recardian Theory of Rent :

इंग्लंडमधील प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डेव्हिड रिकोर्डो यांनी Principles of Political Economy या पुस्तकात खंडविषयक सिद्धांत मांडला.

सिद्धांताची पार्श्वभूमी :

रिकार्डो यांनी आपला खंडविषयक सिद्धांत मांडतांना त्यावेळची म्हणजे १८७७ च्या दरम्यानची परिस्थिती लक्षात घेतली आहे. त्या काळात इंग्लंडमध्ये अन्नधान्याच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढत होत्या. तसेच समाजात वेगवेगळ्या प्रकारची दुरी निर्माण झाली होती. विविध तज्ञांनी अशी परिस्थिती का निर्माण झाली? याची वेगवेगळी कारणे दिलेली होती. अ) कांही राजनितीक तज्ञांच्या मते, वर्तमान सरकार प्रशासन चालवण्यास अयोग्य असल्यामुळे वस्तुच्या किंमती वाढत आहेत. त्यामुळे हे सरकार बदलले पाहिजे.

ब) धर्ममार्तंडाच्या मते समाजात धार्मिक निती खालावली आहे. म्हणून अन्नधान्याच्या किंमती वाढत आहेत. क) तर कांही तज्ञांच्या मते जमीनदार अधिक खंड घेत असल्यामुळे अन्नधान्याच्या किंमती वाढत आहेत. परंतु डेव्हीड रिकार्डो यांना वरील कोणतेही मत मान्य नाही. ते स्वतः शेतकरी, व्यापारी व अर्थशास्त्रज्ञ असल्यामुळे खंड का वाढत आहे. याची अर्थशास्त्रीय कारण मिमांसा त्यांनी खंडसिद्धांतात केली आहे. रिकार्डो यांच्या मताने भुमीच्या सुपीकतेमुळे व दुर्मीळतेमुळे खंडाचा उद्भव होत असून त्यामुळे अन्नधान्याच्या किंमती वाढत नाहीत. अन्नधान्याच्या किंमती जास्त असण्याचे कारण अधिक खंड दिला जातो. हे नसुन अन्नधान्याच्या किंमती अधिक असल्यामुळे खंड अधिक मिळतो. म्हणून शेवटी रिकार्डो असे म्हणतात की, खंड हा फक्त भूमीच्या मालकासच मिळतो. व तो भूमीत उत्पादन केल्या जाणाऱ्या धान्याच्या किंमतीवरुन ठरतो. यावरुन रिकार्डो यांच्या मते खंडाचा समावेश वस्तुच्या किंमतीमध्ये होत नाही.

खंड का दिला जातो? तो कसा निर्माण होतो? याबाबत सविस्तर स्पष्टीकरण त्यांनी पुढीलप्रमाणे दिले आहे.

रिकार्डोने खंडाची व्याख्या पुढील प्रमाणे केली. **'जमिनीतील एकूण उत्पन्नापैकी जो भाग जमिनीच्या उपजत व अविनाशी गुणांचा वापर केल्याबद्दल जमिनीच्या मालकाला मिळतो,** त्याला खंड म्हणतात.' रिकार्डो यांनी जमिनीच्या उपजत गुणांबद्दल खंड मिळतो, असे सांगून यावरच आधारित खंड सिद्धांताचे स्पष्टीकरण केले आहे.

**स्पष्टीकरण :**

रिकार्डोच्या मते खंड उद्भवण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जमिनीमध्ये असणारी गुणभिन्नता होय. निसर्गाने जी जमीन मानवाला देणगी म्हणून दिली आहे ती जमीन सर्व ठिकाणी सारखी नसते. भारी जमीन, मध्यम व हलकी अशी प्रतवारी असते. या जमिनीच्या प्रतवारीमुळेच खंड उद्भवतो.

**खंडाची निर्मिती :**

खंडाची निर्मिती कशी होते याचे विवेचन रिकार्डो यांनी असे केले आहे की, जर मानवास शेतमाल कमी पडत असेल, तर आपली गरज पूर्ण करण्यासाठी लोक प्रथम सुपीक चांगली जमीन लागवडीखाली आणतील तेंव्हा यावेळी या जमिनीबाबत खंड उद्भवत नाही.

कालांतराने लोकसंख्या वाढली, तर उत्पादनवाढीसाठी पूर्वीपेक्षा कमी सुपीक म्हणजे मध्यम जमीन लागवडीखाली आणली जाईल. या स्थितीत सुपीक जमिनीपेक्षा मध्यम जमिनीत उत्पादन कमी मिळते, पण उत्पादनखर्च तेवढाच येतो.

यानंतरही उत्पादन कमी पडू लागते व लोकसंख्या वाढली तर कनिष्ठप्रतीची जमीन

लागवडीखाली आणली जाईल. या जमिनीतील उत्पादन व त्यासाठी केलेला उत्पादनखर्च सारखाच असतो. म्हणून तृतीय श्रेणीच्या जमिनीतून खंड उद्‌भवत नाही.

थोडक्यात, उच्च प्रतीच्या जमिनीस अधिक खंड मिळतो, मध्यम जमिनीस कमी खंड मिळतो तर हलक्या जमिनीत खंड निर्माण होत नाही. हलक्या जमिनीस रिकार्डोने सीमांत जमीन म्हटले आहे.


**उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण :**

**तक्ता ५.२** (अंक रुपयात)

| जमिनीची प्रत | उत्पादन | किंमत प्रतिकिलो | एकूण उत्पन्न | खर्च | खंड |
|---|---|---|---|---|---|
| उच्च प्रतीची जमीन | ३०० किलो | १० रु. किलो | ३००० | १००० | २००० |
| माध्यम प्रतीची जमीन | २०० किलो | १० रु. किलो | २००० | १००० | १००० |
| कनिष्ठ प्रतीची जमीन | १०० किलो | १० रु. किलो | १००० | १००० | — |

समजा 'अ' जमीन अधिक सुपीक आहे. 'ब' कमी सुपीक म्हणजे मध्यम जमीन आहे तर 'क' ही सर्वात कमी सुपीक (कनिष्ठ) जमीन आहे. या तिन्ही जमिनीवर एक हजार रु. असा सारखा खर्च केला तर उत्पादन पुढीलप्रमाणे मिळेल.

वरील तक्त्यात तिन्ही प्रकारच्या जमिनीवर सारखा खर्च केला तर उच्च जमिनीतून ३०० किलो गव्हाचे उत्पादन मिळेल. मध्यम प्रतीच्या जमिनीतून २०० किलो उत्पादन मिळले, तर कनिष्ठ जमिनीतून १०० किलो उत्पादन मिळले. या तिन्हीचा उत्पादन खर्च सारखाच असल्यामुळे रु. एकूण उत्पन्नातून खर्च केल्यास उच्च प्रतीच्या जमिनीस २००० रु. खंड मिळेल तर मध्यम जमीनीस १००० रु. खंड मिळालेल व कनिष्ठ जमिनीचा उत्पादनखर्च व उत्पन्न सारखे असल्यामुळे तिला खंड मिळणार नाही. म्हणून तिला रिकार्डो यांनी सीमांत जमीन असे म्हटले आहे.




आ.क्र.५.२

बाजूच्या आकृतीत तीन प्रतीची जमीन 'अक्ष' अक्षावर दाखवली आहे तर उत्पादन 'अय' या अक्षावर दिले आहे. उच्च आणि मध्यम प्रतीच्या जमिन खंड मिळतो, परंतु कनिष्ठ प्रतीच्या जमिनीस खंड मिळत नाही, कारण या जमिनीचा खर्च हा उत्पन्नाएवढा असतो. कनिष्ठ जमिनीस सीमांत जमीन असेही म्हणतात. वरील आकृतीत खंड हा भरीव चौकोनात दाखवला आहे तर सिमांत जमीन जाड चौकोनात दर्शवले आहे. या जमीनीस खर्च आणि उत्पन्न सारखे असल्यामुळे खंड मिळत नाही.

यावरुन रिकार्डोच्या मते खंड उद्भवण्याचे मुख्य कारण म्हणजे जमिनीमध्ये असणारी गुणभिन्नता होय.

सिद्धांताची गृहिते :

रिकार्डोचा सिद्धांत पुढील परिस्थितीवर अवलंबून आहे.

**१) दीर्घकाळात खंड-निर्मिती :** हा खंड अल्पकाळात उद्भवत नाही. रिकार्डोचा सिद्धांत दीर्घकाळाशी संबंधित आहे.

**२) खंड भूमीलाच मिळतो :** रिकार्डोच्या मताप्रमाणे खंड केवळ भूमीलाच मिळतो. इतर उत्पादन घटकांना मिळत नाही.

**३) मर्यादित भूमी :** भूमीचा साठा मर्यादित असतो असे रिकार्डो यांचे मत आहे.

**४) गुणभिन्नता :** भूमीमध्ये गुणभिन्नता असते. असे रिकार्डो यांचे मत आहे.

**५) क्रमानुसार लागवड :** भूमीची लागवड क्रमानुसार केली जाते. सर्वप्रथम सुपीक जमीन लागवडीखाली आणली जाते, त्यानंतर मध्यम व शेवटी कनिष्ठ प्रतीची जमीन लागवडीखाली आणली जाते.

**६) लोकसंख्या वाढ :** रिकार्डो यांनी माल्थसच्या सिद्धांताप्रमाणे लोकसंख्या वाढ होत असते. असे गृहीत धरले आहे.

**७) घटत्या फलाचा नियम लागू :** शेतीक्षेत्रात घटत्या उत्पादनफलाचा नियम लागू होते.

या प्रमुख गृहीतावर रिकार्डोचा सिद्धांत आधारलेला आहे.

टीका :

रिकार्डो यांच्या खंड सिद्धांतावर कांही तज्ज्ञांनी टीका केल्या आहेत त्यापैकी प्रमुख टीका पुढीलप्रमाणे आहेत.

**१) पूर्ण स्पर्धेचा अभाव :** रिकार्डोच्या खंड सिद्धांतामध्ये पूर्ण स्पर्धेचे अस्तित्व ही एक महत्त्वाची बाब आहे. प्रत्यक्षात मात्र पूर्ण स्पर्धा आढळून येत नाही. पूर्ण स्पर्धा हा बाजारपेठेचा केवळ काल्पनिक प्रकार आहे. म्हणून हा सिद्धांत सुद्धा काल्पनिकच आहे असे टिकाकारांचे मत आहे.

**२) लागवडीचा क्रम चुकीचा :** रिकार्डो यांनी जमीन लागवडीखाली आणण्याचा सांगितलेला क्रम चुकीचा आहे. केवळ प्रतवारीनुसार जमीन लागवडीखाली आणली जात नाही, तर त्यावर गावापासून अंतर, बाजारपेठेत इत्यादी घटकांचा परिणाम होत असतो. **प्रो. कॅरी** यांच्या मते शेतजमीनीचा इतिहास पाहिला तर शेतीची लागवड सुपीक जमीनीकडून निकृष्ट जमीनीकडेच होते असे नाही. तर सर्वप्रथम कोणती जमीन लागवडीखाली आणली जावी हे वेगवेगळ्या घटकावर अवलंबून आहे.

**३) व्याख्येवर टीका :** रिकार्डोच्या मतानुसार जमिनीच्या उपजत व अविनाशी गुणांबद्दल मिळणाऱ्या मोबदल्यास खंड म्हटले आहे, परंतु आधुनिक शास्त्रज्ञांच्या मते उत्पादनतंत्रात बदल केल्यास जमिनीच्या सुपीकतेत बदल होतो. तसेच टिकाकारांच्या मते रिकार्डो यांची खंडाची व्याख्या करतांना ते असे स्पष्ट करतात की, खंड हा भूमीच्या अविनाशी व उपजत गुणांच्या वापराबद्दल मिळतो परंतु खंड कसा निर्माण होतो याचे स्पष्टीकरण करतांना त्यांनी सिमांत जमीनीची संकल्पना मांडली आहे. रिकार्डो यांच्या मते लोकसंख्या वाढीबरोबर हलक्या दर्जाच्या जमीनी धान्योत्पादनाखाली आणल्या जातात. व जमीन सर्वात निकृष्ट आहे ती सर्वात शेवटी लागवडीखाली आणली जाते. या जमीनीवरचे उत्पन्न आणि खर्च हे समान असते. असे स्पष्ट केले आहे. परंतु जर रिकार्डो यांची व्याख्या बरोबर असेल तर त्यांचे विश्लेषण चूक आहे किंवा विश्लेषण बरोबर असेल तर व्याख्या चूक असावी लागेल. त्यांच्या व्याख्येवरुन जमीनीवर खंड मिळायला हवा. परंतु हलकी जमीन असल्याने तिच्यावर किमान कमी प्रमाणात का होईना खंड मिळायला हवा? असे रिकार्डो यांचेच मत आहे. तर त्यांच्या विश्लेषणावरुन निकृष्ट जमीनीला खंड मिळत नाहीत.

**४) इतर घटकांकडे दुर्लक्ष :** आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मतानुसार खंड केवळ गुणाबद्दल मिळत नसून दुर्मिळता हा घटक महत्त्वाचा आहे. तसेच **प्रा. मार्शल, वॉकर सौ. जॉन, रॉबिन्सन** इत्यादींच्या मते भूमीचा वापर वेगवेगळ्या कारणासाठी केला जातो. तसेच खंडाची निर्मिती ही इतर घटकामुळेही होत असते. गुनभिन्नता हा एकच भूमीचा घटक नसून भूमीवर काम करणारे श्रमिक, त्यांची कार्यक्षमता इत्यादीमुळेही भूमीला अधिक खंड मिळतो.

**५) खंडाचा किंमतीवर परिणाम :** आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते खंड हा उत्पादन खर्चाचा एक भाग असून खंडाचा किंमतीवर परिणाम होत असतो. हा परिणाम रिकार्डोने लक्षात घेतला नाही. टिकाकारांच्या मते रिकार्डोच्या सिद्धांतातील सर्वात महत्वाची उणीव म्हणजे खंडाचा समावेश वस्तुच्या किंमतीत केला नाही. परंतु आजच्या काळात वस्तुची किंमत वस्तुच्या उत्पादन खर्चावरुन ठरत असते व **उत्पादन खर्च = खंड + मजुरी +**

**व्याज + नफा** या सर्वांचे एकत्रिकरण असते. म्हणजे वस्तुच्या उत्पादन खर्चात पर्यायाने वस्तुच्या किंमतीत खंडाचा समावेश होतो. परंतु रिकार्डो असे म्हणतात की, अन्नधान्याच्या किंमती वाढल्यामुळे खंडाचे प्रमाण वाढते असे म्हणणे चूक आहे. कारण अगोदर खंड ठरवून नंतर किंमत ठरते. ही वास्तवता रिकार्डो यांनी मान्य केली नाही.

**६) भूमीचा इतर कारणांसाठी वापर :** भूमीचा वापर केवळ शेतीसाठीच होत नसून, कारखानदारी, व्यवसाय, घर यासाठी होतो याकडे रिकार्डोचे दुर्लक्ष झाले आहे. रिकार्डो यांनी जमीनीचा उपयोग केवळ धान्योत्पादनासाठीच केला जातो. असे गृहीत लक्षात घेतले आहे. परंतु प्रत्यक्षात प्लॉट विक्री, घर बांधणे, कारखाना चालवणे अशा शेतीशिवाय कारणासाठीही भूमीचा उपयोग केला जातो. ही वास्तवता रिकार्डो यांनी लक्षात घेतली नाही.

**७) घटत्या उत्पादनफलावर आक्षेप :** शेतीमध्ये आधुनिक तंत्राचा वापर केला तर वाढत्या उत्पादनफलाचा प्रत्यय येतो. असे असतांनाही रिकार्डो यांचा खंड सिद्धांत शेतीच्या घटत्या फलावर आधारीत आहे. सध्याच्या आधुनिक कृषी उत्पादन पद्धतीमध्ये बदल केला तर शेतीमध्ये वाढते फल मिळवणे शक्य असते. या स्थितीत खंड कसा निर्माण होतो हे रिकार्डो यांनी स्पष्ट केले नाही..

**८) सुपीकता हा मूलभूत गुणधर्म नाही :** रिकार्डो यांनी आपल्या सिद्धांतात जमीनीमध्ये अविनाशी व उपजत गुण गृहीत धरले आहे. जमीन सुपीक असते. आणि सुपीकता निसर्गतःच असते असे रिकार्डो यांचे मत आहे. टिकाकारांच्या मते जमीनीची सुपीकता निसर्गतःच असली तर हा मुलभूत गुणधर्म नाही कारण सुपीकता ही निर्माण करता येते. तसेच रिकार्डो यांच्या मते सुपीकता नष्ट होत नाही. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी शेतीमध्ये कष्ट केले नाही तर जमीनीची सुपीकता कमी होते. याचा विचार रिकार्डो यांनी केला नाही.

**९) खंड हे अर्जित उत्पन्न आहे :** रिकार्डो यांनी खंड हे अनर्जीत उत्पन्न आहे, असे स्पष्ट केले आहे. परंतु खंडाच्या स्वरुपात निर्माण होणारा वाढावा हा मालकाने जमीनीत केलेल्या कायम स्वरुपाच्या सुधारणा किंवा पाणी पुरवठा, कुळकऱ्यांचे कष्ट या सर्वांचा परिपाक असतो. म्हणून खंडाला पूर्णपणे अनर्जित उत्पन्न मानने चुकीचे आहे. असे टिकाकारांचे मत आहे.

**१०) माल्थसचा सिद्धांत प्रत्ययास येत नाही :** रिकार्डो यांचा खंड सिद्धांत माल्थस यांच्या लोकसंख्या सिद्धांतावर अवलंबून आहे. माल्थस यांच्या मताने दर पंचेवीस वर्षाला लोकसंख्या दुप्पट होते. परंतु प्रत्यक्षात प्रत्येक देशामध्ये दर पंचवीस वर्षाला लोकसंख्या दुप्पट होईलच असे नाही. काळाच्या ओघात लोकसंख्या वाढल्यानंतर अन्नधान्य

उत्पादन घेण्याऐवजी फळे, अंडी, मांस इत्यादींचा वापर करुन लोक उपजिविका करत असतात. याकडे रिकार्डो यांनी दुर्लक्ष केले आहे. यावरुन माल्थस यांचा सिद्धांत नेहमीच प्रत्ययास येईल असे नाही.

अशा प्रकारे रिकार्डोच्या सिद्धांतावर कांही प्रमाणात टीका झाल्या असल्या तरी त्याचे महत्व कमी होत नाही. भूमीचा मोबदला बऱ्याच प्रमाणात तिच्या प्रतवारीवर अवलंबून असतो.

**खंडाचा आधुनिक सिद्धांत Modern theory of Rent :**


आधुनिक खंडविषयक सिद्धांताची मांडणी **प्रा. मार्शल, प्रा. एफ.ए. वॉकर व सौ. जॉन रॉबिन्सन** यांनी केली. रिकार्डोच्या मताप्रमाणे खंड केवळ भूमीलाच मिळतो; परंतु आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते खंड हा भूमीप्रमाणेच श्रम, भांडवल व संयोजन या घटकांनाही मिळत असतो.

प्रा. वॉकर यांच्या मते तर संयोजकामध्ये विविधता असते. प्रत्येकाचे कौशल्य वेगवेगळे असते, म्हणून त्यासही खंड मिळतो.

**दुर्मिळतेमुळे खंड Scarcity Rent :**

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मतानुसार उत्पादन घटकांना खंड त्यांच्या दुर्मिळतेमुळे मिळतो. उत्पादन घटकांची मागणी अधिक असेल व पुरवठा कमी असेल, तर त्या घटकांच्या दुर्मिळतेमुळे म्हणजे कमी पुरवठ्यामुळे खंड मिळतो. डॉ. मार्शलच्या शब्दात **'खंड केवळ भूमीलाच मिळतो असे मानणे योग्य नाही, कारण अल्पकाळात भूमीव्यतिरिक्त इतर उत्पादन घटकांमध्ये मर्यादितता हा गुण आढळतो. अशा परिस्थितीत ज्या वेळी एका ठराविक काळात एखाद्या उत्पादक घटकाचा पुरवठा मर्यादित असेल आणि तो पुरवठा मानवी प्रयत्नांच्या आधारे वाढवता येत नसेल, तर त्या साधनापासून मिळणाऱ्या उत्पन्नास नफ्याऐवजी खंड मानणे अधिक उपयुक्त ठरते.'**

दुर्मीळता खंडाची निर्मिती कशी होते हे स्पष्ट होत असतांना भूमीची मागणी व पुरवठ्याची स्थिती विचारात घेतली आहे. मागणी व पुरवठ्याच्या साह्याने भूमीस मिळणाऱ्या खंडाची निर्मिती त्यांनी स्पष्ट केली आहे. भूमीची मागणी अप्रत्यक्ष स्वरुपाची असल्यामुळे ती भूमीपासून उत्पादीत होणाऱ्या धान्याच्या मागणीवर अवलंबून असते. त्यामुळे भूमीचा मागणीवक्र डावीकडून उजवीकडे वरुन खाली येणारा असतो. भूमीचा पुरवठा हा संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी मर्यादीत आहे म्हणून तो संपूर्ण अलवचिक आहे हे पुढील आकृतीत दर्शविले आहे.




आ.क्र. ५.३

भूमीचा मागणी व पुरवठा

वरील आकृतीत 'पप' हा जमीनीचा पुरवठा वक्र आहे. संपूर्ण भूमीचा विचार करता भूमीचा पुरवठा वक्र पूर्ण अलवचिक आहे. भूमीसाठी असणारी मागणी व पुरवठा यांच्या समन्वयातून खंड ठरतो सुरुवातीस 'मम' ही भूमीची मागणी 'पप' या पुरवठ्याबरोबर असते. म्हणून मागणी बरोबर पुरवठा ही स्थिती येते. परिणामी खंड निर्माण होत नाही. जेव्हा भूमीची मागणी वाढते तेव्हा नवीन मागणी वक्र '$म_१ म_१$' येतो व अक हा खंड निश्चित होतो. यापुढे पुन्हा भूमीची मागणी वाढली तर $अक_१$ पर्यंत खंडात वाढ होते.

**सौ. जॉन रॉबिन्सन (बदली उत्पन्न) Transfar earning :**

केंब्रिज विद्यापीठाच्या सौ. जॉन रॉबिन्सन त्यांच्या 'Economics of Imperfect Competition' या पुस्तकात बदली उत्पन्न संकल्पना अधिक स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते कोणत्याही उत्पादन घटकाचा पुरवठा मागणीच्या मानाने कमी असेल तर त्यामुळे दुर्मिळता खंड उद्भवतो. म्हणजेच उत्पादन घटकांचा पुरवठा जेव्हा अलवचिक असतो तेव्हा खंड निर्माण होतो. अल्पकाळात श्रम, भांडवल व संयोजन या घटकाचा पुरवठा मागणीपेक्षा कमी असतो, म्हणून त्यांनाही खंड मिळतो. या संदर्भातच सौ. रॉबिन्सन यांनी 'बदली उत्पन्नाची संकल्पना' मांडली आहे.

सौ. जोन रॉबिन्सन यांच्या मते, **'उत्पादनाचा एखादा घटक विशिष्ट उद्योगात टिकून रहावा म्हणून जी किंमत द्यावी लागते त्यास बदली उत्पन्न म्हणतात.'**


समजा, एका कामगाराला कंपनीमध्ये महिना एक हजार रु. पगार मिळतो. दुसऱ्या कंपनीमध्ये त्यास आठशे रु. महिन्यास मिळत असतील, त्या कामगारास किमान आठशे रु. मिळणे आवश्यक असतील तर तो यापेक्षा कमी पगारावर इतर ठिकाणी काम करणार नाही. या ठिकाणी त्यास व्यवसायात काम करण्यासाठी आठशे रुपये मिळणे आवश्यक आहेत, पण मिळतात एक हजार रु. म्हणून दोनशे रु. हा खंड आहे.

सुत्र :

खंड = प्रत्यक्ष उत्पन्न - बदली उत्पन्न.

उदा.

२०० = १००० - ८००




आ.क्र.५.४

भूमीचा मागणी व पुरवठा

वरील आकृतीत 'अफ' मजुरी द्यावयाची तयारी दाखवली असतांना श्रमाचा पुरवठा शून्य असतो. पण मजुरी वाढवून 'अप' एवढी केली असता मजुरांचा पुरवठा 'अक' एवढा होतो. म्हणजे 'अ प' मजुरी ठेवून कांही श्रमिक कामावर यावयास तयार आहेत, पण एवढ्या श्रमिकांनी संस्थेची मागणी पूर्ण होत नाही, म्हणून जास्त मजुरांना आकर्षित करण्यासाठी 'अ घ' पर्यंत मजुरी वाढवण्यात येईल. या मजुरीवर 'अ ख' एवढा मजुरांचा पुरवठा होईल व तेवढीच मागणी असल्यामुळे मागणी पुरवठ्यात संतुलन होईल. परंतु जे मजूर कमी मजुरीवर काम करण्यास तयार होते (अ प) त्यांना वाढीव दराचा फायदा मिळतो. या वाढीव दरालाच खंड म्हणतात.

'फघ' या वाढीस मजुरीस खंड म्हणता येईल. या प्रकारे 'फघग' हा एकूण खंड निर्माण होतो.

अशा प्रकारे सौ. जॉन रॉबिन्सन यांनी खंडाची संकल्पना सर्व घटकांना लागू होते असे स्पष्ट केले आहे, त्यामुळे खंड हा केवळ गुणभिन्नतेमुळे निर्माण होतो असे नसून खंड हा उत्पादन घटकांच्या दुर्मीळतेमुळे निर्माण होतो. तसेच उत्पादन घटकाची जी पुरवठा किंमत (बदली उत्पन्न) ठरलेली असते त्यापेक्षा त्या घटकास जे प्रत्यक्ष उत्पन्न मागणी पुरवठ्यावरुन निश्चित होते, हे उत्पन्न जास्त असल्यामुळे खंड हा बदली उत्पन्नापेक्षा जास्त मिळणारे अधिक्य असते. असे आधुनिक सिद्धांतामध्ये स्पष्ट केले आहे.

**रिकार्डोचा खंड सिद्धांत व आधुनिक खंड सिद्धांत यातील फरक :**

रिकार्डो यांचा खंड सिद्धांत आणि खंडविषयक आधुनिक सिद्धांत यातील फरक पुढीलप्रमाणे आहे.

२. श्रम हा उत्पादनाचा नाशवंत घटक आहे.

३. श्रमाचा साठा करता येत नाही.

४. श्रम हे प्रत्येकापासून भिन्न असतात. म्हणजे प्रत्येक श्रमिकाची कार्यक्षमता वेगळीवेगळी असते.

५. श्रम हा गतीशील घटक आहे.

६. श्रमिकाची सौदाशक्ती कमी असते.

७. एखाद्या श्रमिकाने श्रम दिले म्हणजे केवळ तो त्याचे कार्य विकतो.

८. श्रमाचा पुरवठावक्र हा मागे वळणाऱ्या आकाराचा असतो.

९. श्रमाची मागणी अप्रत्यक्ष असते.

१०. श्रमाचा उत्पादन खर्च काढता येत नाहीं.

अशा प्रकारे श्रमाची वरील महत्वाची वैशिष्ट्ये आहेत.

**मजुरी :**

श्रमास दिलेला आर्थिक मोबदला म्हणजे वेतन किंवा मजुरी किंवा भृती असे म्हणतात. बेनहॅम यांच्या मताप्रमाणे मजुरानी केलेल्या सेवेबद्दल किंवा कार्याबद्दल विनीयोजकाने करारानुसार त्यास शोधन केलेली मुद्रा म्हणजे मजुरी होय. मजुरी ही दोन प्रकारात दिली जाते. म्हणजेच मजुरीचे दोन प्रकार आहेत. अ). पैशातील मजुरी ब) वास्तविक मजुरी. या दोन्हींची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**अ. पैशातील मजुरी (Money Wages) :**

जी मजुरी श्रमिकास पैशाच्या स्वरुपात दिली जाते. त्यास पैशातील मजुरी असे म्हणतात. पैशातील मजुरी ही भाववाढीवर अवलंबून असते. वस्तुच्या किंमतीमध्ये वाढ झाली तर पैशातील मजुरी वाढु शकते किंवा भावघट झाली तर ती मजुरी कमी होते. पैशातील मजुरी ही सर्वच समान कार्य करणाऱ्या कामगारांना जवळपास समान मिळत असते.

**ब. वास्तव मजुरी (Real Wages) :**

श्रमिकास वस्तु व सेवा रुपाने जी मजुरी मिळते त्यास वास्तव मजुरी किंवा खरी मजुरी असे म्हणतात. वास्तव मजुरी पुढील घटकावर अवलंबून असते.

**१. किंमत पातळी :**

वास्तव मजुरी आणि किंमत पातळी यांच्यात विरुद्ध संबंध आहे. किंमती पातळीमध्ये वाढ झाली तर क्रयशक्ती कमी होते. म्हणून वास्तव मजुरी कमी होते. आणि किंमत पातळी कमी झाली तर वास्तव मजुरी वाढते.

२. कामाची स्थिती :

कामाची स्थिती आरामदायक असेल तर वास्तव मजुरी अधिक असते. कारण अशा कामापासून श्रमिकाला जास्त समाधान मिळते.

३. इतर मिळकत :

पगारा व्यतिरिक्त इतर मिळकत अधिक असेल तर वास्तव मजुरीत वाढ होते. आणि इतर मिळकत कमी असेल तर वास्तव मजुरी कमी होते.

४. अनपेक्षित फायदा :

श्रमिकाला अनपेक्षित फायदा होत असेल उदा. लॉटरी तर अशा वेळी वास्तव मजुरीत वाढ होती. याउलट श्रमिकास अनपेक्षित नुकसान झाले तर वास्तव मजुरी कमी होते.

अशा प्रकारे वास्तव मजुरीत वरील वेगवेगळ्या घटकावर अवलंबून असते.

## मजुरी दरातील भिन्नता :

श्रमिकांना मिळणाऱ्या मजुरीबाबत नेहमीच भिन्नता आढळून येते. वेगवेगळ्या व्यवसायात आणि वेगवेगळ्या ठिकाणी काम करणाऱ्या श्रमिकांचे मजुरीचे दर नेहमीच वेगवेगळे असतात. मजुरीच्या दरात भिन्नता असण्याची अनेक कारणे असतात.

१. शिक्षण :

शिक्षणाचा मजुरीच्या दरावर प्रभाव पडत असतो. सर्वसाधारणपणे जास्त शिक्षण असणाऱ्या श्रमिकास अधिक मजुरी मिळते आणि निरक्षर किंवा फारसे शिक्षण नसणाऱ्या श्रमिकास कमी मजुरी मिळत असते. उदा. सातवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या श्रमिकास पदवीधरापेक्षा कमी मजुरी मिळते.

२. प्रशिक्षणावर होणारा खर्च :

ज्या नोकऱ्यांच्या बाबतीत प्रशिक्षणासाठी भरपूर पैसा व अधिक वेळ लागतो, त्या ठिकाणी श्रमिकांना जास्त मोबदला मिळतो. याउलट ज्या ठिकाणी प्रशिक्षणासाठी कमी खर्च व कमी वेळ लागतो त्या ठिकाणी मोबदला कमी असतो. उदा. वैमानिकांच्या प्रशिक्षणासाठी अधिक खर्च येतो म्हणूनच वैमानिकास मिळणारा मोबदला हा बस ड्रायव्हरपेक्षा कितीतरी पटीने जास्त असतो.

३. बढतीची शक्यता :

ज्या ठिकाणी बढतीची भविष्यात शक्यता असते त्या ठिकाणी श्रमिक कमी मोबदला घेऊन काम करतात. परंतु बढतीची शक्यता नसेल तर मात्र अधिक मोबदला श्रमिकास मिळतो.

४. कामाची संधी :

प्रत्येकास कामाची संधी सारखीच मिळेल असेकधी घडत नाही. आयुष्यात कांही व्यक्तीला चांगल्या नोकरीची संधी मिळते तर काही व्यक्तींना आयुष्यभर संधी हुलकावणी देत असते. बालपणापासून वर्गमित्र म्हणून असणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना बी.ए. झाल्यानंतर सारखीच संधी मिळेल असे होत नाही. एखाद्या चांगल्या पगाराची नोकरी मिळते तर दुसऱ्याला नोकरीची संधी न मिळाल्यामुळे मोबदला घेण्याचा प्रश्नच येत नाही.

५. कामातील धोका :

ज्या ठिकाणी कामाबाबत धोक्याची शक्यता असते त्या ठिकाणी अधिक मोबदला मिळतो. याउलट ज्या ठिकाणी कामाबाबत कोणताही धोका नसतो त्या ठिकाणी मात्र फारसा मोबदला मिळत नाही. उदा. खाण कामगारास कारखान्यात काम करणाऱ्या कामगारापेक्षा जास्त मोबदला मिळतो.

६. कामाचे स्वरुप :

कामाचे स्वरुप कसे आहे त्यावरही मोबदला अवलंबून असतो. जी कामे गलिच्छ स्वरुपाची असतात त्या ठिकाणी जास्त मजुरी मिळते. जे काम व्यक्तीच्या आवडीचे असते त्या ठिकाणी कमी मोबदल्यावरही काम करण्याची अनेकांची तयारी असते.

७. कामाची जबाबदारी :

जे काम अधिक जबाबदारीचे असते त्या ठिकाणी अधिक मोबदला श्रमिकांना देण्यात येतो. उदाहरणार्थ पंतप्रधानाच्या अंग रक्षकाचे काम अधिक जबाबदारीचे असते म्हणून त्यास जास्त मोबदला मिळतो. परंतु पंतप्रधानाच्या कार्यालयातील शिपायास मात्र कमी वेतन मिळते. कारण शिपायांची कामाची जबाबदारी फारशी नसते.

८. अनुवंशिक गुण :

अनुवंशिक गुणामुळेही श्रमिकांना मिळणाऱ्या मोबदल्यात फरक पडतो. कांही श्रमिक बौद्धिकदृष्ट्या अधिक क्षमता असणारे असतात आणि म्हणून त्यांना जास्त मोबदला मिळतो. परंतु फारशी बौद्धिक क्षमता नसणाऱ्या श्रमिकांना कमी मोबदल्यावर समाधान मानावे लागते.

९. गतिक्षमता :

श्रमिकांच्या गतिक्षमतेवरही मजुरी अवलंबून असते. जे श्रमिक अधिक गतिक्षम असतात त्यांना अधिक मोबदला मिळतो. जे श्रमिक फारसे गतिक्षम नसतात त्यांना मात्र कमी मोबदला मिळत असतो.

१०. कामाचा अनुभव :

कोणत्याही कामासाठी लागणारा अनुभव व मजुरी यांचा जवळचा संबंध असतो.

अनुभवी श्रमिकास भरपूर मजुरी देण्यात येते आणि अनुभवी श्रमिकांना मात्र कमी मजुरीवरच काम करावे लागते.

**११. कार्यक्षमता :**

जे श्रमिक अधिक कार्यक्षम असतात त्यांना अधिक मजुरी मिळत असते. कारण व्यक्तीच्या कार्यक्षमतेचा आणि मजुरीचा महत्वाचा संबंध असतो. परंतु ज्या श्रमिकाबाबत फारशी कार्यक्षमता नसते त्या श्रमिकांना कमी मजुरी मिळते.

**१२. राहणीमान :**

प्रत्येक ठिकाणचे राहणीमान वेगवेगळे असते. भारतातील ज्या शहरात महानगरपालिका आहे त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना इतर ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त पगार मिळत असतो. ज्या ठिकाणी महानगरपालिका नाही त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना कमी पगार मिळतो.

**१३. नोकरीचे अज्ञान :**

बऱ्याचवेळा चांगल्या पगाराच्या नोकरीच्या उपलब्धतेबाबत अनेकांना अज्ञान असते आणि त्यामुळे त्यांना कमी पगारावरच काम करावे लागते. परंतु ज्या व्यक्तींना मात्र नोकरीच्या उपलब्धतेविषयी व्यापक माहिती असते त्या ठिकाणी जास्त पगाराची नोकरी मिळत असते.

**१४. मिळणाऱ्या इतर सवलती :**

काही वेळा पैशातील मजुरी जरी कमी असली तरी व्यक्तीस इतर अनेक सवलती मिळतात. त्यात राहण्याची सोय आणि काम करण्याच्या ठिकाणी जाण्यायेण्याच्या सवलती इत्यादींचा समावेश होतो. परंतु ज्या ठिकाणी मात्र इतर सवलती मिळत नाहीत त्या ठिकाणी पैशातील मजुरी निश्चितच जास्त मिळते.

**१५. बौद्धीक क्षमता :**

ज्या कामगारांची बौद्धीक क्षमता अधिक असते त्यांना अधिक मोबदला मिळतो. तर ज्यांची बौद्धी क्षमता कमी असते त्यांना कमी मोबदला दिला जातो.

**१६. कामगार संघटना :**

जर व्यवसायामध्ये कामगार संघटना मजबुत असेल तर मजुरीदर अधिक मिळु शकतात. याउलट कामगार संघटना नसेल किंवा कमकुवत असेल तर मजुरी दर कमी असतो.

अशा प्रकारे वरील वेगवेगळ्या घटकावर मजुरी दर अवलंबून असतो.

### मजुरी व सामुदायिक सौदाशक्ती (सामूहिक कराराक्षमता) :

### Wage and Collective Bargaining :

सामुहिक सौदाशक्तीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाली. इंग्लंडमध्ये कारखान्याचे प्रमाण वाढल्यानंतर कामगारवर्ग आपल्या मजुरीचे दर कामाचे तास, काम करण्याचे ठिकाण इ. सर्व समस्या व्यक्तीशः मालकापुढे मांडण्याऐवजी सामूहिकरित्या त्या मांडणे अधिक श्रेयस्कर समजू लागले. परिणामतः मालक व कामगार संघ यांच्यात वाटाघाटी होऊ लागल्या. मालकालाही अशा प्रकारच्या वाटाघाटी उपयुक्त वाटू लागल्या. त्यामुळे इंग्लंडमध्ये ही प्रथा वाढली. विशेष म्हणजे कायद्याच्या व शासनाच्या हस्तक्षेपाशिवाय सामूहिक वाटाघाटी होऊ लागल्या. करार होतात ते पाळण्याचे नैतिक बंधन मालक व कामगार यांच्यावर असते. अमेरिकेतही अशा प्रकारच्या सामूहिक वाटाघाटींना खूप प्रतिसाद मिळत गेला. परंतु नंतरच्या काळात अकुशल मजुराची संख्या वाढत गेली व जागतिक महामंदी आली. त्यामुळे सामूहिक वाटाघाटीचा जो हक्क कामगारांना मिळाला होता त्याची अंमलबजावणी करणे दुरापास्त झाले. परिणामतः सरकारने १९३५ मध्ये कायदा करुन कामगारांना हक्क मिळवून दिला.

इंग्लंड व अमेरिकेत वाढलेली सामूहिक वाटाघाटीची प्रथा हळूहळू जगभर पसरु लागली. नव्यानं स्वतंत्र झालेल्या आशिया - आफ्रिकेतील देशांनी सुद्धा या पद्धतीचा स्वीकार केला. अर्थात सर्वत्र या प्रथेला शंभर टक्के यश मिळाले नाही. भांडवलशाही व साम्यवादी देशातील राजकीय व आर्थिक धोरणे वेगळ्या प्रकारची असल्याने ही वाटाघाटीची प्रथा आढळत नसे. मात्र अलीकडच्या काही वर्षात हुकूमशाही व साम्यवादी चौकटीला हादरे बसले. राजकीय व आर्थिक क्षेत्रात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. उद्योग व्यवसायात खाजगी निर्णयाला महत्त्व येऊ लागले. एका अर्थाने भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा पुरस्कार होऊ लागला. त्यामुळे भांडवलदार म्हणजे मालक व मजूर यांच्या संघटना निर्माण होऊ लागल्या. परिणामतः इंग्लंड-अमेरिकेप्रमाणे याही देशात सामूहिक वाटाघाटींना प्रारंभ होईल व औद्योगिक विवाद मिळविण्याचा प्रयत्न होईल. अशी आशा करावयास हरकत नाही. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १९४९ साली सामूहिक वाटाघाटीला आंतरराष्ट्रीय मान्यता दिली.

विकसनशील देशात तर सामूहिक वाटाघाटीला अधिक महत्त्व आहे. कारण देशाची अर्थव्यवस्थाच विकसनशील असल्याने त्यात होणाऱ्या सुधारणांना खूप वाव असतो. त्यामुळे उद्योग व्यवसायात निरंतर बदल होत असतात. यांत्रिक व तांत्रिक सुधारणा सारख्या होतात. कच्च्या मालाचे स्वरुप बदलते, व्यापारचक्रे निर्माण होतात. शासन व्यवस्था बदलते. या व इतर कारणामुळे उद्योगापुढे जे प्रश्न निर्माण होतात त्याची

सोडवणूक लवकरात लवकर व समाधानकाररित्या सोडविणे गरजेचे असते. अशावेळी सामुहिक सौदाशक्तीचा स्वीकारला जातो.

सामुहिक सौदाशक्तीचा अर्थ :

**'सामुदायिक सौदा किंवा सामुदायिक करारक्षमता म्हणजे मालक आणि कामगारांचे प्रतिनिधी यांच्यात वेतन व कामाचे तास व इतर याबाबत मतभेद मिटवण्याचे साधन होय.'**

एखादा कामगार मालकवर्गाशी वेतनाच्या योग्य वाटाघाटी करु शकत नाही. म्हणून सर्व कामगारांच्या वतीने जे कामगारांचे प्रतिनिधी असतात, ते मालकवर्गाशी करार किंवा वाटाघाटी करतात.

सामुदायिक करारक्षमतेमुळे कामगारांचे कोणत्याही प्रकारचे शोषण होत नाही. सामुहिकरित्या कामगारांच्या अडचणी मालक वर्गासमोर ठेवण्यात येतात आणि मालकवर्गाकडून ही वाटाघाटीसाठी योग्य वातावरण निर्माण करण्यात येते.

**सामुदायिक सौदाशक्तीची वैशिष्ट्ये :**

सामुदायिक सौदाशक्तीची संकल्पना पुढील वैशिष्ट्यावरून अधिक स्पष्ट होईल.

**१. सामुहिक प्रक्रिया :** सामुदायिक सौदा ही एक प्रकारची सामुहिक प्रक्रिया असते कामगार आणि मालक या दोघांचाही यामध्ये समावेश असतो.

**२. गतिमान प्रक्रिया :** कामगार आणि मालक यांनी एखाद्या विशिष्ट वेळी ज्या वाटाघाटी केलेल्या असतात, त्या कायमस्वरुपी असत नाहीत. बदलत्या परिस्थितीनुसार सामुदायिक करारक्षमतेत गतिमानता असते.

**३. लवचिकता :** सामुदायिक करारक्षमतेत कामाचे तास, बोनस, वेतन यासारख्या घटकांच्या अनुषंगाने बदल होतात.

**४. व्यावहारिक मार्ग :** सामुदायिक करारक्षमतेत ओद्योगिक लोकशाहीचा व्यावहारिक मार्ग असे म्हटले जाते. लोकशाही मार्गानेच कामगार व मालक यांच्यातील समस्यांची सोडवणूक होते.

**५. औद्योगिक संघर्ष सोडवण्याचा मार्ग :** औद्योगिक क्षेत्रात अनेक बाबीवरुन संघर्ष (तंटे) निर्माण होतात. ते मिटवण्याचे मार्ग म्हणून सामूहिक करारक्षमतेचा लाभ करारक्षमतेचा फायदा दोघांनाही होतो.

**६. लोकशाही प्रक्रिया :** सामुहीक सौदाशक्ती लोकशाही मार्गाने कार्य करते.

सामुदायिक करारक्षमतेच्या बाबतीत कामगार संघटना अधिक मजबूत असाव्या लागतात. कामगार संघटना विस्कळीत असेल तर सामुहिक करारक्षमतेचा लाभ कामगाराला मिळणार नाही. कामगार व मालक या दोघांनीही परस्परांच्या समस्या समजावून घेतल्या

तर सामुदायिक करारक्षमतेचा फायदा दोघांनाही होतो.

**सामुदायिक सौदाशक्तीची आवश्यकता :**

सामुहिक सौदाशक्तीची आवश्यकता पुढील मुद्याच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

**१. कामगारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी :**

एखादा कामगार वैयक्तीक दृष्ट्या औद्योगिक क्षेत्रात स्वतःचे संरक्षण करु शकत नाही. अशा वेळी त्याची पिळवणूक मालक वर्गाकडून होऊ शकते. म्हणून अशा स्थितीत संघटनेची आवश्यकता असते. कामगार संघटनापुढे मालकालाही नमते घ्यावे लागते. कामगार संघटना आपल्या सभासदांच्या वास्तव वेतनात वाढ, कामाच्या तासात व राहणीमानात सुधारणा घडवून आणू शकतात. अशा प्रकारे सामुहिक सौदाशक्तीमुळे कामगारांच्या हिताचे रक्षण केले जाऊ शकते.

**२. ओद्योगिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी :**

पूर्वी मानवी हक्काची पायमल्ली होत होती. व कामगारांचे शोषण होत होते. परंतु कामगारांच्या संघटना झाल्यानंतर कामगार संघटनेद्वारे शोषणाविरुद्ध किंवा अन्यायाविरुद्ध एकत्रित उभे राहतात. सामुहिक सौदाच्याद्वारे वेतन मिळवण्याच्या पद्धतीचे, कामाच्या तासाचे, बोनस पद्धतीचे इ. नियम करुन त्या विषयी योग्य न्याय पदरात पाडून घेतात.

**३. श्रमाची योग्य किंमत ठरविण्यासाठी :**

आपल्या कष्टाचा मोबदला न्याय्य स्वरूपात प्राप्त व्हावा अशी कष्ट करणाऱ्यांची स्वाभाविक मनोधारणा असते. बऱ्याचवेळा ते साध्य होत नाही. उलट 'कमी दाम व जास्त काम' या तत्त्वाचा अवलंब मालकवर्ग करतो. अर्थात हे उचित नाही. त्यासाठी देशात निर्माण झालेली आर्थिक परिस्थिती, भाववाढ, राहणीमानाचा वाढता खर्चया सगळया बाबींचा विचार करुन कामाचे स्वरूप लक्षात घेऊन कामगाराला त्याच्या कष्टाचा मोबदला बदलत्या परिस्थितीत सामूहिक सौद्याच्या सहाय्याने श्रमिक संघ मिळवून देण्याचा प्रयत्न करतो.

**४. कामगारांची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी :**

एकूणच कारखान्याचे आधुनिकीकरण, नवतंत्र, कामाचे तास, मालक व मजूर यांच्यातील सौहार्दपूर्णसंबंध, वेतन पातळी इत्यादी घटकांवर कामगारांची उत्पादनक्षमता अवलंबून असते व या संबंधी सौदाशक्तीद्वारे करार मदार घडवून उत्पादनशक्ती वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. कामगार कल्याण योजना उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. कामगारांसाठी घरे, शिक्षण, आरोग्य विमा यासंबंधी सवलती उपलब्ध करुन दिल्यास त्याची शारिरीक व मानसिक स्थिती उत्तम राहते व त्याचा अप्रत्यक्ष परिणाम उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी होतो.

वरील उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी सामुहिक सौद्याची आवश्यकता आहे.

**सामुहिक सौदाशक्तीचे महत्व :**

औद्योगिक क्षेत्रात कामगाराचे वेतन, बोनस, कामाचे तास, सोयी इत्यादीबाबत अनेक वेळा व्यवस्थापन व कामगार यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण होते. या तणावांचे परिणाम उत्पादकतेवर होत असतात. अशा परिस्थितीत दोन्ही पक्षात संघर्षाची भूमिका न ठेवता सामुदायिक शक्तीद्वारे सहकार्याचे वातावरण निर्माण करुन समस्या सोडवता येतात. याशिवाय सामुहिक सौदाशक्तीचे महत्व पुढील मुद्यांद्वारे सांगता येईल.

**१. औद्योगिक शांतता :**

कामगारांच्या मागण्या आणि व्यवस्थापनाची भूमिका यांच्यात सामुहिक सौशक्तीमुळे समन्वय निर्माण करता येतो. यामुळे उत्पादन, रोजगार यामध्ये औद्योगिक शांतता राखली जाते.

**२. दोन्हीही पक्षांना लाभदायक :**

सामूदायिक करारक्षमता हा मार्ग केवळ कामगाराच्या दृष्टीनेच महत्वाचा नसतो तर तो मार्ग व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही महत्वाचा असतो. कारण कामगार आणि व्यवस्थापन अशा दोन्ही पक्षाचे प्रतिनिधी एकत्रितपणे वाटाघाटी करतात. कामगार आणि व्यवस्थापन यांच्यातील सततच्या संघर्षातून वेगळा मार्ग काढण्याच्या दृष्टीने सामुदायिक करारक्षमतेशिवाय दुसरा पर्याय असू शकत नाही.

**३. विविध समस्याची सोडवणूक :**

कामगारांच्या अनेक समस्या असतात. त्याचप्रमाणे व्यवस्थापनाच्याही अनेक अडचणी असतात. कामगार आणि व्यवस्थापन यांनी आपापल्या भूमिकेबाबत ताठरपणा घेतला तर अशा अवस्थेत कमालीची गुंतागुंत निर्माण होईल. म्हणूनच वाटाघाटीच्या माध्यमातून परस्परांना समजून घेण्याचा प्रयत्न करता येतो. कोणत्याही प्रकारची तणावाची भूमिका न घेता एक वेगळी दिशा प्राप्त होण्याच्या दृष्टीने सामूहिक करारक्षमता उपयुक्त ठरते.

**४. उत्पादकतेत वाढ :**

सामूहिक करारक्षमतेमुळे उत्पादकतेत वाढ होते. कारण औद्योगिक कलहास पूर्णपणे कात्री लावण्याचे काम सामुदायिक करारक्षमतेतून होत असते. कामगार व व्यवस्थापन यांच्यातील वाटाघाटीतून परस्पर करार होत असतात, त्यामुळे उत्पादनास खीळ बसण्याऐवजी उत्पादनात वाढ होते.

**५. सुरक्षिततेची भावना :**

कामगारांच्या मनात एक प्रकारची सुरक्षिततेची भावना निर्माण होणे आवश्यक असते. अशी भावना निर्माण होण्याच्या दृष्टीने कामगारांच्या विविध मागण्यांची पूर्तता

व्हावयास हवी. त्याचप्रमाणे कामगारांच्याच तक्रारींबाबत व्यवस्थापनाची भूमिका सहानुभूतीची असावला पाहिजे.

६. कारखाना स्तरावरील समस्यांची सोडवणूक :

कारखाना स्तरावर अनेक प्रकारच्या समस्या असतात. अशा प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी व्यवस्थापन आणि कामगार यांच्यात योग्य असा सुसंवाद असावला पाहिजे. वाटाघाटींच्या माध्यमातून कारखाना स्तरावरील विविध समस्यांची सोडवणूक सहजपणे करता येते.

७. सामाजिक आणि आर्थिक विकास :

सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने देखील सामुदायिक सौदा किंवा सामूहिक कराररक्षमता महत्त्वाची असते. कारण औद्योगिक क्षेत्रात तणावाचे वातावरण नसेल तर अशा परिस्थितीत सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने अनुकूल वातावरण तयार होते.

सामुदायिक कराररक्षमता ही अनेक दृष्टीने महत्त्वाची अशी बाब आहे असे म्हणता येते.

**कामगार संघटना व मजुरी :**

कामगार संघटनांचे अस्तित्व हे कामगारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठीच असते. कामगार संघटना कामगारांच्या (श्रमिकांच्या) मजुरीत वाढ घडवून आणतात की नाही याबाबत असे म्हणता येईल की, कामगार संघटना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कामगारांच्या मजुरीत वाढ घडवून आणतात. कामगार संघटनांना प्रत्यक्ष कृती करुन जरी मजुरीत वाढ करता येणे शक्य नसले तरी परंतु अप्रत्यक्षपणे कामगार संघटना मजुरीत वाढ घडवून आणण्याबाबत यशस्वी होतात.


१. कामगार संघटना कामगारांना संघटित करतात. कामगारांची सामुदायिक सौदा करण्याची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न कामगार संघटनाकडून होत असतो. त्यामुळे कामगारांना त्यांच्या सीमांत उत्पादनक्षमतेइतके वेतन मिळते.

२. कामगारांना त्यांच्या सीमांत उत्पादन क्षमतेइतके वेतन मिळाले तर आपोआपच त्यांचे शोषण थांबते. कामंगारांचे राहणीमान त्यामुळे सुधारण्याची शक्यता असते. राहणीमानाचाही उत्पादकतेवर व पर्यायाने मजुरीवर प्रभाव पडतो.

३. सामुहिक सौदाक्षमतेचा किंवा सामुदायिक कराररक्षमतेचा असा लाभ होतो की त्यामुळे कामगारांच्या अनेक समस्यांची सोडवणूक होते. कामगारांना योग्य मजुरी, कामाचे तास यासारखे अनेक लाभ केवळ कामगार संघटनामुळे मिळतात.

४. कामगारासाठी प्रशिक्षणाच्या सोयी, राहण्याच्या सोयी, वैद्यकीय सोयी यासारख्या

रेल्वे कर्मचारी संघटना, शासकीय कर्मचारी संघटना, बँक कर्मचारी संघटना इत्यादी संघटनांमध्ये सर्व दर्जाचे कर्मचारी एकाच संघटनेचे सदस्य असतात. म्हणून त्यांना समावेशक संघटना म्हणतात. अशा संघटनांना दडपण आणणे शक्य होते. मालकाला संप फोडण्याची संधीच मिळणार नाही अशी दक्षता या संघटना घेऊ शकतात. त्या पुढील प्रमाणे वेतनदर वाढवून घेऊ शकतात.




आ.क्र.५.८

श्रमाचा मागणी व पुरवठा

वरील आकृतीत दाखविल्याप्रमाणे मुळ 'अक' हा वेतनाचा दर कामगार संघटना 'अक१' एवढा वाढवून मागते. यापेक्षा कमी दरावर कोणीच काम करण्यास तयार नाही. म्हणून श्रमाचा पुरवठा वक्र क१ रप१ असा आकार धारण करतो. परिणामी मागणी पुरवठ्याच्या संतुलनाने पूर्वी ठरलेले 'अक' हे वेतन वाढवून 'अक१' हे वेतन प्रस्थापित होते. पण पूर्वी पाहिल्याप्रमाणे वेतन वाढल्याने श्रमाची सीमांत उत्पादकता वाढविणे आवश्यक ठरून श्रमिकांची संख्या कमी करणे व्यवस्थापनास भाग पडते. अशावेळी कामावरील लोकांची संख्या घटून अब१ ही रोजगार पातळी प्रस्थापित होते. म्हणजेच 'बब१' श्रमिक बेकार होतात. मात्र याच काळात, बाह्य कारणांनी श्रमाची मागणी वाढून मागणीवक्र ही स्थानांतरीत झाला तर वेतनवाढ मिळूनही बेकारी होत नाही. उलट रोजगार वाढतो. भारतात अनेक क्षेत्रात, आर्थिक विकासाचा एक भाग म्हणून श्रमाची मागणी वाढल्याने वेतनवाढ होऊनही बेकारी उद्‌भवली नाही असे दिसते.

वरील तिन्ही शक्यता श्रमाच्या स्पर्धायुक्त बाजाराच्या गृहीतावर आधारलेल्या आहेत.

## मजुरीचा आधुनिक सिद्धांत :

## Modern Theory of Wages :

मजुरीचे दर कसे ठरतात याबाबत वेगवेगळ्या तज्ञांनी वेगवेगळे सिद्धांत मांडले आहेत. यात वेतनाचा निर्वाह सिद्धांत, वेतननिधी सिद्धांत, सिमांत उत्पादन क्षमतेचा

सिद्धांत, इत्यादींचा उल्लेख करता येईल. मात्र प्रत्येक सिद्धांतामध्ये काहींना काही दोष असल्यामुळे त्यांना सर्वांगीण मान्यता मिळू शकली नाही. परंतु वेतनाचा मागणी-पुरवठ्याचा सिद्धांत मात्र सर्वमान्य सिद्धांत समजला जाते. कारण या सिद्धांतामध्ये मागणीच्या व पुरवठ्याच्या बाजूने विचार झाला आहे. श्रमाची मागणीकरणारा (उद्योग संस्था, उत्पादक) फक्त श्रमाची किंमत म्हणजेच वेतन ठरवू शकत नाही. तद्वतच श्रमाचा पुरवठा करणाराही श्रमाची किंमत ठरवू शकत नाही. कापड फाडण्याची क्रिया कात्री जरुर करते परंतु ती क्रिया कात्रीच्या वरच्या पात्याने किंवा केवळ खालच्या पात्याने पूर्ण होत नसते, तर त्यासाठी कात्रीच्या दोन्ही पात्यांची गरज असते.

मजुरीच्या आधुनिक सिद्धांतामध्ये श्रमाची मागणी व श्रमाच्या पुरवठ्याच्या आधारे मजुरी दराची निश्चिती स्पष्ट केली आहे. म्हणून मजुरीचा आधुनिक सिद्धांत मजुरी ठरविण्यासाठी अधिक समाधानकारक मानला जातो.

**व्याख्या : 'ज्याप्रमाणे वस्तूची, किंमत ही वस्तूच्या मागणी पुरवठ्याने ठरते. त्याचप्रमाणे श्रमाची मजुरी श्रमिकांच्या मागणी पुरवठ्यानुसार ठरते.'**

**श्रमीकाची मागणी :**

श्रमिकांना असलेली मागणी त्यांच्या सीमांत उत्पादकतेवर अवलंबून असते. श्रमाचा वापर करुन एकूण उत्पादनात वस्तूरुप व पैशाच्या स्वरुपात किती भर टाकली जाते याचा विचार करुनच श्रमाला मागणी केली जाते.

श्रमाची मागणी ही वस्तूच्या मागणीवर अवलंबून असते. वस्तूच्या मागणीत वाढ झाली तर श्रमाच्या मागणीत वाढ होते. तसेच श्रमाची मागणी इतर उत्पादन घटकांच्या किंमतीवर अवलंबून असते. उत्पादन घटकांच्या किंमती जास्त असतील तर श्रमाला मागणी जास्त राहील. इतर घटकांच्या किंमती कमी असतील तर श्रमाची मागणी कमी राहील.

श्रमीकाची मागणी पुढील घटकावर अवलंबून असते.

**१. सीमांत उत्पादकता :**

श्रमिकांची मागणी सिमांत उत्पादकतेवर अवलंबून असते. ज्या श्रमिकाची सिमांत उत्पादकता अधिक आहे त्यास अधिक मागणी असते तर बाजारात श्रमिकांची सिमांत उत्पादकता कमी असेल तर मागणीही कमी असते.

**२. उत्पादकाकडून होणारी मागणी :**

उत्पादकाकडून श्रमिकाला मागणी असते. ही मागणी श्रमिकाकडून तयार होणाऱ्या वस्तुवर अवलंबून असते. श्रमिकांकडून तयार होणाऱ्या वस्तुला मागणी अधिक असेल तर जे श्रमिक हे वस्तु तयार करतात त्या श्रमिकांना मागणी अधिक असते. उदा.

बाजारपेठेत टेबलला मागणी असेल तर जे श्रमिक टेबल तयार करतात त्यांना मागणी अधिक असते.

**३. संयुक्त मागणी :**

श्रमिकांची मागणी केवळ अप्रत्यक्षच नसते तर ती संयुक्त मागणीही असते. एखाद्या वस्तुचे उत्पादन करतांना केवळ श्रमिक आवश्यक असतात असे नाही तर इतर उत्पादन घटकासोबतही श्रमिकांना मागणी असते.

**४. इतर घटकांचा पुरवठा :**

श्रमाची मागणी, भूमी, भांडवल, संयोजक या इतर घटकांच्या पुरवठ्यावर किंवा त्यांच्या किंमतीवरही अवलंबून असते. भारतासारख्या अधिक लोकसंख्या असलेल्या देशात श्रम आवश्यकतेनुसार उपलब्ध होत आहे परंतु भांडवलाचा तुटवडा जाणवतो म्हणून श्रमाची मागणीही कमी होऊ शकते.

**५. तांत्रिक प्रगती :**

देशात तांत्रिक प्रगती कोणत्या पातळीवर आहे यावरही श्रमिकांची मागणी अवलंबून असते. जेथे मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्रांती होऊन तांत्रिक प्रगती उच्च दर्जाची आहे तेथे श्रमास मागणी कमी असेल तर ज्या देशात तांत्रिक प्रगती कमी आहे तेथे श्रमाची मागणी अधिक असू शकते.

**६. मजुरीचा दर :**

श्रमाची मागणी मजुरीदरावरही अवलंबून असते. अर्थव्यवस्थेमध्ये मजुरी दरात वाढ झाली असता श्रमाची मागणी कमी होते. त्याचप्रमाणे मजुरीदरात घट झाली तर श्रमाची मागणी वाढते. यामुळेच श्रम पुरवठ्याचा वक्र डावीकडून उजवीकडे वरुन खाली येणाऱ्या आकाराचा असतो.

अशा प्रकारे वरील वेगवेगळ्या घटकावर श्रमाची मागणी अवलंबून असते.

**श्रमाचा पुरवठा Supply of Labour :**

श्रमाचा पुरवठा हा उद्योग संस्थेस होणारा पुरवठा, उद्योगास होणारा पुरवठा आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेस होणारा पुरवठा अशा अर्थाने अभ्यासला जातो. श्रमाचा पुरवठा हा प्रामुख्याने देशाची कर्ती लोकसंख्या, स्त्रियांचे प्रमाण, सरासरी आयुर्मान, श्रमिकांची कार्यक्षमता इत्यादी घटकावर अवलंबून असतो. श्रमाचा पुरवठा पुढील घटकावर अवलंबून असतो.

**१. लोकसंख्येचे प्रमाण :**

श्रमाचा पुरवठा हा देशातील लोकसंख्येच्या प्रमाणावर अवलंबून असतो. परंतु केवळ लोकसंख्या प्रचंड प्रमाणात असून चालत नाही तर हा पुरवठा कर्त्या लोकसंख्येवर

अवलंबून असतो. कर्ती लोकसंख्या म्हणजे साधारणतः पंधरा ते साठ वयोगटातील श्रम करणारा गट असे ग्रहीत धरतात. या गटाचे एकूण लोकसंख्येत प्रमाण जास्त असेल तर श्रमाचा पुरवठा अधिक होतो.

**२. श्रमिकांची सौदा शक्ती :**

श्रमाचा पुरवठा श्रमिकांच्या सौदाशक्तीवरही अवलंबून असतो. अर्थव्यवस्थेमध्ये कामगार संघटना बलवान असतील किंवा त्या फुटणार नसतील यामुळे श्रमाची योग्य किंमत त्यांना मिळत असेल तर या सर्व स्थितीचा श्रम पुरवठ्यावर परिणाम होतो. मालकाबरोबर किंवा शासनाबरोबर अर्थशास्त्रीय विवेचन व चिकित्सा करण्याची कुवत श्रमिक संघटनेजवळ असेल तर ते संप, मोर्चे, बंद इत्यादीद्वारे सर्व पुरवठा नियंत्रित करुन आपल्या मागण्या मान्य करुन घेऊ शकतात. अशा प्रकारे श्रम पुरवठा संघटनेच्या शक्तीवर अवलंबून असतो.

**३. उद्योगांचे आकारमान :**

श्रम पुरवठा, उद्योग संस्था किंवा उद्योग यांच्या आकारावर अवलंबून असतो. उद्योगसंस्था यांचे आकारमान व्यापक असेल तर श्रमपुरवठा कमी लवचिक असतो. अधिक श्रमिक उद्योगात यावे असे वाटत असेल तर अशा वेळी अधिक मजुरी देवून श्रमपुरवठा वाढविला जातो.

**४. सामाजिक स्थिती :**

इतर उत्पादन घटकांच्या तुलनेत श्रम या उत्पादन घटकाचे वैशिष्टये वेगळे आहे. श्रम हा घटक श्रमिकांपासून वेगळे करता येत नाही. तसेच श्रमास स्वतःचे मन, बुद्धी, मान, स्वाभीमान, सन्मान, इत्यादी बाबींची जाणीव असते. या बाबी ज्या उद्योगात सांभाळल्या जातील तेथे श्रम पुरवठा अधिक होऊ शकतो. तर ज्या उद्योगात वरील बाबींची पायमल्ली होत असेल तर तेथे श्रम पुरवठा कमी होऊ शकतो.

**५. कामाची प्रेरणा :**

जर श्रमिकांचा दृष्टीकोण काम करण्याच्या दृष्टीने अनुकूल असेल त्यांना कामाची प्रेरणा असेल तर श्रमाचा पुरवठा वाढतो. याउलट काम करण्याबद्दल श्रमिकांचा दृष्टीकोण प्रतिकूल असेल श्रमिकांना काम करण्याची प्रेरणा नसेल तर श्रम पुरवठा कमी असेल.


**६. कामाच्या तासाची संख्या :**

जर श्रमिक जास्त तास काम करण्यास तयार असतील तर संपूर्ण अर्थव्यवस्थेला असलेला श्रमाचा पुरवठा जास्त असेल. आणि याउलट कामाचे तास कमी असतील तर श्रमाचा पुरवठा कमी राहील.

७. मजुरी दर :

श्रमाचा पुरवठा मजुरी दरावरही अवलंबून असतो. बहुतेक वेळा मजुरीचे दर वाढले तर श्रम पुरवठ्यात कांही प्रमाणात वाढ होते. आणि मजुरी दर कमी झाले तर श्रम पुरवठा कमी होतो.

परंतु वरील विधान नेहमीच खरे असेल म्हणता येणार नाही. कारण वाढत्या वेतनदरामुळे श्रमिकांच्या उत्पन्नात वाढ होते. वाढत्या उत्पन्नामुळे आराम व सुखासीन वृत्ती बळावण्याची शक्यता असते. अशा स्थिती मजुरीचे दर वाढले तर सुरुवातीस कांही प्रमाणात श्रम पुरवठा वाढतो. परंतु यापेक्षा अधिक मजुरीचे दर वाढले तर श्रम पुरवठा कमी होतो. म्हणूनच 'श्रमपुरवठा वक्र मागे वळणाऱ्या आकाराचा असतो' असे म्हटले जाते.





आ.क्र.५.९

श्रमाचा मागणी व पुरवठा

वरील आकृतीमध्ये 'पप' हा श्रमपुरवठा वक्र आहे. हा वक्र मजुराद्वारे केलेल्या श्रमाचा पुरवठा दाखवतो. मजुरीचे दर वाढत असतांना सुरुवातीस श्रमिकाद्वारे केला जाणारा श्रम पुरवठा वाढतो. परंतु एकदा मजुरीदर 'अम' पर्यंत जाऊन पोहंचल्यावर मात्र दरतासी मजुरी दरात जशी वाढ होत जाईल तसा श्रमपुरवठा कमी होऊ लागतो. अशा प्रकारे श्रमपुरवठावक्र अधोगामी किंवा अनुगामी स्वरुपाचा असतो.

**मजुरी दर :**

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते श्रमबाजारात श्रमाची मागणी व श्रमाचा पुरवठा यांचा समातेल होऊन मजुरीचा दर निश्चित केला जातो.




आ.क्र.५.१०

श्रमाचा मागणी व पुरवठा

वरील आकृतीत 'मम' हा श्रमाचा मागणी वक्र आहे. तर 'पप' हा श्रमाचा पुरवठा वक्र आहे. श्रमाच्या मागणी पुरवठ्यातील संतुलनाने 'अक' एवढी मजुरी ठरते यावेळी श्रमाचा मागणी व पुरवठा 'अब' इतका असतो.

यावरुन आधुनिक सिद्धांतानुसार पूर्ण स्पर्धेच्या स्थितीत ठरणारा दीर्घकालीन मजुरी दर हा सरासरी व सिमांत उत्पादकतेबरोबर असतो. असे म्हणता येईल. तो पुढील समीकरणाने दाखवला आहे.

**मजुरी दर = सरासरी उत्पादकता = सिमांत उत्पादकता**

अशा तऱ्हेने मजुरीच्या आधुनिक सिद्धांताद्वारे मजुरी दराची निश्चिती स्पष्ट करता येईल.

## ५.४ व्याज Interest :

उत्पादन प्रक्रियेत भाग घेणारा श्रमिकांनंतर महत्त्वाचा घटक भांडवल आहे. भांडवल म्हणजे केवळ पैसा नव्हे तर **'भांडवल म्हणजे मानवनिर्मित उत्पादनाची सर्व साधने होत,'** या भांडवलाच्या वापराबद्दल त्याला जो मोबदला मिळतो, त्यास 'व्याज' असे म्हणतात.

**व्याजाची व्याख्या :**

**१. प्रो. कॅरव्हर :** भांडवलाच्या मालकास भांडवलाच्या वापराबद्दल दिले जाणारे उत्पन्न म्हणजे व्याज होय.'

**२. नटविकसेल :** 'व्याज हे धनकोला ऋणकोने भांडवलाच्या अंगी उत्पादकता हा गुण असल्यामुळे दिलेला मोबदला आहे हा मोबदला भांडवलदारांच्या संचयाबद्दल दिला जातो.

**३. लॉर्ड केन्स :** 'साठवलेल्या रोखीऐवजी इतर स्वरुपात संपत्ती धारण करण्यासाठी जनतेस प्रवृत्त करण्याकरिता देऊ करावे लागणारे बक्षीस म्हणजे व्याज होय.'

या सर्व व्याख्यांवरुन असे लक्षात येते की, भांडवलाच्या वापराबद्दल किंवा भांडवल वापरण्यासाठी मिळावे याबद्दल ऋणकोने धनकोला दिलेला मोबदला म्हणजे व्याज होय.

## सकल व्याज शुद्ध व्याज Gross Interest and Net Interest :

व्यवहारात व्याज हा शब्द भांडवलास मिळणाऱ्या एकूण मोबदल्यात वापरला जातो. सकल व्याजास एकूण व्याज असेही म्हणतात. तात्त्विकदृष्ट्या व्याजाचा हा सकल दर असतो. सकल व्याज व शुद्ध व्याज फरक पुढीलप्रमाणे आहे.

१. भांडवलाच्या वापराबद्दल मिळणाऱ्या एकूण मोबदल्यास सकल व्याज किंवा स्थूल व्याज म्हणतात, तर सकल व्याजातून जोखीम पत्करण्याबद्दलचा मोबदला, गैरसोयीचा मोबदला व्यवस्थापक खर्च इ. खर्च वजा केला तर शुद्ध व्याज किंवा निव्वळ व्याज

**व्याजाचे सिद्धांत :**

व्याज दिले जाण्याची अनेक कारणे वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी दिली आहेत. तो सिद्धांत रुपाने पुढीलप्रमाणे आहेत.

## १. व्याजाचा कर्जाऊ रक्कमेचा सिद्धांत :

## Loanable funds theory of Interest :

## किंवा

## व्याजाचा नव-सनातनवादी सिद्धांत :

## Neo-classical theory of Interest :

व्याजाचा कर्जाऊ रक्कमेचा सिद्धांत नव-परंपरागत अर्थशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या विचारांद्वारे मांडलेला आहे. सिद्धांताच्या मांडणीत सर्वात पहिला विचार स्वीडिश अर्थशास्त्रज्ञ **नट विकसेल** यांनी मांडला. या विचारात सुधारणा करणारे विचार **बर्टील ओहलीन, एरीक लिण्डाल आणि गुन्नार मिरडल** या स्वीडिश अर्थशास्त्रज्ञांनी मांडले. सिद्धांताच्या विकासात ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ **सर डेनिस हॅरीस रॉबर्टसन** आणि **जॅकॅब विनर** यांनी हातभार लावला आहे. त्यांनी या सिद्धांतात वास्तविक व मौद्रिक तत्त्वांचा (Real and Monetary principles) समावेश केलेला आहे.

या सिद्धांतात नव-सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी व्याज हे कर्जाने देण्यास योग्य (ऋणयोग्य) रकमेच्या वापराबद्दल दिलेला मोबदला आहे असे सांगितले आहे. या सिद्धांतात ऋणयोग्य रकमांसाठी ज्या निरनिराळ्या मार्गांनी मागणी करण्यात येते तसेच ऋणयोग्य रकमेचा ज्या स्त्रोतांनी पुरवठा होतो त्यांचे स्पष्टीकरण केलेले आहे. मागणी व पुरवठा वक्राच्या सहाय्याने व्याजाच्या दराची निश्चिती स्पष्ट केलेली आहे. मागणी पुरवठा बाजूचे स्पष्टीकरण पुढे दिल्याप्रमाणे आहे.

**कर्जाऊ रकमेची मागणी :**

कर्जाऊ रकमांकरिता असलेली मागणी प्रामुख्याने तीन घटकांवर अवलंबून असते.

**१. गुंतवणूक :**

कर्जाऊ रकमेला जी मागणी येते ती प्रामुख्याने उत्पादकांकडून येत असते. उत्पादक उद्योगांची उभारणी करण्यासाठी अशा कर्जाऊ रकमेची मागणी करीत असतात. भांडवली वस्तूंची खरेदी, यंत्रसामुग्री, अवजारे यांची खरेदी, कच्च्या व पक्क्या मालाचा साठा करणे, उद्योगसंस्थांचेशेअर्स खरेदी करणे इ. कारणांसाठी कर्जाऊ रकमेची मागणी केली जाते. अशी गुंतवणूक केल्यामुळे प्रतिवर्षी ठराविक उत्पन्न अपेक्षित असते. गुंतवणूकीपासून मिळणारा अपेक्षित लाभ व्याजाच्या दरापेक्षा जास्त असेल तर अशी गुंतवणूक लाभदायक

असल्याने कर्जनिर्धांची मागणी वाढते. व्याजाचा दर वाढल्यास कर्जाऊ रकमेची मागणी घटत जाते आणि व्याजदर कमी झाल्यास कर्जाऊ रकमेची मागणी वाढते.

**२. उपभोग :**

उत्पादकांप्रमाणेच देशातील उपभोक्ते, सरकार या सर्वांकडून उपभोगासाठी मागणी केली जाते. टी.व्ही. फ्रीज, स्कूटर, घर किंवा फ्लॅटस्, मोटारी यासारख्या टिकाऊ परंतु महाग असलेल्या उपभोग्य वस्तूंची खरेदी करण्यासाठी अनेक कुटूंबांकडून कर्जाऊ रकमांकरिता मागणी केली जाते. व्याजाचा दर कमी असल्यास कर्जाऊ रकमांकरीता असलेली मागणी वाढते. याऊलट व्याजदर वाढल्यास या वस्तूंसाठी कर्जाऊ रकमेची मागणी घटते.

३. साठवणूक :

साठवणूक म्हणजे स्वतःजवळ असलेली रोख रक्कम होय प्रत्येक व्यक्तीला आपल्याजवळ कांही प्रमाणात तरी रोख पैसा असावा असे वाटत असते. उपभोगावर ठराविक रक्कम खर्च झाल्यानंतर उरलेल्या रकमेपैकी काही पैसा नुसता शिल्लक ठेवला जातो. कारण या पैशाच्या मदतीने हवे तेव्हा हवी ती वस्तू खरेदी करता येते. व्याजाचा दर वाढल्यास रोख स्वरुपात कमी प्रमाणात शिल्लक बाळगली जाते व व्याजाचा दर कमी झाल्यास अधिकाधिक रोख पैसा साठवून ठेवण्याची प्रवृत्ती वाढते.

कर्जाऊ रकमेचा पुरवठा :

कर्जाऊ रकमेचा पुरवठा खालील घटकांवर अवलंबून असतो.

१. बचत :

बचत हा कर्जाऊ रकमेचा पुरवठा करण्याचा सर्वात प्रमुख मार्ग होय. व्यक्ती आणि कुटूंबे आपले सर्वच्या सर्व उत्पन्न खर्च करीत नाहीत. उत्पन्नाचा मोठा हिस्सा उपभोगासाठी खर्च केला जातो. तर काही उत्पन्न बचत म्हणून बाजूला काढून ठेवले जाते. उत्पन्न जास्त असेल तरबचत वाढते. व्यक्तीप्रमाणे उद्योगसंस्थाही बचत करतात. व्याजाचा दर जास्त असेल तर जास्त बचत केली जाते आणि व्याजाचा दर कमी असेल तर कमी बचत केली जाते.

२. पूर्वीचा साठा :

अनेक व्यक्ती विविध हेतूंनी प्रेरित होऊन आपल्या उत्पन्नाचा काही भाग साठवून ठेवतात. अशी साठविलेली रक्कम रोकडीच्या स्वरुपात असते. व्यक्ती आणि संस्था यांनी भूतकाळात जी रोकड/बचत बाजूला ठेवलेली असते त्यातून कर्जाऊ रकमांचा पुरवठा होतो. व्याजाचा दर जास्त असेल तर लोक आपला पूर्वी साठवून ठेवलेला पैसा कर्ज देण्यासाठी बाहेर काढतात आणि व्याजाचा दर कमी असेल तर पूर्वीच्या साठवणूकीतून

होणारा कर्जाऊ रकमेचा पुरवठा कमी राहील.

**३. पतनिर्मिती :**


बँकांनी निर्माण केलेल्या पतपैशातून कर्जाऊ रकमेचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर होतो. पतपैसा चलन व्यवस्थेतील महत्वाचा भाग आहे. ह्यावर कर्जाऊ रकमांचा पुरवठा अवलंबून असतो. पतपैशाचे जितके प्रमाण जास्त तितका कर्जाऊ रकमेचा पुरवठा जास्त असतो. व्याजदर असेल तर व्यापारी बँका अधिकाधिक कर्ज देवून पतनिर्मिती वाढवितात. व्याजदर कमी असेल तर बँकामार्फत होणारा पतपुरवठा कमी राहील.

**४. सोडवणूक / निर्गुंतवणूक :**

उद्योगसंस्थेकडे झीज व घसारा या बाबीसाठी खर्चाची रक्कम म्हणून गुंतवणूक निधी असतो. यंत्रसामुग्री टाकाऊ ठरल्यानंतर त्यासाठी उपलब्ध असलेल्या घसारा निधीतून नवीन यंत्रसामुग्री खरेदी करण्याचे लांबणीवर टाकणे, कच्या व पक्या मालाचा साठा कमी करणे यालाच सोडवणूक किंवा गुंतविलेले भांडवल मोकळे करणे असे म्हणतात. व्याजाचा दर जास्त असेल तर असा गुंतवणूकीपैकी खुला झालेला पैसा कर्ज देण्यासाठी उपलब्ध होतो. त्यामुळे कर्जनिधीचा पुरवठा वाढतो.

**व्याजदराची निश्चिती :**

व्याजाच्या कर्जाऊ रक्कम सिद्धांतानुसार कर्जाऊ रकमेचीमागणी व कर्जाऊ रकमेचा पुरवठा ह्या दोहोंच्या समतोलाने व्याजदर निश्चित होतो हे खालील आकृतीने स्पष्ट करता येईल.




**५.११ अ** कर्जाऊ रकमेची मागणी व पुरवठा **५.११ अ**

वरील आकृतीमध्ये 'यय' हा बचत वक्र, 'रर' हा बँक प्रत्यय वक्र, 'वव' हा साठविलेल्या पैशातून काढलेली रक्कम दर्शवणारा वक्र आणि 'शश' हा वक्र पूर्वीच्या गुंतवणूकीतून काढलेल्या रकमेचा आहे व या सगळयांची बेरीज करुन आकृती क्र.५.११ ब.मध्ये 'पप' हा पुरवठा वक्र आहे. हे सर्व वक्र उर्ध्वगामी स्वरूपाचे आढळतात. याचा अर्थ असा की व्याजचा दर वाढला असता पुरवठा वाढतो.

त्याचप्रमाणे आकृती क्र. ५.११ अ मध्ये 'बब' हा वक्र उपभोगासाठी पैशाची मागणी दर्शविणारा, 'भभ' हा गुंतवणूकीसाठी आणि 'नन' हा वक्र पैशाची साठवणूक करण्यासाठी दर्शविणारा वक्र आहे. या सगळ्यांची बेरीज केली असता आपणाला आकृती क्र.५.११ ब मध्ये 'मम' हा एकूण मागणीवक्र आढळतो जो अधोगामी स्वरुपाचा आहे. याचा अर्थ असा की, व्याजाचा दर कमी झाला असता मागणीत वाढ होते.

आकृती क्र. ५.११-ब मध्ये 'पप' आणि 'मम' या रेषा 'स' या बिंदूमध्ये एकमेकास छेदतात. छेदन बिंदूतून 'अक्ष' आणि 'अय' वर लंब टाकल्यास आपणाला व्याजाचा दर व एकूण कर्जाऊ रकमेचा पुरवठा व मागणी निर्धारित झालेला आढळतो. 'स' या ठिकाणी संतुलन पहावयास मिळते. म्हणजे 'सन' हा व्याजाचा दर व 'अन' एवढा मागणी व पुरवठा आहे.

## सिद्धांतावरील टिका :

### १. सिमांत उत्पादकतेकडे दूर्लक्ष :

कर्जाऊ रक्कमेच्या सिद्धांतामध्ये सिमांत उत्पादकतेकडे दुर्लक्ष केले आहे. भांडवलाची गुंतवणूक ही केवळ व्याजदरावर अवलंबून नसते. गुंतवणूक सिमांत उत्पादकता व व्याजदर या दोन्हीवरही अवलंबून असते. परंतु याकडे या सिद्धांताने दुर्लक्ष केले आहे.

### २. व्याजदराला अवास्तव महत्व :

या सिद्धांताने व्याजदरास अवास्तव महत्त्व दिले आहे. लोक केवळ व्याज पाहून बचत करतात असे ग्रहीत धरणे चुकीचे आहे. व्याज कमी झाल्यास बचत कमी व व्याज जास्त झाल्यास बचत जास्त हा विचारबरोबर नाही. कारण सामान्यतः लोकांकडून विम्यामध्येही बचत केली जाते. तेथे लोक व्याजाचा विचार करत नाही. उलट विमा कंपनीकडून अनपेक्षित संकटावर मात करता येते. म्हणून या कंपनीमध्ये लोक बचत करतात.

### ३. अनिश्चित सिद्धांत :

प्रा. हॅन्सन यांच्या मते, कर्जाऊ रक्कमेचा सिद्धांत अनिश्चित स्वरुपाचा आहे. कारण या सिद्धांतामध्ये बचत घटकाला फारच महत्व दिले आहे. परंतु बचत हे उत्पन्नाचे फलन आहे. उत्पन्न पातळी ठरल्याशिवाय बचत ठरत नाही. त्याचप्रमाणे गुंतवणूक पातळी गुंतवणूकीवर अवलंबून असते. गुंतवणूक व्याजदरावर अवलंबून असते. व व्याजदर निश्चितीसाठी बचत गुंतवणूक माहित पाहिजे. अशा निश्चित परिस्थितीत व्याजदर ठरु शकत नाही असा आक्षेप या सिद्धांतावर घेतला जातो.

४. वास्तविक व मौद्रिक घटक एकत्रीत विचारात घेणे योग्य नाही :

व्याजाच्या दरावर परिणाम करणारे वास्तविक आणि मौद्रीक घटक यांचे मुळ तसेच त्यांचे कार्य ते दोन्हीही वेगळे आहे त्यामुळे या घटकांचे एकत्रित मिश्रण करणे किंवा एकत्रित अभ्यासणे योग्य नाही.

५. संग्रहण कल्पना संशयास्पद आहे :

लॉर्ड किन्स यांच्य मताप्रमाणे या सिद्धांतामध्ये संग्रहण आणि विसंग्रहनाची संकल्पना भ्रम निर्माण करणारी आहे. कारण संग्रहण आणि विसंग्रहनामुळे पैशाच्या पुरवठ्यात बदत होत नाही. पैसा हा कोणाकडे तरी शिल्लक राहणारच. तो जोपर्यंत पतमुद्रा आणि प्रत्यय मुद्रा यांची संख्या समान आहे तोपर्यंत पैशाचा पुरवठा कायम असतो. असे केन्स यांचे मत आहे.

६. पूर्ण रोजगाराचे ग्रहीत अयोग्य :

हा सिद्धांत अर्थव्यवस्थेत नेहमी पूर्ण रोजगार असतो असे मानतो. पण हे चुकीचे आहे. कारण केन्स यांच्या मताप्रमाणे प्रत्यक्षात अनेक प्रकारची बेकारी अर्थव्यवस्थेत अस्तित्वात असते. म्हणून **प्रो. ब्रह्मानंद प्रसाद** यांच्या मताप्रमाणे हा सिद्धांत भारतासारख्या अपूर्ण रोजगारी स्थिती असलेल्या देशात कार्य करु शकत नाही.

७. केवळ शाब्दिक बदल :

कर्जाऊ रोकड सिद्धांत आणि सनातनवाद्यांचा सिद्धांत यात फारसे वेगळेपण नाही असे टिकाकारांचे मत आहे. कारण सनातनवादी सिद्धांतापे[illegible] या सिद्धांतात बचत या ऐवजी कर्जाऊ रोकड हा शब्द वापरण्यात [illegible]. म्हणून या सिद्धांतात केवळ शाब्दिक स्वरुपात बदल करण्यात आला [illegible]स म्हटले जाते.

८. अनेक घटकाकडे दुर्लक्ष :

विकसेल यांच्या मते बचत [illegible] व्याजदरावर अवलंबून असते. परंतु प्रत्यक्षात समाजातील बचत ही अनेक घट[illegible]वर अवलंबून असते. कांही वेळा व्याजदराचा विचार न करताही लोकांकडून बच[illegible] केली जाते.

अशा प्रकारे कर्जाऊ रकमेच्या सिद्धांतावर वरील प्रमाणे टिका केल्या जातात.

## २. व्याजाचा रोकडप्राधान्य सिद्धांत :

## किंवा

## व्याजाचा तरलता अभिमान सिद्धांत :

## Liquidity Preference theory of Interest :

व्याजाचा रोकडप्राधान्य सिद्धांत **लॉर्ड जॉन मनॉर्ड केन्स** यांनी आपल्या 'The

general theory of Employment, Interest and Money' या युग निर्माण करणाऱ्या पुस्तकात १९३६ मध्ये मांडला आहे. या पुस्तकात जे.एम. केन्स यांनी एक नवे अर्थशास्त्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकात त्यांनी व्याजाच्या संबंधात नवीन कल्पना मांडल्या आहेत. या सिद्धांतामध्ये व्याजाच्या निर्मितीची व व्याजदर निश्चितीची मौलिक स्वरुपाची कारणे लॉर्ड केन्स यांनी सांगितलेली आहेत. हा सिद्धांत समजून घेण्यापूर्वी रोखताप्राधान्य म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. त्याचे विवेचन पुढील प्रमाणे आहे.

**रोखता प्राधान्य Liquidity Preference :**

केन्स यांच्या मते प्रत्येक व्यक्तीस रोख पैसा जवळ बाळगण्याचे आकर्षण असते. कारण पैसा ही सर्वाधिक तरल संपत्ती आहे. पैशाच्या सहाय्याने विक्रीस उपलब्ध असलेली कोणतीही वस्तु विकत घेता येते. म्हणून लोक पैशाच्या स्वरुपात संपत्ती ठेवणे अधिक पसंत करतात. यालाच रोखता प्राधान्य असे म्हणतात किंवा **सोने किंवा इतर वस्तुमध्ये संपत्ती ठेवण्याऐवजी पैशामध्ये संपत्ती ठेवण्याच्या पसंतीस रोखता प्राधान्य असे म्हणतात.**

**व्याजाची व्याख्या :**

केन्स यांच्या मते, **'पैशाच्या आकर्षणाचा त्याग करावा म्हणून जो मोबदला दिला जातो त्यास व्याज म्हणतात.'** व्यक्तीने पैशाचा त्याग केल्याबद्दल तिला जोमोबदला मिळतो, त्याला व्याज म्हणतात. हा व्याजाचा दर पैशाच्या मागणी पुरवठ्यावरुन ठरतो असे केन्स यांचे मत आहे. ज्याप्रमाणे वस्तूची किंमत मागणी-पुरवठ्यावरुन ठरते त्याचप्रमाणे व्याजदर हा कर्जाऊ रकमेची मागणीव कर्जाऊ रकमेचा पुरवठा यांच्या संतुलनातून निश्चित होतो.

**पैशाची मागणी Acmand of money :**

रोखता पसंतीमुळे मुद्रेची मागणी केली जाते. व्यक्तींनी आपले उत्पन्न दुसऱ्यांना कर्जाऊ दिल्यास त्यांना व्याज मिळते. तरीही लोक या व्याजाचा त्याग करुन निरनिराळ्या हेतुने रोखता जवळ ठेवण्यासाठी पैशाची मागणी करतात. केन्स यांच्या मते लोकाकडून पुढील प्रमुख तीन हेतुंनी पैशाची मागणी केली जाते.

**१. व्यवहार हेतु (दैनंदीन हेतू) Transaction motive :**

व्यक्तीस आपले दैनंदन आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी रोख रक्कम जवळ बाळगावी लागते. यामुळे एक उत्पन्न मिळाल्यानंतर पुढील उत्पन्न मिळेपर्यंत व्यवहार होत असतात. उदा. भाजी-पाला खरेदी, दुध इ. थोडक्यात व्यक्तीस दर महिन्याने किंवा दर आठवड्याने अशा विशिष्ट काळाने उत्पन्न मिळते. या मधल्या काळात दैनंदीन

व्यवहार पूर्ण करण्यासाठी व्यक्ती पैशाची मागणी करतात. यास व्यवहार हेतू किंवा उत्पन्न हेतू असेही म्हणतात. दैनंदिन व्यवहार सुरु असतांना पैशाचा पुरवठा मात्र ठराविक काळाने होत असेल अशा वेळी लोकांकडून पैशाची मागणी केली जाते. अशा वेळी पैशाची मागणी किती असेल हे उत्पन्न मिळवण्याच्या कालावधीवर अवलंबून असते.

व्यापाऱ्यांना किंवा व्यवसायिकांना ही रोख रक्कम जवळ बाळगावी लागते. व्यावसायिकांना दैनंदीन व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी अशा पैशांची गरज असते. व्यापाऱ्यांना किंवा इतर व्यवसायिकांना दैनंदीन खर्च करण्यासाठी इतर पेढीकडून रोखीची मागणी केली जाते. याला केन्स हे व्यापार हेतु असेही म्हणतात. व्यापार हेतुसाठी असलेली पैशाची मागणी ही व्यापाराच्या प्रमाणावर किंवा व्यापाराच्या उलाढालीवर अवलंबून असते. ही मागणी पुढील सुत्राने दाखवता येईल.

$M1 = f(Y)$

येथे M1 ही व्यवहार हेतुने केलेली मागणी आहे. तर f (Y) हे उत्पन्नाशी असलेला फलनात्मक संबंध दर्शवतात.

**२. दक्षता हेतू Precautionary Motive :**

अनपेक्षित खर्चांना जी ततरतूद केली जाते त्यास दक्षता हेतु असे म्हणतात. एखाद्या कुटूंबांना, व्यापाऱ्यास किंवा व्यावसायिकास दक्षता हेतुसाठी पैशाची मागणी करावी लागते. व्यक्ती किंवा कुटूंब साधारणपणे आजार, अफघात, बेकारी या सारख्या दुर्घटनांना तोंड देण्यासाठी आपल्या जवळ रोख बाळगत असतात. तर उद्योगसंस्था अपघात, आग, चोरी, यंत्रसामुग्रीत होणारा बिघाड इ. अनपेक्षित घटनांना तोंड देण्यासाठी दक्षता हेतुने रोख रक्कम जवळ बाळगतात. थोडक्यात **अनपेक्षित आलेले खर्च पूर्ण करण्यासाठी जेंव्हा पेशाची मागणी केली जाते तेंव्हा त्यास दक्षता हेतु असे म्हणतात.**


दक्षता हेतुने व्यक्तीकडून किती मागणी केली जाईल. हे त्याच्या मनोगतीवर अवलंबून असते. भविष्यातील अडचणीची अपेक्षा अधिक असेल तर दक्षता हेतुने जास्त रक्कम जवळ बाळगली जाते. केन्स यांच्या मताप्रमाणे ही मागणी व्यक्तीच्या उत्पन्नावरही अवलंबून असते. व्यापाराचे आकारमान मोठे असेल तर रोख रकमेची अधिक मागणी केली जाते. उद्योगसंस्था किंवा व्यक्तीची दक्षता हेतुने असलेली रोख रक्कमेची मागणी पुढील सुत्राने दाखविता येईल.

$M_2 = F(Y)$ या सुत्रात $M_2$ ही दक्षता हेतुने मागणी आहे. तर f (Y) हा उत्पन्नाशी असलेला फलनात्मक संबंध आहे.

३. परिकल्पन हेतु (परिकल्पन हेतू) Speculatory Motive :

केन्सच्या मते रोख पैशाच्या मागणीचा तिसरा हेतु म्हणजे सट्टेबाजीचा हेतू होय. त्याच्या मते सट्टेबाजी म्हणजे अर्थव्यवस्थेत होणाऱ्या आर्थिक चढउताराचा फायदा घेणे होय. आर्थिक चढउतार म्हणजे वस्तूंच्या किंमतीतील बदल, व्याज, दरातील चढउतार, रोखे व भाग यांच्या किंमतीतील बदल वगैरे अशा जिंदगीच्या मूल्यात होणाऱ्या बदलाचा फायदा घेण्याचा प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करतो म्हणून प्रत्येक व्यक्तीकडून ह्या हेतूच्या पूर्ततेसाठी रोख पैशाची मागणी असते. त्यामुळे केन्सच्या मते प्रत्येक व्यक्ती ह्या दृष्टीने पाहता सट्टेबाज असतो. असे जर नसते तर सामान्य व्यक्तीने हंगामाच्या काळात धान्याचा साठा केला नसता किंवा हिवाळ्यात अधिक कुलरची विक्री झाली नसती. याचाच अर्थ असा की, उपभोक्त्यांना हे माहीत असते की, फ्रिज, कुलर यांच्या किंमती उन्हाळ्यात वाढतात व त्यांच्या किंमती हिवाळ्यात कमी असतात. म्हणून उपभोक्ते अशा वस्तूंची हिवाळ्यात जास्तीत जास्त मागणी करतात. व त्यातून भाववाढीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात. तशाच प्रकारचा व्यवहार उत्पादक किंवा गुंतवणूकदार करतात. त्यांचा व्यवहार प्रामुख्याने भाग किंवा रोख्यांच्या स्वरूपात असतो. रोख्यांच्या किंमती किंवा मूल्य प्रामुख्याने व्याजदरावर अवलंबून असते. जेव्हा अर्थव्यवस्थेतील व्याजदरात वाढ होते तेव्हा रोख्यांची किंमत कमी होते. याउलट व्याजदरात घट झाली असता रोख्यांच्या किंमती वाढतात. थोडक्यात व्याज दर आणि रोख्यांच्या किंमती यांचा व्यवस्त संबंध असतो. म्हणून केन्सच्या मते सट्टेबाजीच्या हेतूसाठी असलेली पैशाची मागणी प्रामुख्याने व्याजदराचे फल होय.

अशा प्रकारे केन्स यांनी पैशाच्या मागणीचे तीन हेतु सूचविले आहेत. या तीन हेतुसाठी असलेली पैशाची मागणी म्हणजेच रोकडप्राधान्य प्रवृत्ती होय. असे स्पष्ट केले आहे. केन्स यांच्या मते रोकड प्राधान्य प्रवृत्ती नं. १ व प्रवृत्ती नं. २ जे उत्पन्नाच्या प्रमाणावर व व्याजदरावर अवलंबून असते. म्हणजे वरील तीन हेतुपैकी पहिल्या दोन हेतुसाठी असलेली पैशाची मागणी अल्पकाळात स्थिर असते. परंतु तिसऱ्या म्हणजे परिकल्पन किंवा सट्टेबाजी हेतूसाठी असलेली पैशाची मागणी नेहमी अस्थिर असून व्याजाच्या दरावर अवलंबून असते. यावरुन केन्स यांनी रोकडप्राधान्य प्रवृत्तीवक्र किंवा रोखतेचा सापळा काढला आहे. तो पुढीलप्रमाणे आहे.





आ.क्र.५.१२

वरील आकृतीमध्ये 'अक्ष' अक्षावर रोख पैशाची मागणी व पुरवठा तर 'अय' अक्षावर व्याजदर दर्शवला आहे. व्याजाचे दर व रोकडप्राधान्य प्रवृत्ती म्हणजे पैशाची मागणी परस्पर विरोधी दिशेने बदलते. कारण रोख पैशाची मागणी प्रामुख्याने परिकल्पन किंवा सट्टेबाजीसाठी केली जाते. ही व्याजलवचिक असते. म्हणजेच व्याजाच्या दराचे प्रतिफलन असते. अधिक व्याजदरावर समाजाची रोकड प्राधान्यप्रवृत्ती कमी असते. तर व्याजदर कमी असतांना रोकड प्राधान्य प्रवृत्ती अधिक असते. आकृतीमध्ये 'लप' हा वक्र कांही काळापर्यंत उभ्या अक्षाला समांतर असून तो खालच्या बाजूस तिव्रतेने घसरतो आणि आडव्या अक्षाला क्षितीजसमांतर होतो. याचाच अर्थ असा की, अतिशय कमी व्याजदरावर पैशाची मागणी किंवा रोकड प्रवृत्ती ही अमर्याद असते. या ठिकाणाहूनच वक्र हा क्षितीज समांतर होतो. यालाच केन्स यांनी रोखतेचा सापळा असे म्हटले आहे. अशा प्रकारे केन्स यांनी अल्पकाळात पैशाची मागणी कशी ठरते याचे स्पष्टीकरण केले आहे.

**पैशाचा पुरवठा :**

पैशाचा पुरवठा सरकारी व बँकाच्या धोरणावर अवलंबून असतो. सरकारी चलनाला विधिग्राह्य पैसा म्हणतात व त्यात धातुपैसा व कागदी पैसा यांचा समावेश होतो. केंद्रीय बँकेशिवाय असलेल्या बँकींग क्षेत्राकडून (राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका इ.) पत पैसा निर्माण केला जातो. त्याला बँक पैसा असे म्हणतात. एकूण मुद्रापुरवठा M या अक्षराने दर्शविला जातो. साधारणपणे अल्पकाळात पैशाचा पुरवठा स्थिर असतो असे केन्सचे म्हणणे आहे व पैशाचा पुरवठा व्याजदराशी अलवचिक असतो. म्हणजे व्याजदरात होणाऱ्या परिवर्तनाशी पैशाचा पुरवठ्यांशी संबंध नसतो. केन्सच्या पैशाच्या पुरवठ्यासंबंधी व मागणीसंबंधी विश्लेषण केल्यानंतर आता व्याजदर कसा ठरतो याचे स्पष्टीकरण आकृतीद्वारे केले आहे.

आकृतीद्वारे व्याजदर निश्चिती :




आ.क्र.५.१३

व्याजदर हा पैशाची मागणी व पुरवठ्यावरुन ठरतो. व्याजदर व मागणी यांच्यात व्यस्त संबंध असल्यामुळे पैशाचा मागणीवक्र डावीकडून उजवीकडे वरुन खाली येणारा असतो, तर पुरवठा हा स्थिर असल्यामुळे तो अलवचिक असतो, ही स्थिती वरील आकृतीत दाखवली आहे. मूळ आकृतीत पैशाचा मागणीवक्र हा 'मम' आहे, तर 'पप' हा पैशाचा अलवचिक पुरवठावक्र आहे. 'स' बिंदूत मागणी-पुरवठ्याचे संतुलन होऊन पैशाची मागणी व पुरवठा 'अक' असतांना व्याजदर 'अब' हा निश्चित होतो. समजा, लोकांची रोकडप्राधान्यता वाढली, तर 'मम,' हा नवीन पैशाचा मागणीवक्र होईल व व्याजदर 'अब' वरुन 'अब,' पर्यंत वाढेल.

यावरुन लोकांची रोकडप्राधान्य प्रवृत्ती व्याजदरावर अवलंबून असते असे केन्स यांचे मत आहे.

**टिका :**

केन्स यांच्या सिद्धांतावर पुढील प्रकाची टीका झालेली आहे.

**१. व्याजदरावर अनेक घटकांचा प्रभाव :**

केन्स यांच्या मते व्याज ही केवळ चलनविषयक घटना आहे. परंतु हॅजलिट यांच्या मते व्याजदरावर केन्स यांनी सांगितलेल्या हेतूपेक्षा अनेक घटकांचा प्रभाव पडतो. तसेच व्याजावर परिणाम करणारी वस्तुची बचत आणि भांडवलाची उत्पादन क्षमता इत्यादी घटकाकडे केन्स यांनी दुर्लक्ष केले आहे.

**२. बचतीकडे दुर्लक्ष :**

केन्स यांच्या मते रोकडप्राधान्य प्रवृत्तीचे बक्षीस व्याजाच्या स्वरुपात मिळते. याचा बचतीशी संबंध नसतो. परंतु प्रत्यक्षात मात्र व्याजाच्या दृष्टीने बचतीस महत्व असते. रोकड प्राधान्यतेसाठी बचतीची आवश्यकता असते.

३. उत्पन्न पातळीकडे दुर्लक्ष :

या सिद्धांतात उत्पन्न पातळीकडे दुर्लक्ष केले आहे. हॅन्सन यांच्या मते पैशाची मागणी ही उत्पन्नाच्या पातळीवर अवलंबून असते. किंमत पातळी अति उत्पन्न पातळीकडे केन्स यांनी दुर्लक्ष केले आहे.

**४. अल्पकाळाचाच विचार :**

केन्स यांनी व्याजदराचे स्पष्टीकरण अल्पकाळाचाच विचार करुन दिले आहे. दीर्घकाळात व्याजदर कसा ठरतो? हे सांगण्यास केन्स यांचा सिद्धांत असमर्थ ठरतो.

**५. संकुचित दृष्टीकोण :**

पैशाच्या मागणीचे केंन्स यांनी केवळ तीनच हेतू लक्षात घेतले आहेत. वास्तविक पाहता पैशाला अनेक कारणांसाठी मागणी असते. उदा. गुंतवणूकीसाठी, भांडवल उभारणीसाठी पैशाला मागणी असते याचा विचार यामध्ये केला नाही.

**६. एकांगी भूमिका :**

केन्स यांनी व्याजदर निश्चितीमध्ये पैशाच्या मागणीला जास्त महत्व दिले आहे. पैशाचा पुरवठा आणि व्याजदर यांच्यातील संबंधाकडे दुर्लक्ष केले आहे. म्हणून हा सिद्धांत एकांगी वाटतो.

**७. इतर घटकांची दखल घेतली नाही :**

रॉबर्टसनच्या मते केन्स यांनी उत्पादकता, काटकसर यासारख्या घटकांचा आपल्या सिद्धांतात विचार केला नाही.

**८. वास्तवाला धरुन नाही :**

केन्सच्या मतानुसार रोखतेच्या त्यागाबद्दल व्याज मिळते, परंतु याविरुद्ध स्थिती आढळते. मंदीच्या काळात लोक पैशाची जास्त मागणी करतात व या वेळी व्याजदर कमी असतो. याउलट स्थिती तेजीमध्ये असते, म्हणून हा सिद्धांत वास्तवाला धरुन नाही.

**९. व्याजासंबंधीच्या अपेक्षा चूक :**

केन्सच्या मतानुसार व्याजदर जास्त असतांना तो कमी होण्याची लोकांची अपेक्षा असते. परंतु बऱ्याचदा तेजीत व्याजदर जास्त असला, तरी तो पुन्हा वाढेल अशी अपेक्षा लोक करतात. यावरुन केन्स यांच्या व्याजासंबंधीच्या अपेक्षा चूक आहेत.

**१०. या सिद्धांताची आवश्यकता नाही :**

मागणी-पुरवठा सिद्धांत अर्थशास्त्रात सर्व ठिकाणी वापरला जात असताना या क्षेत्रात नवीन सिद्धांत मांडण्याची आवश्यकता नाही असे कांही अर्थतज्ज्ञांचे मत आहे.

अशा प्रकारे केन्स यांच्या रोकडप्राधान्य सिद्धांतावर वेगवेगळया अर्थतज्ज्ञांनी टिका केल्या आहेत.

**किन्स यांच्या सिद्धांताचे श्रेष्ठत्व :**

केन्स यांच्या रोकडप्राधान्यता सिद्धांतावर वरील प्रमाणे टीका केल्या असल्या तरी काही बाबतीत हा सिद्धांता श्रेष्ठ आहे.

**१. ऋणयोग्य सिद्धांतापेक्षा श्रेष्ठ :**

केन्स यांचा सिद्धांत मुद्रेचा पुरवठा अल्पकाळासाठी स्थिर मानतो व त्यामुळे त्याने दिलेला निर्णय मुद्रेच्या पुरवठ्यासह प्रवाह मानणाऱ्या ऋणयोग्य रकमेच्या सिद्धांतापेक्षा श्रेष्ठ आहे.

**२. मागणीचे विश्लेषण :**

हा सिद्धांता समाजास रोखीची गरज का असते? हे मागणीच्या हेतूने स्पष्ट करीत असल्यामुळे तो इतर (ऋणयोग्य सिद्धांत) सिद्धांतापेक्षा श्रेष्ठ आहे.

**३. संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार :**

केन्सने मुद्रेची मागणी-पुरवठ्याचा विचार करतांना संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार केला असल्याने हा सिद्धांत श्रेष्ठ आहे.

थोडक्यात, केन्स यांच्या सिद्धांताने व्याजाच्या विचारास एक नवीन दिशा दाखविल्यामुळे ह्या सिद्धांताने आर्थिक विश्लेषणास विशेष महत्व प्राप्त केले आहे.

## ५.५ नफा Profit :

संयोजकाला मिळणारे जे उत्पन्न असते त्यास नफा म्हणतात. संयोजकाच्या नफ्याच्या संदर्भात अर्थशास्त्रज्ञात एकमत नाही. कारण काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते संयोजक हा इतर उत्पादन घटकांना एकत्र करुन त्यांच्याकडून काम करुन घेण्याचे कार्य करतो म्हणून तो सुद्धा कामगार असतो, म्हणून त्याच्या मोबदल्यास वेतन समजावे. याउलट अर्थशास्त्रज्ञांचा दुसरा गट असे मानतो की, संयोजकाचे किंवा उत्पादकाचे काम इतर उत्पादन घटकापेक्षा वेगळे असते. कारण त्याला उत्पादनात जोखीम स्वीकारावी लागते. धोरण आखावे लागते. याशिवाय त्याला नवीन तंत्राचा स्वीकार करावा लागतो, स्पर्धा करावी लागते. त्यामुळे अनेक अर्थशास्त्रज्ञ असे मानतात की, नफा हा धोका पत्करण्याचा किंवा जोखीम स्वीकारण्याचा मोबदला असतो. थोडक्यात आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते, नफा हा इतर उत्पादन घटकाच्या मोबदल्यापेक्षा भिन्न असतो. त्यामुळे त्याचा समावेश वेतनात करणे बरोबर नाही.

नफा हे उर्वरित किंवा शिल्लक (शेष) उत्पन्न असते. संयोजक, भूमी, श्रम व

खर्च यामधील फरक आहे.

८. इतर घटकांचा विचार नाही :

नफा हा अनेक घटकांचा परिणाम असतो. अशा वेळी केवळ एकाच घटकाचा विचार करणे योग्य होत नाही.

वरील टीकांवरुन प्रा. हॉले यांच्या सिद्धांतातील अपूर्णता स्पष्ट होते, परंतु असे असूनही हा सिद्धांत महत्त्वाचा आहे, कारण कोणत्याही संघटकास व्यवसायात जोखीम स्वीकारावी लागते. त्याशिवाय नफा मिळत नाही.

**नफ्याचा अनिश्चिततेचा सिद्धात :**

**Uncertainty Bearing Theory of Profit :**

प्रो. फ्रँक एच. नाईट यांनी १९४० साली Risk Uncertinty and Profit या पुस्तकात नफाचा अनिश्चिततेचा सिद्धांत मांडला. या सिद्धांताची मुख्य कल्पना प्रो. हॉले यांच्या नफ्याचा जोखीम स्वीकारण्याचा सिद्धांत यावरुन घेतलेला आहे. किंबहुना हा सिद्धांत प्रो. हॉले यांच्या सिद्धांताची परिशुद्धता आहे. या सिद्धांतानुसार संयोजक हा व्यवसायाची जोखीम सांभाळत नाही तर तो फक्त अनिश्चितताच स्वीकारतो असे एफ.एच. नाईट यांचे मत आहे. या सिद्धांताप्रमाणे जोखीम दोन प्रकारच्या असतात. अ) अपेक्षित जोखीम (धोके) व ब) अनपेक्षित जोखीम (अनिश्चितता). एफ.एच. नाईट यांच्या सिद्धांतातील अपेक्षित धोके व अनपेक्षित धोके याचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

**अ) अपेक्षित जोखीम (धोके) :**

**प्रो. नाईट यांच्या मते ज्या धोक्यांची पूर्वकल्पना किंवा अंदाज संयोजकास बांधता येतो त्यास अपेक्षित धोके म्हणतात. उदा. कारखान्यास आग लागणे, कच्चा मालाची नासधूस होणे, मृत्यु होणे, अपघात इ.**

**अशा धोक्यांची काळजी घेऊन ते कमी करता येतात किंवा विमा कंपनीच्या सहकार्याने नुकसान भरपाई मिळते. नाईट यांच्या मते अशा अपेक्षित धोक्यांबद्दल संयोजकास कोणताही मोबदला मिळत नाही.** या अपेक्षित धोक्यांना विमायोग्य किंवा अगोपनीय धोके असेही म्हणतात. हे धोके व्यावसायिकांना माहित असतात. म्हणून याबद्दल संयोजकास नफा मिळत नाही.

**ब) अनपेक्षित जोखीम** (अनिश्चितता, अविमायोग्य धोके) **Uncertainaty :**

ज्या धोक्यांचा पूर्वानुमान घेता येत नाही. अशांना अनपेक्षित धोके किंवा अनिश्चितता असे म्हणतात. अनिश्चिततेचे सांख्यकिय तत्त्वानुसार अगोदर मोजमाप करुन त्याचे पुर्वानुमान घेता येत नाही. यामुळे जे व्यावसायिक असे अविमायोग्य धोके स्वीकारतात. त्यांनाच व्यवसायात नफा मिळतो.

व्यावसायात अनिश्चितता पुढील प्रकारच्या असतात.

**१. स्पर्धेमुळे निर्माण होणारी अनिश्चितता :**

उत्पादन क्रियेत अनेक नवीन उत्पादन संस्थांचा समावेश होत असतो. नवीन उत्पादक संस्थांमुळे उत्पादनात स्पर्धा निर्माण होते व चालू उत्पादन संस्थांच्या नफ्यात घट होण्याचा धोका निर्माण होत असतो. या धोक्याचे पूर्वानुमान घेता येत नाही.

**२. तांत्रिक धोके :**

अर्थव्यवस्थेत उत्पादन प्रक्रियेत तांत्रिक प्रगती झाल्यास वस्तुच्या दर्जामध्ये सुधारणा होत असते. यामुळे उत्पादन खर्चही कमी होत असतो. प्रचलित उत्पादन संस्थांना असा बदल करणे कांही कारणाने शक्य नसेल तर नवीन उत्पादन संस्थांच्या वस्तुची मागणी वाढते. आणि प्रचलित उत्पादन संस्थांच्या वस्तुची मागणी कमी होण्याची शक्यता असते.

**३. सरकारचा हस्तक्षेप :**

विशिष्ट आर्थिक धोरण जनहिताचे दृष्टीने कार्यान्वीत करण्यासाठी सरकार व्यवसाय संघटनेत हस्तक्षेप करत असते. असा हस्तक्षेप वस्तुच्या किंमती कमी करून किंवा वस्तुच्या करांचे प्रमाण कमी-अधिक करुन करत असते. जर वस्तुवरील कर सरकारने वाढला तर उत्पादकांना मिळणारा नफा कमी होतो. यामुळे व्यवसायात नुकसान येण्याची भिती असते.

**४. व्यापारचक्रामुळे निर्माण होणारी जोखीम :**

अर्थव्यवस्थेत व्यापार चक्रामुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक मंदीच्या काळात उपभोक्त्याद्वारे केला जाणारा खर्च त्याच्या क्रयशक्तीत घट झाल्यामुळे होतो. यामुळे उत्पादन संस्थांच्या वस्तुची मागणी कमी होऊन त्यांना नुकसान होण्याची शक्यता असते.

याशिवाय लोकांची आवड बदलून फॅशन बदलणे, अशा जोखीमेची गणितीय दृष्ट्या मोजणी करुन नुकसानीचे अंदाज घेता येत नाहीत. जर उद्योजकास उद्योगात रहावयाचे असेल तर जोखीम स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नसते. म्हणून अशा प्रकारची जोखीम स्वीकारण्याचे कार्य केल्याबद्दलच संयोजकास नफा मिळतो. असे एफ.एच. नाईट यांचे मत आहे. तसेच या धोक्यांची जबाबदारी विमा कंपनी घेत नाही म्हणून विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळण्याची अपेक्षा नसते. थोडक्यात अनपेक्षित धोक्याबाबत अनिश्चितता असते. या अनिश्चिततेचा मोबदला संयोजकाला नफ्याच्या स्वरुपात मिळतो.

अशा प्रकारे जो संयोजक व्यावसायामध्ये अधिक प्रकारे अनिश्चितता स्वीकारेल त्यास अधिक नफा मिळतो असे एफ.एच. नाईट यांनी स्पष्ट केले आहे.

सिद्धांतावरील टिका :

प्रा. नाईट यांच्या सिद्धांतावरील टीका पुढीलप्रमाणे आहेत.

**१. मक्तेदारीच्या नफ्याचे स्पष्टीकरण नाही :** एखाद्या उत्पादनात एखादा विक्रेता मक्तेदार असतो. मक्तेदारीमुळे त्यास जो नफा मिळतो, त्याचे स्पष्टीकरण या सिद्धांतात आलेले नाही.

**२. कंपनीच्या नफ्याचे स्पष्टीकरण नाही :** प्रो. नाईट यांच्या सिद्धातामध्ये एखादया कंपनीस म्हणजे संयुक्त स्कंध प्रमंडळास मिळणाऱ्या नफ्याचे स्पष्टीकरण आलेले नाही. कारण अशा कंपनीमध्ये व्यवस्थापन आणि मालकी हक्क हे वेगवेगळे घटक असतात. कंपनीचे व्यवस्थापन पगारी व्यवस्थापकांकडे असते तर मालकी भागधारकाकडे असते. व्यवस्थापक कोणताही धोका किंवा अनिश्चितता स्वीकारत नसतात. तरीही ते संयोजकाचे कार्य करुन संयुक्त स्कंध प्रमंडळास नफा मिळतो. या नफ्याचे स्पष्टीकरण हा सिद्धांत करु शकत नाही.

**३. नफ्याची राशी अनिश्चित मानने अयोग्य आहे :** प्रो. नाईट यांचा सिद्धांत नफ्याची रक्कम अनिश्चित असते असे मानतो. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात असे असते की, गुंतवणूक करीत असतांना व्यवसायिक अपेक्षित नफ्याची विश्वासपूर्वक हिशोब करीत असतो. हा हिशोब फायदेशीर असेल तरच तो व्यवसायात भांडवल गुंतवणूक करतो

**४. नेहमीच अनिश्चिततेमुळे नफा मिळत नाही :** या सिद्धांतानुसार व्यवसायात अनिश्चितता स्विकारल्यानंतर नफा मिळतो. परंतु प्रत्यक्षात अनेक उत्पादनामध्ये अनिश्चितता सांभाळून सुद्धा व्यावसायिकांना नफा मिळत नाही. यामुळे केवळ अनिश्चिततेमुळेच नफा मिळतो असे मानने चूक आहे.

**५. इतर कार्याकडे दुर्लक्ष :** संघटक हा केवळ अनिश्चितता पत्करण्याचेच कार्य करत नाहीत, तर नवप्रवर्तनाचे किंवा उत्पादन घटकांना संघटित करण्याचेही कार्य करतो. या कार्याची दखल या सिद्धांतात घेतली नाही.

**६. गुंतागुंतीची प्रक्रिया :** अनिश्चितता ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. एखाद्या व्यवसायात अनिश्चितता किती आहे याचे मापन करणेशक्य नसते.

**७. लाभाचे मोजमाप करता येत नाही :** प्रत्यक्षात किती प्रमाणात अनिश्चितता स्वीकारली तर किती नफा मिळेल, याचे प्रमाण सिद्धांत सांगत नाही.

**८. नफ्यात अनेक घटक असतात :** नफा केवळ अनिश्चिततेचा मोबदला नाही, तर अनेक कारणांचा परिणाम म्हणून नफा मिळतो. उदा. संघटकाचे कौशल्य, भांडवल इत्यादी.

वरील प्रकारे या सिद्धांतावर टीका झाल्या असल्या तरी अनिश्चिततेच्या सिद्धांताने

नफ्याचे स्पष्टीकरण समाधानकारक दिले आहे.

**नफ्याचा नवप्रवर्तन सिद्धांत :**

**Innovation theory of profit :**

नफ्याचा नवप्रवर्तनाचा सिद्धांत प्रो. जोसेफ ए. शुंपीटर यांनी 'The theory of economic development' या पुस्तकात मांडला आहे. प्रो. शुंपीटर यांचा सिद्धांत प्रो. जे. बी. क्लार्क यांच्या गतीमानतेच्या सिद्धांताशी साधर्म्य आहे. प्रो. शुंपीटर यांच्या मते नफा हा गतीमानतेमुळे मिळतो. परंतु क्लर्क आणि शुंपीटर यांच्या मध्ये महत्वाचा फरक असा आहे की, तो म्हणजे गतीमानतेची कारणमिमांसा वेगवेगळी आहे. प्रो. क्लर्क यांच्या मते अर्थव्यवस्थेत होणाऱ्या मुलभूत बदलामुळे गतीमानता निर्माण होते. तर शुंपीटर यांच्या मते नफा हा उत्पादन प्रक्रियेत होणाऱ्या **'नवप्रवर्तनाचा'** परिणाम आहे. नवप्रवर्तन म्हणजे उत्पादन खर्च कमी करण्यासाठी उत्पादन प्रक्रियेत केलेले बदल होय.

**नफ्याचा अर्थ :**

प्रो. शुंपीटर यांच्या मते, **'नफा हा उत्पादन प्रक्रियेतील नवप्रवर्तनांचा परिणाम आहे.'**

वरील शुंपीटर यांच्या नफ्याच्या व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की, व्यवसायात उत्पादन प्रक्रियेत नवप्रवर्तने होत असतात. या नवप्रवर्तनामध्ये वस्तुची किंमत आणि वस्तुचा उत्पादन खर्च यांच्यात अंतर निर्माण होऊन नफा निर्माण होत असतो. नवप्रवर्तनांतर्गत उत्पादन प्रक्रियेत केले जाणारे बदल म्हणजे उत्पादनात नव्या यंत्राच्या वापर करणे, उत्पादन संस्थेच्या संघटनात बदल करणे, कच्चा मालाच्या मार्गात बदल करणे. नवीन इंधनाचा शोध, नवीन विक्री कौशल्याचा वापर अशा प्रकारची नवप्रवर्तने होत असतात. या नवप्रवर्तनामुळे वस्तुची किंमत आणि उत्पादन खर्च यांच्यात अंतर निर्माण होते. परिणामी संयोजकास नफा मिळतो.

प्रो. शुंपीटर यांच्या मते, व्यवसायात पुढील नवप्रवर्तने होत असतात.

**१. नवीन वस्तुचे उत्पादन :**

शुंपीटर यांच्या मते अर्थव्यवस्थेत लागलेल्या नवनवीन शोधामुळे नवीन वस्तु निर्माण होतात. उदा. दूरदर्शन, फोन इ. या वस्तुंचा उत्पादक जेंव्हा या वस्तु बाजारपेठेत आणतो तेंव्हा नवीन वस्तुला अधिक मागणी असते. परिणामी संयोजकास नफा मिळतो.

**२. उत्पादन पद्धतीतील बदल :**

अर्थव्यवस्थेत वारंवार नवनवीन शोध लागत असतात. या शोधाचा स्वीकार केल्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. किंमती मात्र वाढत असतात. यातूनच संयोजकास नफा मिळतो.

३. कच्या मालाचा शोध :

अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादक प्रचलित कच्चा मालाऐवजी नवीन कच्च्या मालाचा वापर करुन वस्तु निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात. उदा. कापडाच्या निर्मितीसाठी नैसर्गिक धाग्याऐवजी कृत्रीम धागा वापरणे. या बदलामुळे उत्पादन खर्च कमी होऊ शकतो व नफ्यात वाढ होते.

४. व्यवस्थापनातील बदल :

संयोजक नफा मिळवण्यासाठी नेहमी व्यवस्थापनात बदल करण्याचा प्रयत्न करतात. यामुळेच नवनवीन प्रकारचे व्यवस्थापन तंत्र पुढे येत आहे. उत्पादन प्रक्रियेत श्रमविभागणी होऊन उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होते. या तंत्रामुळेही नफ्याचे प्रमाण वाढू शकते.

५. नवीन बाजारपेठा :

प्रत्येक उत्पादक आपल्या वस्तुसाठी नवीन बाजारपेठांचा शोध घेत असतो. अशा बाजारपेठा देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय असू शकतात. या बाजारपेठेमध्ये वस्तुची मागणी वाढली तर नफ्याचे प्रमाण वाढते.

अशा प्रकारे शुंपीटर यांच्या मते व्यवसायात महत्वाचे बदल होत असतात. या बदलाचा स्वीकार योग्य पद्धतीने संयोजकाने केला तर तर त्यास दीर्घ काळात नफा मिळतो. प्रत्यक्षात अर्थव्यवस्थेमध्ये मागणी आणि पुरवठा यांच्यात संतुलन असते. यामुळे सिमांत उत्पादन खर्च व सिमांत उत्पन्न समान होतात व संयोजकास साधारण नफा मिळतो. अशा स्थितीत वरील कोणतेही नवप्रवर्तन घडून आले तर त्याचा परिणाम म्हणून उत्पादन खर्च कमी होतो. किंवा वस्तुला मागणी वाढते. वस्तुच्या किंमती वाढतात. याचा फायदा उत्पादकास मिळतो. हा फायदा केवळ जे उत्पादक व्यवसायात नवीन तंत्र स्वीकारतात त्यांनाच मिळतो. असे शुंपीटर यांचे मत आहे.

**टिका :**

**१. धोक्याचा विचार नाही :**

प्रो. हॉले यांच्या मते शुंपीटर यांनी त्यांच्या सिद्धांतात धोक्याचा उल्लेख केला नाही. संयोजकाचे धोका स्वीकारणे हे महत्वाचे कार्य आहे. त्याचे स्पष्टीकरण या सिद्धांत आले नाही.

**२. अनिश्चिततेचा विचार केला नाही :**

प्रो. नाईट यांच्या मते अनिश्चितता स्वीकारणे हे संयोजकाचे महत्वाचे कार्य आहे. परंतु या कार्याचा उल्लेख किंवा त्याचे स्पष्टीकरण शुंपीटर यांनी केले नाही.

३. इतर घटकाकडे दुर्लक्ष :

टिकाकारांच्या मते नफा हा नवप्रवर्तनाव्यतिरिक्त इतर कारणामुळेही मिळतो. यात प्रामुख्याने संयोजकाची योग्यता, परिस्थितीची गतीमानता इत्यादी कारणे आहेत. परंतु या सिद्धांतात इतर कारणांचा विचार न केल्यामुळे हा सिद्धांत अपूर्ण आहे.

**४. नवप्रवर्तनाचा स्वीकार न करणाऱ्यांनाही नफा मिळतो :**

प्रो. शुंपीटर यांच्यामते जे उत्पादक नवप्रवर्तनाचा वापर करतात त्यांनाच नफा मिळतो. परंतु प्रत्यक्षात कांही संयोजक उत्पादन प्रक्रियेचे फक्त संघटन करतात. कोणतेही नवप्रवर्तन स्वीकारत नाहीत. किंवा त्याचा वापर उत्पादन प्रक्रियेत करत नाहीत. तरीही त्यांना नफा मिळतो. त्याचे स्पष्टीकरण या सिद्धांतामध्ये आलेले नाही.

**५. मक्तेदारीच्या नफ्याचे विवेचन नाही :**

या सिद्धांतामध्ये मक्तेदारास मिळणाऱ्या नफ्याचे विवेचन केलेले नाही. मक्तेदार हा व्यवसायात कोणत्याही प्रकारचे नवीन तंत्र किंवा नवप्रवर्तन स्वीकारत नाही. तरीही त्याच्या उत्पादनास जवळचा पर्याय नसल्यामुळे आणि तो मक्तेदार असल्यामुळे त्यास नफा मिळतो. याचे विवेचन या सिद्धांतात केलेले नाही.

**६. अकस्मिक लाभाचे विवेचन नाही :**

कांही टिकाकारांच्या मते संयोजकास मिळणारा आकस्मिक लाभ किंवा असाधारण लाभ का निर्माण होतो? याचे स्पष्टीकरण हा सिद्धांत देत नाही. बऱ्याचवेळी नैसर्गिक कारणामुळे किंवा सरकारच्या धोरणामुळे एखाद्या उत्पादकास नवप्रवर्तन न स्वीकारताही लाभ मिळतो. या लाभाचे विवेचन या सिद्धांतात आले नाही.

अशा प्रकारे शुंपीटर यांच्या नफ्याच्या नवप्रवर्तन सिद्धांतावर टिका केलेली आहे.

अशा प्रकारे टिका केल्या असल्या तरी व्यवसायात जो व्यवसायिक नवीन उत्पादन तंत्राचा वापर करेल त्याच्या नफ्यामध्ये निश्चित वाढ होते. असे पहावयास मिळते.

❖ ❖ ❖